# हाकारा

त्यांच्या बोलण्याबद्दल

बोलता बोलता ते असे बोलून गेले –
'सूर्याची किरणें प्रथम शिखरांवर पडतात
नंतर उतरतात जमिनीवर'
उद्रेकाचे इंद्रधनुष्य झुलते फक्त शब्दांत ज्यांच्या
त्यांच्या समर्थनात निश्चित असतात चार दिशां,
अथवा ते आखूनही घेऊ शकतात किरणांत
स्वयंकेंद्री नकाशा.
त्यांना ठाऊक असते का विदिशेचे चक्र?
ओघात वाकडी दिसावी काठी इतके त्यांचे
सनातन अन्वयार्थ, ते काढु शकतात अर्थांची वलयें,
पाडूहि शकतात विचारांचा गर्भ... अन्
लिहू शकतात उत्क्रमाच्यानें नीतिशास्त्र.
जास्तच झाले तर बसुही शकतात
विचारवंतांच्या पंगतीत बिनधास्त.
त्यांच्या चष्म्यांतुन कसे सुटतात ऊन्हांतील लोक?
त्यांना ऐकु येत नाही का मातीतल्या लाव्हांचा गाज?
...बोलतांना त्यांनी बऱ्यांच घेतल्या टक्क्यां
कडकडाट झाला, पडला पाऊस
ते मात्र कोरडेच राहीले.
_बोलता बोलता ते विसरून गेले
विषमतेची शिखरें मातीवरच उभारली जातात
नंतर उजळली जातात किरणांवर.

–भुजंग मेश्राम

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

## कार्यकारी मंडळ


| | |
|---|---|
| अध्यक्ष | गं. बा. सरदार |
| उपाध्यक्ष | शरद कुलकर्णी |
| चिटणीस | रा. के. मुटाटकर |
| सहचिटणीस | जगदीश गोडबोले |
| खजीनदार | अनिल गोरे |
| सभासद | विजय भानू |
| | गोविंद मारे |
| | श. गो. देवगावकर |
| | नान्सी गायकवाड |
| | जनार्दन वळवी |
| | दर्शन शंकर |

## सल्लागार मंडळ

| | |
|---|---|
| बाबा आढाव | जयंत पाटील |
| बाबा आमटे | विजय परुळकर |
| रावसाहेब कसबे | अनंतराव बोधनकर |
| सुधा काळदाते | अनुताई वाघ |
| विजय तेंडुलकर | विलास संगवे |
| वि. म. दांडेकर | वाहरु सोनवणे |
| मधुकर देवल | गीता साने |
| चित्रा नाईक | छाया सुरतवंती |
| आ. ना. नारळकर | दत्ता सावळे |

कष्टकरी जनता, भूषण भारता, वदन करितो पददलिता ।

# हाकारा



( महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक )

## अनुक्रमणिका


आदिवासींची गोंड गाणी — डॉ. गोविंद गारे ३

आदिवासींची लोकगीते — सोपानदेव चौधरी १०

विनाकर्त्याचे आदिवासी गाणे — गंगाराम आवारी १४

विविध नृत्य व वाद्ये यांची माहिती १५

नमन करतो मी — राजीव पाटील १६

गोदूताईंना अभिवादन — सुधीर बेडेकर १९

इतिहास आदिवासी वीरांचा — ग. रा. खंडकर २१

महाराष्ट्रातील आदिवासी विस्थापितांचे पुनर्वसन २२
पु. र. शिरसाळकर

गोंडी भाषेचे प्राचीनत्व — प्रा. व्यंकटेश आत्राम २५

वणी येथील दुसरे आदिवासी साहित्य संमेलन ३०
भाऊराव मडावी

भारतातील जंगल व्यवस्थापन : एक अभ्यास ३३
माधव गाडगीळ, नरेंद्र प्रसाद, राऊफ अली

वननीती — शरद कुलकर्णी ४९

मेंढपाळांचे स्थलांतर : एक अपरिहार्य समस्या ६०
प्र. भ. द्राक्षे

कविता — वीणा समेळ, शोभा मुळे ६३

जगाच्या कल्याणा—विज्ञान विभूती — विजय पाठक ६५

आम्ही असेच बुडीत जायचो — कुसुम ६९

जेव्हा माणूस माग काढतो — दीनानाथ मनोहर ७३

सुगावा समारंभ ७५

संस्था परिचय ७८

संवाद ८०



वर्ष तिसरे : अंक तिसरा व चौथा
जुलै—डिसेंबर १९८२
परिषद / हाकारा संयुक्त
वार्षिक वर्गणी : २० रुपये
एका अंकाची किंमत : ४ रुपये
पत्रव्यवहाराचा पत्ता :
महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषद / हाकारा
द्वारा : जगदीश गोडबोले
सीमा, ब ७, शिरोळे मार्ग,
पुणे ४११ ००४.

कार्यकारी संपादक
जगदीश गोडबोले

संपादक मंडळ
रामचंद्र मुटाटकर
शरद कुलकर्णी

प्रकाशक :
प्रा. रा. के. मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषद, पुणे यांनी
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद,
पुणे यासाठी
साप्ताहिक मुद्रण,
१०२५ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०,
येथे छापून प्रसिद्ध केले.

## संपादकीय

या जोड[illegible] तीन वर्षे पूर्ण होत आहेत.

प्रत्येक अंकात आदिवासी जीवन–विकासाशी निगडित एखाद्या विषयाची परिपूर्ण माहिती देण्याचा आमचा प्रयत्न असतो. त्याप्रमाणे गेल्या तीन वर्षात शिक्षण, आरोग्य, वनसंवर्धन विषयासंबंधी खास माहिती आम्ही दिली. त्याचप्रमाणे जबरन जोत जंगल जमिनीचा प्रश्न, रोजगार हमी योजनेची समग्र माहितीही दिली. 'हाकारा' च्या नेहमीच्या प्रथेनुसार या विषयांची तात्त्विक–व्यावहारिक बैठक, संबंधित सरकारी आदेशातील महत्त्वाचा भाग, कार्यकर्त्यांचे प्रत्यक्ष अनुभव, अडचणी यांचा सविस्तर तपशील सादर केला.

'हाकारा'च्या या अंकासाठी आम्ही पुन्हा 'आदिवासी साहित्य आणि कला' हा विषय योजिला आहे. अंकातील 'गोंडी भाषेचे प्राचीनत्व' हा प्रा. व्यंकटेश आत्राम यांचा लेख कदाचित् वादग्रस्त ठरण्याचा संभव आहे. प्रा. आत्राम यांच्या विवेचनाशी कोणी सहमत होईल, वा न होईल, पण त्यांनी परिश्रमपूर्वक काही विचार मांडल्याचे नक्कीच जाणवते. मात्र अशा प्रकारच्या लिखाणात व मांडणीत ओव्या–उतारे–ऋचांचे संदर्भ देताना, अर्थ लावताना अधिक काळजी घेणे आवश्यक असते. नाही तर आपलेच प्रतिपादन कमजोर होण्याची शक्यता असते.

'हाकारा' चा अंक शक्यतो प्रत्येक तिमाहीच्या शेवटच्या महिनाअखेरपर्यंत काढण्याचा आमचा प्रयत्न असतो. तथापि या वर्षी 'हिमालय-अभ्यास मोहिमे'मुळे पहिला–दुसरा अंक लांबणीवर पडला. म्हणून शेवटचे दोन अंक आम्ही जोडअंकाच्या स्वरूपात प्रसिद्ध करीत आहोत. वाचक आमची अडचण समजून घेतील अशी आशा आहे.

'हाकारा' च्या पुढील वर्षाच्या वाटचालीत वाचक–कार्यकर्त्यांची सहकार–साथ मिळत राहील ही आशा व विनंती !

■

# महंमद आणि पर्वत


'हाकारा'ची वार्षिक वर्गणी या जोडअंकाबरोबर संपली. अनेकदा केवळ विस्मरणामुळे अथवा कामाच्या गडबडीमुळे परत वर्गणी पाठवायचे राहून जाते, म्हणूनच आम्ही जुन्या सभासदांना या अंकाबरोबर मनीऑर्डर फॉर्म भरून पाठवीत आहोत. या फॉर्मवर आपला पत्ता कृपया सुवाच्च हस्ताक्षरात व पूर्ण लिहावा.

**हाकारा व परिषद यांची संयुक्त वार्षिक वर्गणी फक्त वीस रुपये.**

वर्गणी महाराष्ट्र मानव परिषदेच्या नावाने पाठवावी. वर्गणी चेकने पाठवावयाची असल्यास **दोन रुपये** वटणावळ म्हणून जादा पाठवावेत.

**वर्गणी पाठवण्याचा पत्ता : द्वारा : जगदीश गोडबोले, सीमा, ब–७, शिरोळे मार्ग, पुणे ४११ ००४.**

# संस्कृतीचे दर्शन घडविणारी आदिवासींची गाणी



गोविंद गारे

ठिकठिकाणचे आदिवासी सर्वसाधारणपणे निसर्गाच्या चिरसान्निध्यात राहत असल्यामुळे त्यांच्या जीवनात निसर्गाशी कळत न कळत तादात्म्य पावण्याचा प्रयत्न आढळून येतो. जंगलात वस्ती, दऱ्याखोऱ्यांतून फिरणे, विविध प्रकारची पाने, फुले, हिंस्र श्वापदे किंवा निरुपद्रवी प्राणी यांची संगती, त्यांचे देव, त्यांची लोकगीते, त्यांचे शृंगार या सर्वांवर या सभोवतालच्या निसर्गाचा ठसा उमटलेला दिसतो. निसर्गापासून मिळणाऱ्या साधनसामुग्रीतून आपले कौशल्य वापरून निरनिराळी साधने, उपयुक्त वस्तू व क्वचित काही कलाकृती ते तयार करतात आणि त्यातून आपल्या जीवनात आनंद निर्माण करतात.

रानातील पानाफुलांनी शरीरे शृंगारून, विविध रंगांच्या मण्यांच्या किंवा कवड्यांच्या माळा गळ्यात घालून, डोक्यात पक्ष्यांची सुंदर सुंदर पिसे खोवून त्यांचे पूर्वज स्वैर जीवन व्यतीत करीत असत. पांढरपेशांशी संबंध येण्यापूर्वी त्यांच्या स्वच्छंदी जीवनातील आनंदाला उपमाच नव्हती. आजही स्वैर व स्वच्छंदी वृत्ति त्यांच्या स्वभावात प्रकर्षाने आढळते. ठाणे जिल्ह्यातील ठाकर, कातकरी, मल्हार कोळी आणि वारल्यांच्या बाबतीत हे खरे आहे.

एकंदरीत स्वतंत्र, स्वच्छंदी जीवनाची त्यांना उपजतच अतिशय आवड आहे. शिकारीची हौस भागविण्यासाठी रानांत दोनदोन–चारचार दिवस भटकण्यात, मासे पकडण्यासाठी नदीच्या पाण्यात तासन्तास डुंबण्यात त्यांना अवर्णनीय आनंद वाटतो. त्यात त्यांच्या स्वच्छंदी वृत्तीला जो मानमुराद वाव मिळतो तो कृत्रिम करमणुकीच्या कार्यक्रमात मिळत नाही.

आदिवासींच्या जीवनात नृत्याला जे स्थान आहे ते इतर कोणत्याही समाजात नसेल. त्यांची नृत्ये नेहमी सामुदायिक असतात. वैयक्तिक नृत्याची प्रथा या समाजात आढळून येत नाही. तसेच सर्वसाधारण भारतीय समाजामध्ये कुठेही आढळणार नाही, असे त्यांचे एक वैशिष्टच म्हणजे नृत्यात स्त्री आणि पुरुष दोघेही मोकळेपणाने भाग घेतात. वारली, मल्हार कोळी, ठाकर लोक दिवाळी, शिमगा यासारखे सण, वाघियाची पूजा, नारनदेवाची पूजा वगैरे विधी, लग्नासारखे समारंभ साजरे करीत असताना वेगवेगळ्या प्रकारची नृत्ये करतात. दिवाळी आणि नारनदेवाची पूजा यावेळची नृत्ये तर विशेष कलापूर्ण आणि प्रेक्षणीय असतात.

## खराखुरा आनंदाचा सण

आश्विन महिन्यांत सर्वत्र नवीन पिके तयार झालेली असतात. नवे धान्य घरात नुकतेच आलेले असते. जंगलांतील लाकूडतोडीचे धंदे सुरू झाल्यामुळे मजुरी मिळत असते. हातात चार पैसेही खेळत असतात. अशा वेळी येणारा दिवाळीचा सण आदिवासींना खराखुरा आनंदाचा सण वाटतो आणि म्हणून आदिवासी तो मोठ्या उत्साहाने साजरा करतात.

भाद्रपदाच्या दुसऱ्या पंधरवड्यात हळव्या जातीचे भात पिकू लागले की आदिवासी शेतकऱ्यांच्या जीवनात आनंद विलसू लागतो. तो आनंद त्यांच्या नाचण्यागाण्यातून व्यक्त होतो. दरवर्षी या महिन्यात रात्रीच्या शांत वेळी, दूरदूरच्या वस्त्यांवरून पावरी, तारपा, ढोल किनरी आणि बासरीचे मधुर स्वर हमखास कानी पडू लागतात. ठाणे जिल्ह्यातील आदिवासी विशेषत:

वारली, मल्हार कोळी, कोकणी हे तारपा वाद्य वाजवितात. तारपा हे वाद्य दुध्याभोपळ्यापासून तयार करण्यात येते. लांबट आकाराच्या पूर्ण पिकलेल्या भोपळ्याच्या आतील बिया वगैरे काढून त्याचे कवच स्वच्छ करतात व त्याच्या आत बांबूच्या दोन नळ्या घालतात. बांबूच्या नळीवर निरनिराळे सूर काढण्यासाठी भोके पाडलेली असतात. या नळ्या बासरीसारख्या असतात. या नळ्यांना जोडलेल्या दुध्याभोपळ्यामुळे हे वाद्य हुबेहूब गारुड्याच्या पुंगीसारखे दिसते. फरक एवढाच की नळीच्या खालच्या बाजूला ताडाच्या पानापासून, मेण लावून तयार केलेला एक कर्णा बसविलेला असतो. बैलाच्या शिंगाच्या आकारासारखा त्याला थोडा बाक असतो. कर्ण्यामुळेच या वाद्याला विशिष्ट आकार येतो.

## सायंकाळचा विरंगुळा

संध्याकाळी काम आटोपले की हौशी वारली, मल्हार कोळी तारपी वाजवावयास सुरुवात करतात. ते कमीत कमी दोन-तीन तास तरी तारपे तोंडावेगळे करीत नाहीत. तारप्याच्या सुरावर तरुण-तरुणी नाचतात. आश्विनाच्या प्रारंभापासून ते त्रिपुरी पौर्णिमेपर्यंत सुमारे दीड महिना रोज रात्री हा नृत्याचा कार्यक्रम चालू असतो. साधारण प्रत्येक पाड्यावर एखाद्या सोयिस्कर जागी सर्वजण जमतात. तारपे वाजविणारा मध्यभागी उभा राहून ते वाजवीत असतो. तो स्वतःही मोठ्या ऐटीत व लयबद्धतेने नाचत असतो व जागच्या जागी गोल फिरतो. त्याच्या भोवती पुरुष हातात हात धरून गोल गोल नाचतात. सर्वसामान्यपणे उंच व्यक्ती प्रथम व शेवटी सर्वांत ठेंगणी, अशी त्यांची रचना असते. स्त्रिया-मुलेही आपआपल्या उंचीप्रमाणे क्रम लावून फेर धरतात. नाचणाऱ्यांच्या रांगेतील पहिल्या एक-दोन उंच पुरुषांच्या हातांत घुंगरू लावलेल्या काठ्या असतात. नाचताना काठीचे एक टोक ते जमिनीवर आपटतात. त्यामुळे त्या घुंगरांचा 'छन्-छन्' असा तालबद्ध आवाज होत असतो. स्त्रिया एकमेकींच्या खांद्यावर हात ठेवून पुरुषांच्या भोवती नाचतात. नाचणाऱ्या पुरुषांनी नेहमी तारपेकरी जसा वळेल तसे वळावयाचे असते. कधीही त्याच्याकडे पाठ फिरवावयाची नसते. नाचणे रंगात आले की नाचण्यातील पावलांची लय पूर्णावस्थेला पोहोचलेला असतो. मध्यम, वयस्कर व वृद्ध स्त्री-पुरुष भोवती बसून नाच पहात असतात. तरुणांचे नृत्य पाहून त्यांना आनंद होत असतो. लहान मुले व मुली नृत्य पाहून नाचणाऱ्यांच्या घेराच्या कडेला मोठ्यांचे अनुकरण करीत करीत सराईत नाचणाऱ्याच्या भोवती नाचण्यास शिकत असतात. नाच रंगात आला की, त्यांची मोठी त्रेधातिरपिट उडते; परंतु तरीही त्यांच्या त्या इवल्याशा पावलांची हालचाल मनोवेधक असते. त्या लहान मुलामुलींच्या हौसेचे व उत्साहाचे मोठे कौतुक वाटते. रोज नाचण्यामुळे साधारण आठ-दहा वर्षांच्या मुलामुलींना तारपा नाच येऊ लागतो.

नाचण्यामुळे सर्वांगाला चांगला व्यायाम होत असतो. या दिवसांत सर्वांच्या अंगात उत्साह संचारलेला असतो. तो नुसता ओसंडत असतो. दिवसभर श्रमाची कामे केल्यानंतर सुद्धा रात्री तासन्‌तास नाचण्यात दंग होण्याइतका उत्साह त्यांच्यात स्फुरलेला पाहून पांढरपेशा मनुष्य आश्चर्यचकित होतो.

## विलोभनीय पदन्यास

तारपेवाल्याने सूर बदलले की नृत्याचा प्रकार बदलतो. शिवाय तो स्वतः पाय बदलून नृत्याचा निराळा प्रकार करण्याची सूचना देतो. सूर अत्यंत सोपे व साधे असतात. नाचता नाचता पुरुष बेहोष होऊन जातात. अंग आडवे-तिडवे करतात व मध्येच हर्रर्र हर्र... असा आवाज करतात. स्त्रियांमध्येही नाचण्यामुळे उत्पन्न होणारा जोष संचारलेला असतो; परंतु त्या बेहोष होऊन न जाता संयमपूर्ण पावले टाकीत असतात. एकमेकींच्या खांद्यावर हात ठेवून अगर दंड धरून त्यांनी हातांची साखळी तयार केलेली असते. त्यांचे पदक्षेप व हातांच्या साखळीची हालचाल अत्यंत लयबद्ध व म्हणूनच विलोभनीय असते.

या नृत्यांत गाणे म्हणावयाचे नसते. टाळ्यांचा नाच, बदक, मोर, पाठशिवी वगैरे तारप्यावरील नृत्याचे अनेक प्रकार आहेत. हिरव्या, तांबड्या रंगाच्या साड्या नेसून, झेंडूचे गजरे घालून नाचणाऱ्या सुश्लिष्ठ तरुण स्त्रिया आणि गळ्यात रंगीबेरंगी रुमाल बांधून हातात घुंगरांच्या काठ्या घेऊन नाचणारे कणखर अंगकाठीचे पुरुष यांच्या संयुक्त नाचाचे दृश्य मोठे लोभस वाटते. तारप्याचे सूर ऐकले की, आपलेही पाय स्फुरण पावू लागतात, त्यांचे नृत्य पाहता पाहता भान

हरपते आणि आपणही त्यात सामील होऊन त्यांच्याप्रमाणे जीवनाचा निरागस आनंद लुटावा अशी इच्छा हा नाच पाहणाऱ्याला नकळत होत असते.

आदिवासींच्या जीवनात नृत्याप्रमाणेच लोकगीतांचेही स्थान फार मोठे आहे. वाङ्मयाचा संपूर्ण अभाव असल्यामुळे त्यांची संस्कृतीही त्यांच्या पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या गीतांच्या आणि कहाण्यांच्या द्वारेच टिकून राहिलेली आहे. त्यामुळे त्यांच्या लोकगीतांचा अभ्यास केल्याशिवाय त्यांच्या संस्कृतीचे सम्यक् दर्शन होणे कठीण आहे. त्यांच्या सर्व आशाआकांक्षा त्यांच्या लोकगीतांतून व्यक्त झालेल्या आढळतात. त्यांच्या कल्पनाशक्तीचा जो काही थोडा विकास झालेला आहे तो त्यांच्या लोकगीतांतून आढळून येतो.

जीवनातील महत्त्वाच्या बहुतेक सर्व प्रसंगांना उद्देशून आदिवासी गीते रचलेली असतात. पद्याच्या दृष्टीने त्यांत सूत्रबद्धता असतेच असे नाही. संगीताच्या कसोटीवर ही गीते तितकीशी टिकणार नाहीत. गीतसंग्रह विपुल असला तरी स्वरविलाप वगैरेची वाढ झालेली नसल्यामुळे गीतांच्या चाली व सूर ठराविक असतात. कधीही एकटा–दुकटा माणूस गात नाही. दोन–तीन माणसे मिळूनच गातात. ज्या प्रसंगांना अनुलक्षून गीते रचलेली असतात त्या प्रसंगीच ती म्हटली जातात, एरव्ही म्हटली जात नाहीत.

## प्रसंग नुरुप गाणी

वारली, मल्हार कोळी, कोकणी जमातींच्या लोकगीतांची विषयवार वर्गवारी करावयाची झाल्यास चार प्रमुख भाग पाडता येतील. लग्न आणि त्यातील वेगवेगळे प्रसंग यांना उद्देशून असलेली गाणी, नारनदेवाच्या पूजे–अर्चेच्या वेळी म्हटली जाणारी गाणी, मृताची उत्तरक्रिया करतेवेळी म्हटली जाणारी गाणी, धान्य, समृद्धी, सण यांना उद्देशून असलेली, मळणी आणि होळी वगैरेसारख्या प्रसंगी म्हटली जाणरी गाणी असे चार भाग पडू शकतात. याखेरीज ज्यात फारसा गंभीर अर्थ नाही अशी अत्यंत छोटी छोटी अर्धवट गीतेही आढळतात. लहान व तरुण मुली अशी गाणी लग्नाच्या प्रसंगी अगर शिमग्यासारख्या सणाच्या वेळी म्हणतात.

नारनदेवाचा संबंध धान्य आणि पिकांच्या समृद्धीशी आहे. त्यामुळे भाद्रपद महिन्यात नवे तयार झालेले भात खाण्यापूर्वी ठाणे जिल्ह्यातील वारली, मल्हार कोळी प्रथम नारनदेवाची पूजा करतात. त्याप्रमाणे माघ महिन्यात शुद्ध बीजेला नारनदेवाची पूजा होते. त्या वेळी लोक नाचतात आणि निरनिराळ्या देवांना नमस्कार करून 'तुझी वेडी बागडी बालके नाचतात, त्यांना संभाळून घे,' अशी प्रार्थना करतात.

**नारन देवा तुझा बेडांर । नाचू दे बापडा**
**बेडां नाचर बेड संदा । गहलां नाच गहलां संदा**
**बहरम देवा तुझा बेडांर । नाचू दे बापडा**
**बेडां नाचर बेडसंदा । गहला नाच गहलां संदा**

धरतरी मातेबद्दल आदिवासींना अपार प्रेम. धरतरी मातेच्या पोटांत नांगराचा फाळ कसा घालावा? या भावनेने काही आदिवासी नांगराने जमीन नांगरत नाहीत. तेच प्रेम आदिवासींच्या इतरही गाण्यांतून पदोपदी दिसते. नाचताना धरतरी, कणसरी, गायतरी मातेला पाय लावून मी कसा नाचू? अशीच त्याची भावना बनलेली आहे. त्यासाठी तो म्हणतो–

**अथ नाचू का कोठरं नाचू । धरतरेच्या पाठीवर**
**धरतरी माझी मायु र। तिला मी पाय कसा लावूं र**
**अथ नाचू कां कोठरं नाचू । गावतरेच्या पाठीवर**
**गायतरी माझी मायु र तिला मी पाय कसा लावूं र**
**अथ नाचू कां कोठरं नाचू । कनसरीच्या माल्यावर**
**कनसरी माझी मायु र । तिला मी पाय कसा लावूं र**

नारनदेवाच्या पूजे–अर्चेच्या वेळी जी गाणी म्हटली जातात त्यात पावसाळ्यातील परिस्थितीचे सर्व उल्लेख आढळतात. पूजेच्या वेळच्या गाण्यात सर्व देवांची सभा भरली असून तीत नारनदेव मुख्य श्रेष्ठ देव आहे असे वर्णन दर्शविलेले असते. या गाण्यांतून ज्या देवांची नावे येतात ते म्हणजे 'ढगेसर, बीजेसर, पावशा, हिमाई आणि बहरम. नारनदेव हा पावसाचा देव असल्यामुळे त्याच्या लग्नात बहरम मध्यस्थ वऱ्हाडक्या असतो, गरजाईदेवी म्हणजे वीज ही नारनदेवाची वधू बनते. गरजेसर देव म्हणजे गर्जना करणारे ढग वाजंत्री वाजविणारे तुर्ये झालेले असतात. बिजेसरदेव बत्त्या होतात व सर्वांना प्रकाश देण्याचे काम करतात. पार्वती आणि गंगा ह्या सवाष्णींची कामे करतात. हिमाईदेवी करवली होते. पावशा सर्व देवांना आंघोळ घालतो. अशा थाटाचे नारनदेवाचे लग्न हाही गाण्याचा विषय असतो.

**यो नारनदेव तो नवरा झाला**
**मांगुल गातां नाय नेय**
**यो बरहमदेव तो वऱ्हाडक्या झाला**
**मांगुल गातां नाय नेय**

तर काही गाण्यांतून नारनदेव लग्नाला निघाला आहे त्याचे रसभरित वर्णन केलेले असते.

**नारनदेव चालता जो आला हो**
**कसरभर रेशमी शेला हो**
**रेशमी टोपी माथी भरून आला हो**
**देवा घरशी काठी घे थली हो**
**हाती काठी घेत आला हो**

नारनदेवाच्या पूजेच्या वेळी मध्यभागी पाटावर देव ठेवून त्याच्यापुढे दिवा लावून ठेवतात किंवा भाताची रास करून तीवर देव ठेवतात. जवळ दिवा लावतात आणि त्याच्या भोवती पुरुष नाचतात. प्रथम एखादा प्रमुख पुरुष एखाद्या गाण्याचे एक चरण सांगतो. त्याच्यानंतर देवाभोवती फेर धरून नाचत नाचत सर्व पुरुष तो चरण म्हणतात. त्यांच्या मागून भोवती बसलेल्या स्त्रिया तो चरण पुन: म्हणतात. पुरुष पायात घुंगरे घालतात. नाचता नाचता ते खाली वाकतात व दोन्ही बाजूला वळतात. या नृत्यात स्त्रिया भाग घेत नाहीत. घुंगरांच्या नादावर सर्व जमाव 'वनीत भंवरा फिर ग मैना वनीत भंवरा फिर...' असे लोकगीत म्हणू लागतात. त्यात आपोआप गोडी निर्माण होऊ लागते आणि सर्वजण नाचण्यात दंग होऊन जातात.

### गाण्यातून प्रश्नोत्तरे

नारनदेवाच्या कांबड नाचाचा आणखी एक प्रकार आहे. पुरुष पाना-फुलांनी शरीरे शृंगारून काही विशिष्ट सोंगे घेतात. त्यांना दुसरे पुरुष गाण्यातून प्रश्न विचारतात. ते त्यांना उत्तरे देतात आणि पुन: सर्वजण नाचण्यासाठी फेर धरतात. थोडा वेळ थांबून पुन: प्रश्नोत्तरे होतात. ह्या प्रश्नोत्तरात बहुधा ज्याचे सोंग आणलेले असेल त्याची चेष्टा केलेली असते. त्यामुळे भोवतालच्या लोकांना गंमत वाटते. सर्कशीतील विदूषकाच्या चेष्टांचे स्वरूप या नाचाला येते. या नृत्यातील गाणीही उपरोधी, चेष्टा, नर्म विनोद निर्माण करणारी असतात.

**ठेस मोगरा घुले बाजारा जाय रं**
**जोडव्या घेऊन दिली तरी क्या ग बोलत नाय**
**ठेस मोगरा घुले बाजारा जाय रं**
**साडी घेऊन दिली तरी क्या ग बोलत नाय**

दारूचे महत्त्व आदिवासींना नेहमीच असणार. साध्यासाध्या गाण्यातून दारूचे महात्म्य तो सांगत असतो आणि हे सांगता सांगताच कांबडनाच करत करतो.

**आंबट आंबाडी खाली रं । आंबट आंबाडी खाली रं**
**गला माझा बसेला रं । गला माझा बसेला रं**
**दारुचे बाटलेनु रं । दारुचे बाटलेनु रं**
**गला माझा सुटेल । गला माझा सुटेल**


शुभेच्छा –

## मे. उबाळे इंजिनिअरिंग वर्क्स

**मेकॅनिकल, स्ट्रक्चरल, इंजिनिअर्स व गव्हर्मेंट सप्लाअर्स**

**ऑफिस :** उबाळे क्लॉथ व ड्रेसेस्
सदर बझार, जालना ४३१ २०३
टे. २६२३

**फॅक्टरी :** ए–९।१६ ॲडि.
एम्. आय्. डी. सी., जालना ४३१ २०३
टे. ३१७७ पी. पी.

भाद्रपद महिन्यात वारा आणि पाऊस हे एकाच वेळी आल्याने नागली, वरईच्या शेतीचे मोठे नुकसान होते. नागली, वरईच्या शेतीवरच आदिवासीचे जीवन अवलंबून असल्याकारणाने त्याच्या गाण्यातून ती भावना प्रगट होते.

**भादवडी बांध बांधला, वाऱ्या पाऱ्या नु नेला**
**नागली रोप लावल, वाऱ्या पाऱ्या नु नेला**
**भादवडी बांध बांधला, वाऱ्या पाऱ्या नु नेला**
**वरई रोप लावल, वाऱ्या पाऱ्या नु नेला**

प्रत्येक देवाची पूजा करताना प्रामुख्याने त्यांना काय अर्पण करावे हे पुढील एका लहानशा गाण्यात सांगितले आहे.

**अर नारना तुझी पूजा रं, नांगरे रोडवती र**
**अय कणसरे तुझी पूजा ग, टिचक्या बांगडयांची ग**
**अय सवरे तुझी पूजा गं, सेंदरे गुलालाची ग**
**अर चेडोबा तुझी पूजा रं, कावडे कोंबडयाची रं**
**अर वाघोबा तुझी पूजा रं, दावणे बोकडाची रं**

पावसाळा सुरू झाला की, विशेषत: पेरण्या आटोपल्यावर कोलीची भाजी खाल्ल्यावर गौरीनाच करण्याची प्रथा आहे. हा नाच गौरी–गणपती संपल्यानंतर समाप्त होतो. गौरी–नाचाची गाणी अर्थपूर्ण व भावपूर्ण असतात. नाचाच्या सुरुवातीला प्रथम निरनिराळ्या देवांना वंदन केलेले असते. जसे–

**पहिला नमीन, नमू कोणाला रं**
**चंदर सूर्याला नमीन, चंदर सूर्याला रं**
**दुसरा नमीन नमू कोणाला रं**
**धरतरी मातेला नमीन, धरतरी मातेला रं**
**तिसरा नमीन कोणाला रं**
**कणसरी मातेला नमीन, कणसरी मातेला.**

येणेप्रमाणे सर्व देवांना नमस्कार करून झाल्यावर शेवटी सभा बैठकीला नमन केले जाते व त्यानंतर पुढील नाच सुरू होतो. गौरी–नाचाचा काळ पावसाळ्यात असतो. सारी सृष्टी हिरवीगार झालेली असते. चोहोकडे पाणीच पाणी झालेले असते. अशा वेळी गाण्याचा रंगही असाच हिरवळीने बहरलेला असतो.

**नारळी बाग लावला ये माझ्या बंदवा**
**नारळी बागे केवडा दणनेला**
**सोपारी बाग लावला ये माझ्या बंदवा**
**केलयी बाग लावला ये माझ्या बंदवा**

गौरी–नाचातील भावपूर्ण गाणी बऱ्याच वेळा उपरोधाने व उद्देशून म्हटली जातात. गाण्यातून मनातील भावना, वेदना प्रगट केल्या जातात. पाण्यातील बेडका, तू तरी याचे उत्तर दे. माझ्याकडे कोणाचेच लक्ष नाही. तू तरी याचे उत्तर दे, अशी अपेक्षा करून एक सुंदरी म्हणते–

**पाण्यातले बेडूकबाय क्या ग बोलस नाय**
**बोटीला जोडवी नाय तरी मेल येऊन बघत नाय**
**पाण्यातले बेडूकबाय क्या ग बोलस नाय**
**मुन्यात तोढे नाय तरी मेल येवून बघत नाय**
**कमरेला साडी नाय तरी मेल येवून बघत नाय**
**उरी चोळी नाय तरी मेल येवून बघत नाय**
**पाण्यातले बेडुकले क्या ग बोलस नाय**

गौरी-नाचात मुली नटून-थटून नाचत असतात.त्याचेही वर्णन गौरीच्या गाण्यातून वारंवार आलेले दिसते. गावातील निरनिराळ्या जाती–जमातींच्या पोरींचे हे वर्णन विलोभनीय असते.

**झिम झिम झिम पाऊस पडे नयला आला लोंडा**
**कोळयाच्या पोरी गेल्या पाण्याला ग, भिजेला**
**रेशमी लाल गोंडा.**

येणेप्रमाणे प्रत्येक जमातीचा उल्लेख करून वरील चरण पुन्हा पुन्हा म्हटले जाते. गौरी-नृत्यांत प्रेमिकांची गाणीही मधून मधून म्हटली जातात. 'बाजाराला जाऊं, साडी, चोळी, दागिने घेऊ व मनाप्रमाणे मौज करू' असा साधारण त्यांचा आशय असतो.

**चल जाव बाजाराला ग रंगे, चल जाव बाजाराला**
**कास्याचा बाजार ग रंगे, कास्याचा बाजार**
**तिथे तोडयांचा व्यापार ग रंगे, तिथे तोडयांचा व्यापार**
**मुन्यांना तोढे तुला ग रंगे, हातातली अंगठी मला ग**
**तिथे साडयांचा व्यापार ग रंगे, तिथे साडयांचा व्यापार**
**लाल लाल साडी तुला ग रंगे, किनारी धोतर मला ग.**

गौरीनाच संपला, दिवाळी संपली की पुढे हंगाम येतो लग्नाचा. लग्नाच्या प्रसंगी जी गाणी म्हटली जातात ती 'धवलेरी' नावाची पुरोहित स्त्री म्हणते. तिला साथ देणाऱ्या तिच्या मदतनीस स्त्रिया असतात. लग्नप्रसंगी पूर्वी देवांनी ज्या चालीरीती अवलंबिल्या त्या आपण माणसांनीही पाळल्या पाहिजेत असे बऱ्याच गीतांत सूचित केलेले असते. लग्नविधीतील पहिला प्रसंग साखरपुड्याचा म्हणजे 'बोल करण्याचा' असून त्या वेळी जी गाणी म्हटली जातात त्यात पार्वतीच्या साखरपुड्याचे वर्णन असते. यासाठी सर्व देव जमलेले

आहेत अशी कल्पना केलेली असते.

**तले भरले चांदा हो, सूर्य चांदा हो**
**भरले ढगेसर देव**
**देव आला सोन्याचे दारोठी**
**दारोठी कसा उभा हो, राही उभा हो....**

ज्या ठिकाणी साखरपुडा व्हावयाचा आहे तेथे चंद्र, सूर्य, ढगेश्वर हे देव जमून आलेले आहेत. ज्या घरात वधूची ओसरी भरावयाची आहे त्याचे दार सोन्याचे असून त्या दारात हे देव येऊन उभे राहिले आहेत ही या गाण्यातील कल्पना आहे. प्रमुख देवांच्या मागोमाग इतर सर्व देव क्रमाक्रमाने येतात. त्यांचे वर्णन केलेले आहे. तेच चरण पुन्हा उच्चारून फक्त वेगवेगळ्या देवांची नावे या गीतात घेतली जातात. मेघेसर, ऊपरेसर, वेलुसर, रुपावत, सोनावत, फुलावत, मोगराव, कोठरीत, हिरोबा, चेडोबा, नारन्देव, हिमाईदेवी, वाघोबा, गावचा देव, शिवेचा देव वगैरे सर्व देव तेथे येतात. वरील देवांच्या नावात नारन्देव, हिरवा, हिमाई व वाघोबा हे त्यांचे विशिष्ट देव तर आहेतच; परंतु त्याखेरीज उमरेसर, फुलावत, सोनावत वगैरे नावांवरून जरुरीच्या प्रत्येक शक्तीला किंवा जड वस्तूलाही देवता बनविण्याची त्यांची प्रवृत्ति आढळून येते. उंबर, फुले, सोने वगैरेनाही देवतारूप कल्पिले आहे. सर्व देवांच्या आगमनानंतर ईश्वरदेव पार्वतीची ओटी भरून तिचा साखरपुडा करतो. ह्या जशा चालीरीती देवांनी अवलंबिल्या तशाच त्या माणसांनी अनुसराव्यात असा शेवटच्या कडव्याचा भावार्थ असतो. ते कडवे खालीलप्रमाणे आहे.

**देव आले सोन्याचे दारोठी**
**ईसरदेवानं भरले पारवतीचे ओटे**
**भरले पारवतीचे ओटे**
**ये देवांचे हो रिती**
**ये मांजानं हो केल्या**
**ये मांजानं हो केल्या**

प्रत्यक्ष लग्नविधीला सुरुवात होण्यापूर्वी जी प्राथमिक तयारी करावी लागते, तिच्यात भात भरडून, कांडून तांदूळ करून ठेवणे हे एक प्रमुख काम असते. पाड्यावरील सर्व स्त्रिया जमून हे काम करतात. त्या वेळी त्या काही गाणी म्हणतात. लग्न झालेल्या स्त्रीने कोणकोणती वस्त्राभरणे सौभाग्य-चिन्हे म्हणून वापरली पाहिजेत हे खालील एका गाण्यात वर्णिलेले आहे.

**या कमरेची साडी**
**या उरीची चोळी**
**या गलेची हो हारां**
**या नाकीच्या हो मोती**
**या डोळीचा काजल**
**या कपाळीचे टिचकी**
**या भांगीचा सिंदूर**
**या माथीचा कुलुक**

लग्नसमारंभात लग्नमंडप बांधण्याच्या वेळी उंबराचे फार महत्त्व असते. उंबराची फांदी मोठ्या समारंभाने मोडून आणून तिची मुहूर्तमेढ म्हणून स्थापना करून मग मांडवबांधणीचे काम चालू होते. मांडव बांधणीला सर्व देव आलेले आहेत. प्रत्येक देव मांडवबांधणीसाठी दर खणत आहे अशी काही गाण्यांची मध्यवर्ती कल्पना असते.

**सूर्यान दर खणियेला किरणापतीन दर वाकरेला**
**ब्रह्मदेवान दर खणियेला रेघापतीन दर वाकरेला**

येणेप्रमाणे प्रत्येक देव ढगेसर, पावशा, नारन, गाज, चांद. वाघोबा, हिरोबा, चितोळा क्रमाक्रमाने मांडवबांधणीचे कामाला येतात व शेवटी उंबऱ्या आणि सवासनी येऊन मांडव बांधतात अशी कल्पना केलेली असते. लग्नाच्या धार्मिक विधीत याला विशेष महत्त्व दिलेले असते. लग्न लागल्यानंतर सुलगीत म्हटले जाते. त्यात हे लग्न कोणाचे आहे हे सांगण्यासाठी सर्व देवदैवतांचेच हे लग्न आहे अशी कल्पना केलेली असते व शेवटी नवरदेवाचे नाव घेतले जाते.

**आगाशी मांडव धरतरे बहोला**
**सुलगीन लागेला कोणे ग देवाचा**
**सुलगीन लागेला चंदर देवाचा**
**सुलगीन लागेला दह्या ग देवाचा**
**सुलगीन लागेला वाघोबा देवाचा**
**सुलगीन लागेला.........बाळाचा**

लग्नाच्यापूर्वी वारली, मल्हारकोळी जमातीत जे देवतापूजन होते त्या वेळी सुवासनी स्त्रिया भिंतीवर तांदळाच्या पिठाने चौकोनात चित्रे काढतात. त्या प्रसंगी गाणे म्हटले जाते. या आकृती काढताना जे साहित्य वापरले जाते ते शुद्ध नसून काहीसे अशुद्ध असले तरीही ते देवाने पवित्र मानून घ्यावे व क्षमा करावी म्हणून देवाची विनवणी गाण्यातून केलेली असते. देवाच्या पूजेच्या वेळी किंवा त्याची भक्ती

करताना माणसाने स्वत: किती शुद्ध विकाररहित असले पाहिजे आणि किती शुद्ध पूजासाहित्य वापरले पाहिजे यासंबंधीची आदिवासींची ही कल्पना विशेष उल्लेखनीय आहे यात शंका नाही. लग्नात देवकारणाला एक विशेष महत्त्व असते. सर्व देवांना त्या वेळी बोलवून त्यांना वंदन करण्यात येते. सुवासनी बोलवून तेवणही पाडण्यात येते. त्या वेळी खालील गाणे म्हटले जाते.

**सुरीयांचा कांडा नागवेली पान वावयाहो**
**बोलवा बाभण बोलाव्या चवघी सवसनी**
**चवघी सवासनी आल्या जो मंडपी चालतो आली.**
**आशाचा शब्द बाभणचवद तेलू पडशुद्ध चावलीया**
**शुद्ध चावलिया आज नोवरा यो हिरोबा देव पडीग**
**तेलाचे धार ।।**

लग्नाच्या प्रसंगी गाण्यात प्रत्येक जण लग्नमंडपात कसे कसे प्रवेश करतात याचे वर्णन करण्यात येते. अर्थात तेच तेच चरण निरनिराळ्या देवांची नावे घेऊन गायले जातात. म्हातारं लग्नाचं गाणं यात हे वर्णन सविस्ताराने दिलेले आहे. लग्न लागल्यानंतरही गाण्यांचा कार्यक्रम चाललेला असतो. त्या गातांना सुलगीत म्हणतात. त्यात गाण्यातून लगीन कोणाचे लागले हे सांगण्यासाठी साऱ्या देवदेवतांच्या व निसर्गातील घडामोडींच्या उपमा दिलेल्या असतात व गाण्याचे अखेरीस नवऱ्या मुलाचे नावाचा उल्लेख असतो.

**सुलगीन लागेला कोणे ग देवाचा**
**सुलगीन लागेला चंदर सूर्याचा**
**सूर्यान परनली रिकणा पत बाल**
**सुलगीन लागला ब्रह्मा ग देवाचा**
**ब्रह्मान परनली रेघापत बाल**
**सुलगीन लागला वाघोबा देवाचा**
**वाघोबानं परनली गांव ग देवी**
**सुलगीन लागला.........बालाचा**
**.........परनली पत बाल**

शिमग्याच्या वेळी सनई, ढोल व टिमकी, तूर इत्यादी वाद्यांचा उपयोग करतात. शिमग्याच्या नाचात वाद्ये वाजविणाऱ्यांच्या भोवती तरुण व लहान मुले 'भलो र···, भलो···र···' म्हणत नाचतात. या नाचात लयबद्धता मुळातच कमी असते. केवळ धांगडधिंगा असतो. होळीपूर्वी महिना-पंधरा दिवस रोज रात्री होळी पेटवून तिच्याभोवती मुले नाचतात. या नाचात स्त्रिया मुळीच भाग घेत नाहीत.

होळीच्या प्रसंगाला जी गाणी म्हटली जातात त्याचा एक नमुना खाली दिला आहे.

**होलू बायला सिनगार केला कयाचा ग**
**होलू बायला सिनगार केला नारळाचा**
**होलू बायला सिनगार केला शेंदराचा**
**होलू बायला सिनगार केला कुकवाचा**
**होलू बायला सिनगार केला तांदळाचा**
**होलू बायला सिनगार केला पापडयांचा**

कोणत्याही लग्नापूर्वी देवपूजनासाठी आदिवासी स्त्रिया भिंतीवर चौक काढतात. त्यात अनेक लहान-मोठ्या आकृत्या व वेलबुट्टी काढलेली असते. चंद्र, सूर्य, कोंबडा, माणसे, बैल, बोकड इत्यादी प्राण्यांच्या त्या आकृती साध्या काडीने काढलेल्या ह्या आकृत्या व वेलबुट्टया सुंदर रांगोळीप्रमाणे शोभून दिसतात.


जीवनातील साध्या प्रसंगातून, भोवतालच्या नैसर्गिक स्थितीतून आणि कष्टाच्या कामातून निरागस आनंद लुटण्याची आदिवासींची ही वृत्ति आणि तिला पोषक अशा त्यांच्या सवयी, चालीरीती शृंगार, नाच व गाणी ही सर्व आता उत्तरोत्तर पांढरपेशांशी अधिक निकट संबंध येऊ लागल्यामुळे लोप पावू लागली आहेत. खरोखर पाहिले तर नैसर्गिक जीवनातील आनंद उपभोगण्याची ही कला बहुमोल आहे. आधुनिक यांत्रिक जीवनपद्धतीमुळे आज लाखो लोकांचे जीवन नीरस बनत आहे. मनोरंजनाच्या कृत्रिम व अनैसर्गिक साधनांनी ते सह्य बनविण्याचा एक मोठा परंतु अती व्यर्थ ठरणारा खटाटोप जगभर चालू आहे.

ठाणे जिल्ह्यातील सहा-सात लाख आदिवासींची वस्ती दऱ्याखोऱ्यात पसरली आहे. ह्या सर्व वस्तीतून एकवार फिरून पाहिले तर अज्ञान, दारिद्र्य, व्यसने, भांडवलदार, जमीनदारवर्ग यांनी आदिवासी पुरा गांजला आहे. हे दृश्य पाहिल्याने मन द्रवते, अश्रू वाहतात, हृदय भरून येते. अशा अनेक अडचणांनी गांजलेल्या लोकांना जेव्हा सुधारणेचे संस्कार प्राप्त होतील, त्यांचे आरोग्य सुधारेल व अज्ञान दूर होईल त्याच वेळी ह्या आदिवासींचा खरा उद्धार होईल.

**( संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१. )**

( 'आदिवासींची गोड गाणी' या पुस्तकावरून ) ■

# आदिवासींची लोकगीते



सोपानदेव चौधरी

लोकगीतांतील आदिवासींच्या या भाषेत एक अंगभूत असा गोडवा आढळून येतो. त्यांची गोडी रान-मेव्यासारखी मधूर आहे. आदिवासी लोकांच्या जीवनात निसर्गाची शिकवण जास्त आहे. कारण निसर्गाने त्यांना जेवढे शिकवले तेच त्यांचे ज्ञान होऊन बसले.

जिभेला सहजगत्या उच्चारता येतील असेच त्यांचे शब्द असतात. स्वराव्यतिरिक्त व्यंजनांच्या वर्गापैकी दंत्यवर्ग व औष्टयवर्ग हेच वर्ग त्यांना सहजगत्या उच्चारता येतात. बाकी वर्गापैकी काही व्यंजनेच त्यांच्या जिभेला मानवतात. त्यामुळे शब्दांचे अपभ्रष्ट रूप होणे साहजिकच असते. हा त्यांचा दोष असला तरी या सहजपणामुळे त्यांच्या काही शब्दांत एक प्रकारचा गोडवा निर्माण झालेला आढळून येतो. आंब्याचे ऐवजी आंबयाचे, मेथीची ऐवजी मेथईची, चांपयाचे ऐवजी चांपयाचे इत्यादि शब्द कानांवर आले म्हणजे व्रज-भाषेतील मोहाळी अनुभवायला मिळते. हृदयाच्या ओलाव्यांतून निघालेले हे शब्द किती लाडिकपणा घेऊन येतात ! याची साक्ष पटते !

आदिवासी लोकांच्या जवळ जेवढी साधने उपलब्ध तेवढेच ज्ञान त्यांच्या पदरी पडते. सहजपणे मुखांतून येणारी शब्दसंपत्ती हेच त्यांचे वाङमय व वीसपर्यंतच्या आकड्यांवर त्यांचे गणित ! हातापायाला मिळून वीस बोटे असतात. तेव्हा अर्थात विसावर त्यांची गणती चालते. पाच विसांचे शंभर होतात ते शिक्षितांनी ज्यांचे त्यांनी पाहून घ्यावे ! फक्त वीस या संख्येवर आदिवासी आपले गणित सोडवीत असतात. हातांनी आणि बोटांच्या वीतीने ते कापडचोपड मोजतात. गज आणि फूटपट्टी त्यांना कुठून माहीत असणार ? संगीताच्या बावीस श्रुतींपैकी तीन-चार स्वरच त्यांना अवगत असतात. 'खालतल्लं अंग' आणि 'वरातल्लं अंग' या दोन दिशाच त्यांना माहीत असतात. दशदिशांपैकी या दोन दिशांवर ते पहाड-डोंगरातील प्रवास करतात. या आदिवासी जनात पिढ्यान् पिढ्या शिक्षणाचा गंध नाही. साधी साक्षरता त्यांच्या पदरी पडली नाही तर अशा स्थितीत साहित्य-संगीताची, परार्धाची अन् दिगंतराची त्यांना ओळख कशी व्हावी ? असे असताना देखील त्या साधनांवर आणि त्यातून मिळालेल्या अनुभूतीवर ही साधीभोळी गाणी आदिवासींनी मागे ठेवली आहेत.

## शब्दांचे नादब्रह्म

पेठच्या बाजूला एकदा प्रवासाला गेलो असताना आदिवासी जनांची ही गाणी मला ऐकायला मिळाली आहेत. एका मोठ्या भोपळ्याच्या पुंगी-वादनावर (तारपी) ही गाणी चालली होती. गेयता या गाण्यांचे वाहन दिसून आले. या पद्धतीच्या गीत-गायनात त्यांनी शब्दब्रह्म आणि नादब्रह्म उभे केलेले माझ्या अनुभवाला आले. ती गाणी ऐकल्यावर नागरीजन तल्लीन झाल्याशिवाय रहाणार नाहीत.

आदिवासी जनांच्या या गीतात काही ठिकाणी मात्रांचा सैलपणा व रचनाशैथील्य असते आणि ते असणे स्वाभाविक आहे. तरीपण त्यांचे गीतगायन चालू असताना दोष तितकासा खटकत नाही. त्यांच्या हृदयातील काव्य हे मुळातच गेयता घेऊन आलेले असल्यामुळे गीतगायनाला शब्द आणि भावना ही साद प्रतिसाद देत असल्याचे प्रत्ययाला येते. आजचे आमचे

नवकवी गाण्यांकडून म्हणीकडे व म्हणीकडून गद्याकडे झुकत चालले आहेत. शास्त्र या दृष्टीने आदिवासी आणि नवकवी यापैकी आज कोण प्रगतिपथावर आहे? असे मोठे प्रश्नचिन्ह डोळ्यांसमोर उभे राहते !

आदिवासींची बहुतेक गाणी निसर्गाच्या शिकवणीने, संकेताने गायिलेली, त्याचप्रमाणे आदिवासी जनांच्या चालीरीतीतून उत्स्फूर्त झालेली आढळून येतील. आंब्याला मोहोर आला म्हणजे लग्नसराई सुरू होते. आदिवासी भगिनी आंब्याच्या झाडाकडे पाहते. त्या आंब्याला मोहोर आलेला नसतो. लग्नाला आलेल्या आपल्या लाडक्या भावाची तिला आठवण होते आणि ती गाऊ लागते—

**आंब्या मोवूरा मोवूरा कधी येसी ?**
**भाऊ नवरा नवरा कधी होसी ?**

मोहराने आंब्याचे झाड पिवळे कधी होईल, अन् आपला भाऊ हळद लागून पिवळा धम्मक कधी होईल? हा विचार काव्यरूपाने तिच्या अंतःकरणात येतो. आंब्याच्या झाडाला ती विनंती करते. तुला एकदाचा मोहोर येऊ दे आणि माझ्या लाडक्या भावाचे लग्न होऊ दे. देवाब्राह्मणांपेक्षा ती आंब्याच्या झाडाला जास्त मानते.

आदिवासी लोक टोळ्या करून राहत असत, अजूनही राहतात. अगदी कुत्र्यांच्या हाकेवर त्यांच्या नातलगांची वस्ती असणार. एक सासुरवाशीण मुलगी आपल्या माहेरी निरोप पाठविते. 'रुणझुण पांखरा, जा माझ्या माहेरा' पक्षाला सांगितलेले निरोप आतापर्यंत सर्वांना माहीत असतील; परंतु फुलपाखराला निरोप्या म्हणून कुणी माहेरवाशिणीने पाठविले आहे का ? ही माहेरवाशीण फुलपाखराला सांगते —

**झारझुरू पांखरू मैना ग। आचडा निरोप मैना**
**सांगजो बापालं, मैना**

फुलपाखराला निरोप्या म्हणून पाठविण्यात केवढी रसिकता भरलेली आहे ! त्या रसिकतेच्या मागे एक हेतु दडून बसला आहे हेही विसरता कामा नये. त्या माहेरवाशिणीला शहरी स्त्रियांप्रमाणे फुले काढलेली साडी पाहिजे होती. त्याशिवाय ती फुलपाखराला निरोप्या म्हणू कशी पाठविणार ?

आईबापांना मुलीचा लळा असतो. मुलगी सासरी निघाली की गायी पाण्यावर येतात. अंतःकरण हुंदका देऊ लागते. सासुराला जाताना कन्या मागे वळून पाहते. अंतःकरणाला पाझर फोडणारे ते दृश्य असते. त्यासंबंधी आदिवासींचे खालील गीत पहावे.

**चांपयाची कळी री चांपयाची कळी**
**कोणी ती वाढविली, बापानं वाढवीली**
**परदारी मायी ... गेली !**

आदिवासीं लोकांमध्ये मुलीला बापाचा जास्त लळा दिसून येतो आणि तेच निसर्गाला धरून आहे.

**चांदा पासली चांदनी ग चांदनी**
**हीत कोनाची लाडकी ग**
**हीत बापाची लाडकी ग**

अशी जिव्हाळ्याची गाणी अर्थातच आदिवासी स्त्रियांनी गायिली आहेत. याव्यतिरिक्त राम—कृष्ण देवादिकांवरही काही गाणी आढळून येतील. सदरहू गाणी ठराविक चाकोरीतील असली तरी त्यांत देवांविषयी भाविकता, कृतज्ञता पुरेपूर भरलेली दिसेल. आदिवासी जनता ही निसर्गाचीच लेकरे असल्यामुळे चंद्र, सूर्य, तारांगण, धरित्री, पाऊस यांनाच ते देवता मानतात. विजेचा चमचमाट करणारा डोंगर आणि मेघांची गर्जना करणारा डोंगर या देवतांचे गाणे ऐकल्यावर याची सत्यता पटण्यासारखी आहे.

**गरज्या डोंगर गरजतो, गरजतो**
**इजल्या डोंगर इजलतो, इजलतो.**

या गाण्यांचा दुसरा एक स्वतंत्र भाग म्हणजे 'लग्नसमारंभात म्हणावयाची गाणी' हा होय. नवरा नवरीला हळद लागल्यापासून तर लग्नसमारंभ संपल्यानंतर हळद उतरण्यापर्यंतची गाणी या भागात दिलेली आहेत. काव्याबरोबरच विशेषतः त्यांच्या चालीरीती अभ्यासण्यासारख्या आहेत. लग्नांत मुख्य स्थान हळदीला आहे. मळचात हळद पिकविणाऱ्या जंबू माळचापासून तर हळदी भरून नेणाऱ्या गाड्यापर्यंत हळदीमहात्म्य वर्णन केले आहे. आदिवासी जनांना पिवळे व्हायला गाड्या भरभरून हळद लागते. त्यांना या गोष्टीचा अभिमान वाटतो. अर्ध्या हळकुंडांत पिवळे होणारांना जणु ते हसत आहेत, असे वाटल्यावाचून रहात नाही. नवऱ्या मुलाला प्रथम पायापासून तर डोक्यापर्यंत सुवासिनी हळद लावतात. नंतर शेवटच्या दिवशी डोक्यापासून तळपायापर्यंत हळद उतरवितात आणि मग त्या शुभ मंगल हळदीला सांगतात—

**हाळद उतर व मुखाचे नेजी**
**हाळद उतर व उराचे नेजी**

**हाळद उतर व ढोपराचे नेजी**
**हाळद उतर तळपायाचे नेजी**
**हळदायबाई, हळदायबाई**
**तू त जाई व जंबू माळचा घरी!**

हळदीबाई हळदीबाई आता तू जंबू माळचाच्या घरी जा आणि पुढच्या मंगलकार्याला सोन्याच्या पावलाने पुन्हा आमचेकडे ये, असे त्या हळदीबाईला आळवून आळवून सांगतात.

देवदैवतांची प्रार्थना, सुखसमृद्धीला आमंत्रण, आप्त-स्वकियांचे शुभचिंतन तो व्याही-विहिणींच्या थट्टामस्करी पर्यंत सर्व प्रसंग गाण्यात गुंफलेले आढळून येतील. आदिवासी लोकांची सभा-संमेलने म्हणजे लग्नसमारंभ. लग्नसमारंभाच्या निमित्तानेच त्यांचे स्वकीयात स्नेह-संमेलन, तेच त्यांचे व्यासपीठ, तिथेच त्यांची रंगभूमी, तिथेच पंडितमैत्री अन् तोच सभासंचार. असे असले तरी त्यांच्यापासून नागरीजनांना शिकण्यासारखे पुष्कळ आहे. पेठ भागात एक प्रकारच्या मुंग्या आहेत. त्यांचे वारुळ पाहून कुणीही आश्चर्यच करील. त्या वारुळाची अशी रचना असते की, परका किडा (मुंग्यांचा शत्रू) वारुळाच्या तोंडापर्यंत येतो व पुन्हा वारुळाच्या पायथ्याशी जातो. त्याला वारुळात प्रवेश करताच येत नाही. आदि-वासी लोकांच्या गुप्त वाटा अशाच पद्धतीच्या असाव्यात आणि आपल्या महाभारतकालीन गुरुद्रोणाचार्यांनी चक्र-व्यूहाची कल्पना या मुंग्यांच्या वारुळापासूनच घेतली असली पाहिजे, असे वाटल्यावाचून रहात नाही.

थाळगाणे हा एक प्रकार आदिवासींमध्ये आहे. थाळ-गाणे हा गीतप्रकार सांघिक गायनपद्धतीचा आहे. एका मोठ्या थाळीला मधोमध काडी लावून त्या काडीवर बोटे फिरविली म्हणजे घरदार असा गोड स्वर निघतो. त्या स्वराने वातावरण दुमदुमून गेल्यासारखे वाटते. या वाद्याच्या साथीवर ही गाणी गायिली जातात. रात्री या गाण्याची बैठक सुरू झाली म्हणजे त्या धुंद वाता-वरणात रात्र केव्हा उलटून जाते ते कळत नाही. आदिवासींच्या वास्तव्याला, त्यांच्या संरक्षणाला देवाने धावून यावे, जीवन आबादीआबाद करावे असाच या गाण्याचा मुख्य सूर आहे.

**धेनां गायल्या रे, आप धरतारी देवा**
**धेनां गायल्या रे आप कनसारी देवा !**

एवढ्याच ओळी; परंतु ते आळवून आळवून गात असतात. काव्यापेक्षा स्वरांतील धून या गाण्यात जास्त महत्त्वाची असते. दोनच ओळी; परंतु नादब्रह्मात घोळून घोळून ते मंत्र बनवीत असतात. एवढे सांगितले म्हणजे पुरे.

त्यानंतर 'ठाकूर गाणी' हा एक लोकगीताचा हृद्य भाग अभ्यासण्यासारखा आहे. काही गीतांत लोककथेचे संकेत मोजक्या शब्दांत गुंफलेले आढळून येतील.

आपला सुंदर पिसारा उभवून मोर नाचत आहे. नाचता नाचता आपल्या पायांकडे पहात तो अश्रू ढाळीत आहे. मोराचा इतका सुंदर पिसारा, इतके सुंदर रूप, असे असूनही तो अश्रू का बरे ढाळतो ? आपल्या बेढब अन् काळचाकुट्ट पायांकडे पाहून त्याला अतिशय दुःख होत आहे. आपले पूर्वीचे सुंदर असे पीतवर्णाचे पाय साळुंकीने उसनवार म्हणून मागून नेले. तिला श्रीराम-प्रभूच्या लग्नाला जायचे होते. तिने हे बेढब पाय मला दिले. आता ती माझे पूर्वीचे सुंदर पाय द्यायला तयार नाही.

**गजनें डोंगरातलं दादा**
**नाचतो गजा मोर**
**पाय काशा काळं काळं रे**
**पायऽनेल साळोंकी दादा**
**रामाल्या लग्नाला**
**आतां नाचायच्या बेळ दादा**
**येतं डोळ्याल आसूळं !**

रोहिणीनक्षत्र आले. पावसाचे नाव नाही. अजून भोजा पक्षी 'पेर्तेव्हा, पेर्तेव्हा' अशी ललकारी ठोकीत आला नाही. वरुणराजाने अजून त्याला का पाठविले नाही ? कुणबी लोक हवालदील झाले आहेत.

**मोठं मोठं खोरीलं भोजानी लाहो केला**
**भोजानी लाहो केला—पानीज बलावला**
**पानीपड चितता कुळंब्याचे हिताचा**

भोजापक्ष्याला ते प्रार्थना करीत आहे. या पक्ष्याला निरनिराळ्या नावांनी ओळखतात. कुणी पावशा, कुणी पपीहा तर कुणी पोप्पा म्हणतात.

आदिवासींची वरुणाची प्रार्थना चालली असताना त्या गीतगायनात पावसाची झुंबड चालली आहे असा भास झाल्यावाचून रहात नाही. ढोलवादन एकदा सुरू झाल्यावर, विश्वसंगीताला जणु दिगतरातील अनाहत साथ देत असल्याचा भास होत असतो.

**पड पान्या पड पान्या**
**धरतारी सुकली र**

**धरतारी सुकली र**

**कनसारी कोमली रं**

शास्त्र हे शास्त्राच्या मार्गाने कसे जाते ? ही गंमत या गीतगायनांत अनुभवायला मिळते. वास्तविक आदिवासीयांना रागरागिणीचे ज्ञान बिलकूल नाही आणि ते कसे असणार ? असे असताना देखील त्यांच्या या गायनांत मेघ–मल्हारचे स्वर हजिरी देऊन जातात आणि संगीत-रत्नाकराच्या संकेताची आठवण देतात. ही गोष्ट विशेष लक्षात ठेवण्यासारखी आहे की, मेघांना गर्जावेच लागते अन् वरुणाला पावसाची बरसात करावीच लागते. पाऊस आला की, त्यांच्या आनंदाला पारावार रहात नाही. अन्न–धान्य पिकवणाऱ्या धरित्रीमाऊलीला ते वंदन करतात.

**माझां नमीन र धरतारी मातालं**

**माझां नमीन र कनसारी मातालं**

**माझां नमीन र पानिया देवालं**

**माझां नमीन र इज का गाजलं**

आदिवासी जनांचे हे भूमिवंदन म्हणजे त्यांचे 'वंदे मातरम्' गीतच नव्हे का ?

काम करता करता आणि घाम ढाळता ढाळता निसर्गाच्या सहवासात ही गाणी आदिवासी जनांना स्फुरली आहेत. ती गाणी कुणी रचली ? याची नाव-निशाणी त्या महाभागांनी नावांना झिटकारून आपल्या हृदयीचा भाव तेवढा मागे ठेवला आहे. ही गाणी परंपरेने गायिली जात आहेत व लोकगीतातील अलौकिकता रसिकांना पटवून देत आहेत. लोकगीताप्रमाणेच किती तरी लोककथा आदिवासी जनतेत विखुरल्या आहेत ! त्या लोककथांचा संग्रह देखील प्रसिद्ध होणे जरूर आहे.

मला वाटते 'आदिवासी जनता' हा धरित्रीमातेचा पहिला गहिवर आहे. वृक्षवल्लरी, पक्षी, वनचरे या धरित्रीच्या लेकरांची खरी सोयरी आदिवासी जनताच आहे आणि अशा या धरित्रीच्या लेकरांची लोकगीते महाराष्ट्राला लाभली आहेत. अलीकडे खेडुतांच्या लोकगीताबाबतीत साहित्यिक संशोधकांचे लक्ष वेधत आहे. निरनिराळ्या प्रांतातील लोकगीते संग्रहरूपाने प्रसिद्ध होत आहेत. या सर्व प्रकारच्या लोकगीतांना आपल्या लोकराज्यात स्थान मिळो, अशी मी आशा करतो.

('आदिवासींची लोकगीते' – या पुस्तकावरून) ■


शुभेच्छा

**मे. कमलखाँ सरवरखाँ**

**केरोसीन डीलर, नवा मोंढा**

**जालना**

# विनाकर्त्याचे आदिवासी गाणे



गंगाराम जानू आवारी

सुधारक लोक शास्त्राधाराने गायन हे पंचमुखी ब्रह्माच्या जंबूक मुखातून निघल्याचे म्हणतात. खरे खोटे काय असेल ते असो. आदिवासी लोकांस गायनाची उत्पत्ति माहीत नाही; तरी पण गोंधळाच्या गाण्यातून हे गायन इंद्राच्या दरबारातील रंभा (अष्ट नायिका) यांच्याकडून गाइले जात होते. इंद्र हा मोठा रंगेल, ख्याली असा होता. तो अप्सरांकडून नाच व गायनाचा कार्यक्रम करवी. त्या वेळी शंकरादि देव व ऋषिही ही गंमत पाहण्यासाठी जमत असत, असे शास्त्रपुराणांमध्ये वर्णन केले आहे; परतु रंभा स्वर्गात, सुधारक हे शहरात व आदिवासी लोक जंगलात असे वास्तव्य करीत असल्याने गायनाची मूळ उत्पत्ति ही काल्पनिक असली पाहिजे, असे म्हटल्याशिवाय इलाज नाही. शेजारच्या जंगली जनावरांतील कोल्ह्याच्या तालबद्ध ओरडण्यावरून मनुष्यप्राण्याला गायनाची हुक्की आली असावी व त्यानंतर पुढे गायनाचे अनेक प्रकार निर्माण झाले असावेत यात शंका नाही.

आदिवासींचे गाणे हे विनाकर्त्याचे गाणे असते. म्हणजे त्यांच्या गायनात कर्ता कोण ? त्याच्या नावाचा पत्ताच नसतो. प्रसिद्धि–विन्मुखता ह्या गुणाचे ते दिग्दर्शक आहे.

विद्वान लोक ज्याप्रमाणे कल्पना करून आपल्या गाण्यास रंग देतात, तसा प्रकार आदिवासी गाण्यात सापडत नसला तरी त्यांचेही कल्पनाचातुर्य मोठे मर्मभेदक, उत्तेजक व समयसूचक असे असते. प्रसंग पाहून व त्यास अनुसरून साध्या व सरळ भाषेत ही गाणी रचलेली आढळतात. स्थानिक भाषा हे त्यातील वैशिष्टच असल्याने ते तेथील श्रोत्यांस चटकन समजते.

नागरी जनास आपले काव्य रंगविण्यात जशी काल्पनिक साहित्याची जरुरी असते तशी आदिवासीसही असली तरी पण ती फार थोडी असते. उदा:— सुधारकांत आपल्या मुलीचे लग्न जमविण्यास ते कार्य अतिमहत्त्वाचे असल्याने स्थळे, हुंडा, लग्नकुंडली इत्यादींची किती तरी उलथापालथ व घालमेल करावी लागते आणि इतके करून लग्न झालेली मुलगी पतिगृही जातेवेळी आनंद मानावयास पाहिजे; पण आपणास सोडून जाणाऱ्या मुलीबद्दल आईला काय वाटते ? ही जशी ‘जा मुली जा दिल्या घरी तू सुखी रहा’ या गाण्याने आईची हृदयद्रावक स्थिती उत्तम रीतीने वर्णन केलेली आहे, तसलीच गाणी अडाणी बायाही आपल्या स्थानिक भाषेतून गातांना दिसतील. कोकणी जमातीच्या भाषेतील लग्नाच्या एका गाण्यात एका कुटुंबाचे वर्णन मोठ्या खुबीदारपणे मांडले आहे. त्यात आई ही केळीसारखी सरळ मनाची, करुण; बाप हा सर्वांचा सांभाळ करणारा व मध्ये असणारा सूर्यदेव, मुले ही चारी कोपऱ्यातील चार दिवे, असा भास होणारा संसाराचा एक स्वर्गच आहे, अशी कल्पना असून संसार सुंदर रीतीने चालला आहे. अशा कुटुंबात अनेक मुली असल्याने बाप त्यांची लग्ने भरभर उरकण्याच्या विचारात आहे; पण त्याच्या बायकोस या जबाबदारीतून आपण पार पडले पाहिजे याची जाणीव असूनही अपत्यप्रेमामुळे तिला ही घाई वाटते व ती या मुली त्यांच्या बापास एक मोठे जड ओझे वाटते, ते दूर करण्यासाठी त्याची ही धडपड आहे असा गैरसमज करून घेते. आईची त्यामागे एकच भावना दडलेली असते की, त्या मुली वयाने कितीही मोठ्या झाल्या तरी आईला त्या लहानच

वाटतात. त्या परगावी दिल्या तर आईला तो परदेशच वाटतो व ती अधिक दुःखी होते. मुलगी त्यांच्या घरातून निघून सासरी चालली असताना ती दृष्टिआड होताच आईला तो डोंगर वाटून ती रडू लागते व आपल्या जावयास तिची दयामाया न येता तो तिला कामधंद्यातील क्षुल्लक कारणावरूनही शिव्या देईल अशी तिची ठाम समजूत होते.

असले हे गाणे चांगल्या चालीवर म्हटल्यास त्यात भरपूर गोडी वाटेलही; पण शुद्धाशुद्ध शब्दांचा विचार केल्यास ते ओंगळ वाटेल, कसे ते पहा–

आव आव केळी बाई । तुझह पाना निळी निळी ॥
चारी कोपर चारी दीव । मधी आहे सूर्यादेव ॥
माईला व झाल्या कारी । बापाला व झाल्या जड ॥
बाप देतो दुरले देसी । माय तोडी कुरुळ केस ॥
गेली डोंगराचे आड । माईल व आली रडू ॥
जवाय आहे किन्यानष्ट । शिवी देतो आईवर ॥

**शब्दांची अर्थ :**– आवआव–अग अग, पाना–पाने, निळी निळी हिरवीगार, दीव-दिवे, कारी-मुली, किन्यानष्ट–क्रिया अनिष्ट शिव्या देणे, शिव्या देताना आईचाही उद्धार करणे.

असे हे वरील गाणे बेढब व ओंगळ वाटले तरी त्यातील अर्थ हा आईची हृदयद्रावक स्थिती पूर्णपणे दर्शवितो.


याचप्रमाणे अनेक प्रसंगदर्शक व बोधवर अशी गाणी असून ती लग्न, गौरीसमारंभ आणि करमणुकीचे प्रसंग या वेळी आदिवासी स्त्रिया गाताना आढळून येतात. त्यातील गौरीसमारंभाची गाणी अक्षयतृतियेच्या एका आठवड्यापुरतीं गाण्याचा नियम असून इतर गाणीही खरा आदिवासी जेथे आहे अशा प्रदेशात पावसाळ्यात बंद असून दिवाळीपासून मृगनक्षत्रापर्यंतच गाण्याची प्रथा आहे.

( 'आदिवासींची लोकगीते' या पुस्तकातून ) ■

# आदिवासी नृत्य व गायन यात कोणत्या वेळी कोणती वाद्ये उपयोगात आणतात याची माहिती–

| क्र. | गायनाचा प्रकार | त्यावेळी लागणारी वाद्ये | नृत्याचे नाव किंवा प्रकार | समारंभाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | लावण्या | ढोलकी, नाल, झांजर, तुणतुणे, | तमाशा | लग्न, भवाडा, करमणूक |
| २. | भजन | ढोलकी, टाळ, मृदंग, वीणा इ. | भजन | करमणूक नामसप्ताह, सत्यनारायण |
| ३. | थाळगाणे | थाळी, संर | — | करमणूक, श्राद्धदिन |
| ४. | डाका | ढाक | — | अवसर, देवकार्य |
| ५. | कांबड गाणे | काठा | कांबड नाच | झुंबी तोडणे, नवे धान्य खाणे * |
| ६. | तूर | नालवजा वाद्य, थाळी | — | लग्न *(देवकरणे) |
| ७. | मादळ–(गोंधळ) | नालवजा वाद्य, झांजर | — | करमणूक, लग्नसमारंभ |
| ८. | ठाकर गाणे | ढोल, घुंगूर | ढोलावरील नाच | करमणूक |
| ९. | कहाणी–वांगळी | २ भोपळे बांबूला अडकविलेले वाद्य | डोंगरदेव किंवा मावल्या | मावल्या |
| १०. | डेरा | नगारावजा भांडे | — | वाघदेवाची पूजा करणे |

# ‘नमन करतो मी ऽऽ’



राजीव पाटील

खैराट, पनवेल तालुक्यातील कर्नाळा जंगलाच्या एका टोकाला डोंगराच्या कुशीत वसलेले एक कातकऱ्यांचे गाव. दसऱ्याच्या दिवशी या गावाला एका जत्रेचे स्वरूप आले होते. जत्रेतल्या प्रत्येक माणसात एक वेगळाच उत्साह संचरला होता. आठ गावांमधून आदिवासी मंडळी तारा प्रकल्पाने आयोजित केलेल्या लोकनृत्य-स्पर्धेत भाग घेण्यासाठी मैलोन् मैल चालत आली होती. प्रत्येक ‘नाचमंडळ’ आपली कला दाखवायला आणि दुसऱ्यांच्या कलेची कसोटी बघण्यास धडपडत होता…

सप्टेंबर ८२ च्या शेवटच्या आठवड्यात तारा प्रकल्पाने एक कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर आयोजित केले होते. या शिबिरात संघटनाबांधणी व तिच्या वाढी-बाबतही बरीच चर्चा झाली. शिबीरातील या चर्चेत निरनिराळ्या गावांतील स्थानिक कार्यकर्त्यांच्या अनुभवांवरून असे आढळून आले की, अजूनही काही गावांमध्ये थोडीशी तेढ आहे.’ ती दूर करण्याकरता आपण काही प्रयत्न केले पाहिजेत. तसेच आपले संघटनेचे काम हे पनवेल, पेण व उरण तालुक्यांतील काही गावांपुरतेच मर्यादित आहे व आपण आपले क्षेत्र वाढवून कामाला सुरुवात केली पाहिजे ; पण अशा नवीन ओळखी होण्याकरता एक मोठा कार्यक्रमही आवश्यक आहे. जो शिबिरापेक्षा वेगळा असेल व त्या कार्यक्रमात संपूर्ण गाव सामील होईल व एकी वाढण्यास हातभार लागेल. यातूनच लोकनृत्यस्पर्धेची कल्पना पुढे आली व ह्या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणावर प्रतिसादही मिळाला. पेण, पनवेल व उरण तालुक्यातील आठ आदिवासी गावे या लोकनृत्यस्पर्धेत उतरली तर बाकीची गावे त्यांना प्रोत्साहन द्यायला जमली. स्पर्धेचे यजमानपण खैराटकरांकडे होतं आणि त्यांनी तयारीही जोरदार केली होती.

…२७ ऑक्टोबर १९८२. खैराट गावामध्ये सकाळी या लोकनृत्यस्पर्धांना सुरुवात होणार होती; पण स्पर्धकांची तयारी होईपर्यंत बरोबर बारा वाजले आणि बारीच्या चिठ्या पडल्या. पहिली बारी पेण तालुक्यातल्या बेलवड गावाची होती. लाल अर्धी चड्डी, सफेद गंजी व त्यावर झगमगीत कापडाचे पट्टे अशा पेहेरावात त्यांनी रिंगणात प्रवेश केला आणि ढोलक्या रंगात आला.

‘नमन करतो मी भरल्या सभेला
मर्दा अरजा पुरे कर मन्कामना
पुरे कर मन्कामना ’

बेलवडच्या स्पर्धकांनी आपल्या लोकनृत्यात प्रामुख्याने ‘चवळी’ प्रकार सादर केला. या चवळीमध्ये गाणी निरनिराळ्या चालीची असू शकतात; पण नृत्याचा प्रकार एकच असतो. त्यांची बरीच गाणी ही ऐतिहासिक कथांवर आधारित अशीच होती. त्यात त्यांनी ‘राधा क्यू गोरी…’ म्हणत सीनेगीताचीही भर टाकली.

दुसऱ्या बारीत रानसई परिसरातील मार्गाच्या वाडीने या लोकनृत्यस्पर्धेत एक महत्त्वाची भर टाकली ती म्हणजे सध्या सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थिती-वर आधारित गीतांची. जी त्यांनी स्वतःच तयार केली

आहेत. सर्वसाधारणत: या गाण्यांचे स्वरूप एक किंवा दोन कडव्यांचेच असते; पण त्यात खोचक सवाल असतो आणि सांगणेही असते. उदा.

‘ अगो इंद्राबाय तुला म्हणू तरी काय
तुजा आंबोडा होईत नाय
अशानं गरीबी हटनार नाय
अशानं गरीबी हटनार नाय ’

हे गाणे वर वर अगदीच असंबधित असे वाटते. याबाबत रानसईच्या ठाकरांना विचारले असता एकाने मजेदार उत्तर दिले. ‘ दोन वर्षांपूर्वी तुम्ही आमच्या घरात येऊन चहा प्यायलात तेव्हाच तुम्हाला कळलं ना आम्ही काळा चहा पितो ! ’

सातव्या बारीतील खोंड्याच्या वाडीने तर नमनालाच या पद्धतीने सुरुवात केली.

‘ ऐका पैशाचा खेळ
पैशावरती चालती सगळे हे व्यवहार
पैशाने चालतो हा कोर्टाचा कारभार
आणि पैसे नसल्यावर जप्ती काढती सावकार.
हे गणराया वंदन तुला नमितो आज रे
करू वंदना आज तुला गन गाऊ रे ’

खोंडकरांचा शाहिरच जबरदस्त असल्याने त्यांची बारी चांगलीच गाजली. त्यांनी रिंगणात प्रवेशच नाट्यपूर्ण रीतीने काठ्यांवर नाचत येऊन केला. तसेच त्यांनी आपल्या नृत्यात चवळी प्रका ाबरोबरच कातकरी बायकांच्या नृत्याचीही झलक दाखविली.

चौथ्या बारीतील दर्गावाडीचा नाच निश्चितपणे सुंदर होता. तसं पाहिलं तर दर्गेकरांचा नाचात हात धरणारा कुणी नाही असे तीन तालुक्यात म्हटले जाते, त्यामागे त्यांच्या नृत्याचा बावीस वर्षांचा इतिहास आहे. या लोकनृत्यात त्यांची गाणी पारंपारिक होती; पण त्यांचा जल्लोष इतका वाढत होता की पुढे काहीच ऐकू येईना म्हणूनच की काय त्यांचा नंबर खाली गेला. या स्पर्धेत सर्वांवर मात केली ती साईगावच्या नाचमंडळाने. साईकरांची पाचवी बारी काय सादर करते याची सगळ्यांनाच उत्कंठा लागली होती, आतापर्यंत सर्वांनीच चवळी हा एकच नृत्यप्रकार सादर केला होता; पण साईकरांनी आपल्या नृत्यात माळी, बलोली व ठाकरी या नृत्यप्रकारांची भर घालून अगदी चौरंगी लोकनृत्य पेश केले. छोट्याश्या रिंगणात साईचे पंचवीस नाचे इतके लयबद्ध नाचत होते की, एखाद्या मुंबईकराला जणू काही हे नाचे रिमोट कंट्रोलवर ऑपरेट होत असावेत असे वाटावे. कारण या पंचवीस जणांच्या लयबद्धतेत किंवा हालचालीत एका इंचाचाही फरक जाणवला नाही. साईच्या स्पर्धकांची लयबद्धता फक्त दोन मिनिटांकरिताच तुटली ती शाहिराला पाणी प्यावे लागले म्हणून. नाहीतर लोकनृत्यस्पर्धेचे प्रेक्षक तब्बल पंचेचाळीस मिनिटे एका जागेला खिळून होते. साईकरांची गाणी ही महाभारत व कृष्णलीला यावर आधारित होती. उदा.

‘ घे गण राधे घे क्रिष्णाला
कडीवर घे ग जीवाला
कडीवर घे गो खाऊ दे गो
नरहरी उभा हा राहिला
गोकुळामध्ये गोपासंगे
गाई राखितो हा कान्हा
गोकुळामध्ये गोपासंगे
याने घातला धिंगाणा
कंसमामाला ठार मारिला
मल्लयुद्ध खेळताना
जरासंधाला उभा चिरीला
घेऊन पंडू पुत्रांना
या इंद्राचे गर्व हराया
गोवर्धन उचली कान्हा

अशा प्रकारच्या गाण्यांबरोबरच दारुबंदीबाबत साईकरांनी म्हटली.

देश बुडाला अपुला सारा
या दारूच्या पायी
पंडित नेहरू इंदिरा गांधी
निघाले अंतुले भाई
देश बुडाला हे सांगाया
या दारूच्या पायी

रानसाईतील ही बंगल्याची वाडी ही सुद्धा नाविन्यपूर्णतेने नृत्य सादर करायला सज्ज झाली होती. बंगल्यावरचे सर्व नाचे एकदम तरुण, मुंबईशी बऱ्यापैकी संबंध असलेले. त्यांनी आपल्या मुंबईच्या ड्रेसात, डोक्याला फुगे लावून आणि हातात दांड्या घेऊन आपल्या लोकनृत्यात नाविन्यता आणण्याचा कौतुकास्पद प्रयत्न केला, त्यांचीही गाणी मागीलप्रमाणेच सद्य: परिस्थितीवर आधारित अशी होती. त्याच परिसरातील खैरकाठीचे ठाकरही जिद्दीचे. त्यांनी थोडक्या तयारीत,

आहे त्या कपड्यानिशी आपले नृत्य शाहिराच्या खण-खणीत आवाजात साथ देत सादर केले. त्यांच्या नृत्यात लहान मुलांचा सहभाग जास्त होता आणि मोठ्यां-पेक्षाही लहान मुलेच अधिक सुंदर नाचत होती.

माथेरानच्या डोंगरातून आलेले शिरवली गावचे आदिवासी स्पर्धेमध्ये उशिरा सहभागी झाल्याने त्यांना नृत्याला फक्त वीसच मिनिटे मिळाली; परंतु त्यांनी पंचेचाळीस मिनिटांचे नृत्य सादर केले असते तर ते निश्चितच पहिल्या तीन नंबरात आले असते याची दखल सर्वांनीच घेतली.

या लोकनृत्यस्पर्धेचे पहिले बक्षीस (ढोलकी) पेण तालुक्यातील बेलवडच्या संघाने पटकावले. दुसरे पारितोषिक (दोनशे घुंगरू) पनवेल तालुक्यातील साईच्या आदिवासी नाचमंडळाने मिळविले तर तिसरे बक्षीस (खंजिरी) उरण तालुक्यातील खोंड्याच्या वाडीने (रानसाई) जिंकले. मार्गावाडी, वंगलेवाडी, दर्गावाडी, खैरकाठी व शिरवली या गावांना उत्ते-जनार्थ बक्षिसे देण्यात आली. हा बक्षीससमारंभ युसुफ मेहेरअली सेंटरचे उपाध्यक्ष डॉ. जी. जी. पारिख यांच्या हस्ते पार पडला. तसेच लोकनृत्यस्पर्धेचे परी-क्षक म्हणून श्रीमती सुधा वर्दे व श्री. मधू मोहिते यांनी काम पाहिले. तारा प्रकल्पाने आयोजित केलेल्या या स्पर्धेत प्रकल्पाचे कार्यकर्ते मारुती वाघमारे, सुरेखा दळवी व काळूराम दोरे तसेच खैराट गावची पंचमंडळी आणि डॉ. आंबेडकर महाविद्यालयाचे विद्यार्थी या सर्वांनी परिश्रम घेऊन "सर्वांची एकजूट" हा उद्देश यशस्वी केला.

पहिल्यानं हिला मी जिभेनं चाटली
मग बरी वाटली
पुढं मात्र नडली मला बाटली
पहिल्यानं मी गेलो माझ्या साडूकडं
नवी मेवणी आली हो माझ्यापुढं
मला आत नेता हाताला धरून
आणि पुढं आला तो प्याला भरून
नाही म्हणावं तर हट्टाला पेटली, जवळ खेटली
पुढं मात्र नडली मला बाटली
हळूहळू चढली ती भलती नशा
विडी पेटविताना जळल्या मिशा
जेवताना पुढली दिसेना ताटली
ओकारी वाटली
पुढं मात्र नडली मला बाटली

(साई गावाने सादर केलेले तारा प्रकल्पाच्या पपेट शोमधील गाणे)

शुभेच्छा

मे. एम्. डब्ल्यु. मिश्रीकोटकर

देऊळगाव राजा

# गोदूताईंना अभिवादन

## सुधीर बेडेकर

**तशी वयाची पंचाहत्तर वर्षे पूर्ण करणारी माणसे बरीच असतात; पण त्यांच्यापैकी हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीच जीवन अशी जगलेली असतात की, ज्यांच्याविषयी सगळ्या समाजाला कृतज्ञ वाटावे.**

कॉ. गोदावरी परुळेकर किंवा गोदूताई या अशांपैकी एक आहेत. विशेषत: आदिवासी जीवन व चळवळ यांच्यामध्ये आस्था असणाऱ्यांना ही कृतज्ञता जास्तच वाटणे स्वाभाविक आहे. कारण आदिवासींचे जीवन, त्यांचे प्रश्न व त्यांची माणूस म्हणून जगण्यासाठी चाललेली चळवळ यांच्याकडे गेल्या दहाएक वर्षांत अनेकांचे लक्ष गेले आहे; पण महाराष्ट्रात पस्तीस वर्षांपूर्वीच, वारली-आदिवासींना जागे करून त्यांचे आंदोलन उभारण्याचा पहिला मान गोदूताईंकडे जातो!

पण केवळ आदिवासी चळवळीतल्या कार्यकर्त्यांनीच नव्हे, केवळ सर्व प्रकारच्या परिवर्तनवादी लोकांनीच नव्हे. तर राजकीय व वैचारिक भेदांपलीकडे जाऊन सर्वच समाजाने त्यांच्याविषयी आदर व्यक्त करावा असे गोदूताईंचे कार्य आहे, हे लक्षात घ्यायला हवे. ७५ व्या वाढदिवसानिमित्त त्यांचे ठाणे, नाशिक आदि ठिकाणी जे सत्कार झाले ते सर्व नागरिकांतर्फे झाले ते म्हणूनच.

या सत्कारांच्या वेळी नेहमीप्रमाणे गोदूताईंनी केलेल्या त्यागाचे, त्यांच्या ध्येयनिष्ठेचे व त्यांनी वर्षानुवर्षे केलेल्या कष्टप्रद परिश्रमांचे कौतुक केले गेले. पुण्यातल्या एका सधन, यशस्वी व प्रसिद्ध वकिलाच्या या मुलीने श्रीमंतीचे व सुखोपभोगाचे चाकोरीबद्ध जीवन त्यागून डोंगरकपारीतल्या आदिवासींना आपले मानले व त्यांच्यासाठी आयुष्य झिजवले, या त्यांच्या 'त्यागा' बद्दल कौतुक करायला तशी हरकत नाही. तसेच अशी अविचल ध्येयनिष्ठा व त्यासाठी कष्ट झेलण्याची मनाची शक्तीसुद्धा दुर्मिळच असते; पण (निदान त्या काळात तरी) अशा व्यक्ती काही कमी नव्हत्या. केवळ एवढ्याचसाठी गोदूताईंचा गौरव करणे म्हणजे गोदूताईंचे मोठेपण नेमके कशात आहे व त्यांनी आपल्याला काय दिले आहे हे न समजणे आहे अन् ते समजायचे तर गोदूताईंच्या जीवनाकडे जरा जास्त बारकाईने पाहायला हवे.

त्यांचे वडील एल. आर. गोखले हे पुण्यातले प्रसिद्ध वकीलच नव्हते तर विचारांनीही पुरोगामी होते. कॉंग्रेसच्या व इतर सामाजिक कार्यकर्त्यांशी त्यांचा संबंध होता. या वातावरणाच्या परिणामी शिक्षण संपल्यावर गोदूताईंनी भारत सेवक समाजात काम सुरू केले. कॉंग्रेसबरोबर काम केले. त्यानंतर मुंबईत कामगारांमध्ये प्रौढ शिक्षणाचे कामही त्यांनी केले. त्या काळातच कामगार व कम्युनिस्ट चळवळीशी त्यांचा संबंध आला आणि तेथेच त्यांच्यामध्ये बदल झाला. केवळ भूतदयावादी व मानवतावादी भूमिकेतून, दीनदुबळ्या कष्टकरी जनतेचा उद्धार करू बघण्यातून तिची दुर्दशा संपणार नाही. त्याकरता या जनतेला स्वत:मधील सृजनशक्तीची जाणीव झाली पाहिजे, ती जागी झाली पाहिजे आणि शास्त्रीयदृष्ट्या तिच्या दुर्दशेची कारणमीमांसा समजून घेऊन संघर्षशील बनली पाहिजे हे सत्य त्यांना उमगले. कोणतीही एखादी ध्येयनिष्ठा व तिच्यासाठी केलेला त्याग नव्हे तर आजच्या युगाला साजेशी अशी ही ध्येयनिष्ठा व तिच्यासाठी केलेला त्याग ही गोदूताईंच्या जीवनाबाबतची गौरवास्पद बाब आहे! त्यांच्या जीवनातून व कार्यातून ही त्यांची भूमिका वगळून चालणार नाही. केवळ भोंगळ मानवतावाद, त्याग, दयाबुद्धी, सुधारणावाद यांच्यातून सुटका करून घेऊन त्यांनी मार्क्सवाद व वर्गसंघर्ष स्वीकारला हा त्यांच्या वाटचालीतला अविभाज्य भाग आहे.

आणि याचमुळे गोदूताईंनी आदिवासींना आंघोळ करायला, दारू सोडायला, शुद्ध भाषा बोलायला फक्त शिकवले नाही— त्यांनी त्यांच्यातला माणूस जागा केला. याचमुळे त्यांनी १९४५ मध्ये ठाणे जिल्ह्यात काम करायला गेल्यावर आश्रमशाळा, शेतीसुधारकेंद्रे,

दारुबंदीकेंद्रे व दवाखाने काढले नाहीत किंवा केवळ आपल्याला मते टाकायलाही आदिवासींना शिकवले नाही. त्यांनी या माणसांना स्वतःच्या हक्कांसाठी, न्यायासाठी लढायला शिकवले. जमीनदार--सावकार व त्यांचे सरकार यांच्याविरुद्ध लढायला शिकवले. लोकशाहीसाठी व समाजवादासाठी लढायला शिकवले. त्या काळीच काय पण आजदेखील आदिवासींच्या प्रश्नाकडे एकांगी व मर्यादित दृष्टीने पहाणारे अनेक लोक आहेत; गोदूताईंची दृष्टी आदिवासींच्या उन्नतीचा संबंध व्यापक सामाजिक व राजकीय परिवर्तनाशी लावून बघण्याची आहे. आदिवासी, दलित, शेतमजूर, शेतकरी, स्त्रिया, कामगार -- या सर्व समाजविभागांचे प्रश्न सुटण्यासाठी या सर्वांचे मिळून एक समग्र क्रांतिकारी आंदोलन उभे रहायला हवे; केवळ विभागीय आंदोलनांतून व अलगतावादी भूमिकेतून समस्या सुटणार नाहीत ही जाण सखोलपणे आज तरी किती जणांना आहे?

## उन्नतीचा मार्ग दाखविला

म्हणूनच गोदूताईंच्या जीवनाकडे, कार्याकडे व दृष्टिकोनाकडे पहाताना त्यातून ही बाब वगळून पहाता येणार नाही. त्या मानवतावादी आहेत, त्यागी आहेत, त्याचबरोबर त्यांची विचारसरणी व राजकीय भूमिका विशिष्ट आहे हीसुद्धा गौरवाचीच बाब आहे. अर्थात असल्या माणसाविषयी असल्या प्रसंगी बऱ्याच जणांची नेहमीच पंचाईत होत आली आहे. जसे दि. के. बेडेकरांच्या कम्युनिस्ट मृत्युलेखात 'कम्युनिस्ट असून सज्जन होते' वा 'कम्युनिस्ट असून रसिक होते' असे लोकांना लिहावेसे वाटते, किंवा प्रा. गं. बा. सरदार 'मार्क्सवादी असून साक्षेपी विचारवंत' आहेत असे लोकांना म्हणावेसे वाटते, त्यातलाच हा प्रकार आहे. आजही गोदूताईंचा सत्कार होतो, मध्यमवर्गात त्यांना मान्यता मिळते, यामध्ये त्यांचे पुस्तक (जेव्हा माणूस जागा होतो) मौज प्रकाशन आहे व त्याला साहित्य अकादमीचे बक्षीस मिळाले आहे, याचा वाटा मोठा आहे! त्याआधी त्या हिंसाचारी होत्या, वारल्यांना भडकवणाऱ्या होत्या, अतिरेकी होत्या! पण निदान गोदूताईंच्या ७५ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने तरी आपण या सगळ्याचा नीट विचार करायला सुरुवात केली पाहिजे. वारल्यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले एवढेच नव्हे तर त्यांच्या उन्नतीचा शास्त्रशुद्ध योग्य मार्गही त्यांनी दाखवला याला महत्त्व आहे.

गोदूताईंचे ऋण एवढेच नाही की, त्यांनी मध्यमवर्गीय माणसांपुढे ध्येयनिष्ठ जीवनाचा एक नमुना ठेवला आहे. हे ऋण आहेच आणि त्याचा विसर पडू न देणे आजच्या सुखासक्त व स्वार्थी मूल्यांच्या भरभराटीच्या काळात महत्त्वाचेच आहे; पण त्याचबरोबर समाजाकडे, त्यातल्या दैन्यदारिद्र्याकडे व अन्यायांकडे आणि परिवर्तनाकरता करायच्या आंदोलनाकडे पहाण्याची एक विशिष्ट दृष्टी घेऊन कार्य केले पाहिजे हेसुद्धा त्यांच्या जीवनावरून आपण घेतले पाहिजे. तेसुद्धा आजच्या परिस्थितीत तितकेच महत्त्वाचे आहे.

गोदूताईंबाबत आणखी एक गोष्ट निदान त्यांना जवळून पाहिलेल्यांना तरी चटकन जाणवते. राजकीय नेत्यांसारखे त्यांचे बोलणे विचारपूर्वक, सावध, कौशल्यपूर्ण असते. त्या रोखठोक, सरळ बोलतात, वागतात. कधीकधी जरा जास्तच रोखठोक; पण त्यांच्यात प्रेमळपणा व जिव्हाळा इतका ओतप्रोत आहे की, तो लपून रहात नाही. एवढ्या खडतर प्रवासातही तो वाळून गेलेला नाही. म्हणूनच त्यांच्या पुस्तकात कॉ. शामराव परुळेकरांबद्दल मधूनच हळवे उल्लेख येतात. चीनमध्ये गेल्यावर त्यांना काम आटोपल्यावर आता काय पहायचेय असे विचाल्यावर, त्यांना येनानमधल्या पहाडातल्या त्या गुहा पहाव्याशा वाटतात, ज्यात माओ व इतर नेते रहात होते. हा त्यांचा मूळ प्रेमपूर्ण स्वभाव त्यांच्या बोलण्यात, वागण्यात, पुस्तकात जागोजाग पारदर्शकपणे दिसतो.

आणि कदाचित याच जीवननिष्ठेमुळे व या अंतस्थ माणूसपणामुळे त्यांना या वयाच्या इतर काही नेत्यांप्रमाणे स्वानभंग झाल्याने उत्साहहीन वाटत नसावे. आजही या वयात ठाणे जिल्ह्यातल्या कामाबरोबरच महाराष्ट्रभर किसानसभेचे काम पसरवण्याकरता दौरे त्या काढत असतात. त्यातच मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीच्या सभासद म्हणून जे पडते ते काम करत असतात. नासिक, ठाणे, सातारा, आंबेगाव, दिल्ली, कलकत्ता ह्या वाऱ्या चालू असतात. विश्रांतीची भाषा नसते. 'आता माझे जे दिवस राहिलेत तेवढ्यात शक्य तेवढे किसानसभेचे काम वाढवून ठेवायचेय' अशी भाषा असते.

त्यांच्या पंचाहत्तराव्या वाढदिवशी कृतज्ञ व्हायचे व अभिवादन करायचे ते अशा ह्या गोदूताईंना! ■

# " इतिहास आदिवासी वीरांचा ! "

**ग. रा. खंडकर**


आदिम साहित्य, पुणे, या संस्थेने वरील मथळयाची पुस्तिका प्रकाशित करून एक महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. आदिवासी लोकांवर आजकाल मराठी व अन्य भाषातून बरेच साहित्य प्रकाशित होऊ लागले आहे. पूर्वी उपेक्षितांचा विषय म्हणूनच आदिवासी यांना मानले जाई. आता त्यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधू लागले हे उशीरा का होईना पण शुभ लक्षण मानावयास हवे. तरी अद्यापही समाजातील मध्यम व उच्चभ्रू सर्वसाधारण व्यक्तींना आदिवासी लोक रानटी व असंस्कृत वाटतात. उच्च वर्ग स्वत:ला सुशिक्षित व म्हणूनच उच्च जीवनमूल्ये जोपासणारी माणसे असलेला वर्ग असे समजतो. आदिवासींबद्दल बहुधा उदासीन व असलीच तर तुच्छ वृत्ती आढळून येते.

कै. ठक्कर बाप्पांसारख्या काही व्यक्तींनी व सर्वोदयी सेवकांनी आदिवासींच्या कल्याणार्थ बरीच सेवा केली, भूतदया ही त्यांची अधिकांश प्रेरणा होती. परदेशी–ख्रिश्चन मिशनऱ्यांनी आजन्म आदिवासीसेवेत स्वत:ला वाहून घेतले. तथापि त्यांच्यात भूतदयेइतकीच धर्मप्रसार व आंतून अप्रत्यक्ष राजकीय आकाक्षांच्या प्रेरणा होत्या व आहेत. श्रीमती गोदावरी परुळेकरांचेही नाव घेण्यासारखे कार्य झाले आहे. तथापि बहुतेक कार्यकर्त्यांत मध्यमवर्गीय स्वभावास अनुसरून 'आदिवासींचा उद्धार करणारे आपण' ही भावना जागृत असते. वास्तविक एक सुशिक्षितपणा हे वैशिष्टय वगळता सांस्कृतिक व नैतिक मूल्यात आदिवासी माणसे ही सरासरीने वरिष्ठ वर्गात सापेक्षतेने श्रेष्ठ ठरतील. उच्च वर्गात तूर्त चालू असलेला नैतिक ऱ्हास लक्षात घेता भोळया पण या आदिवासींमधल्या सत्यनिष्ठा, स्नेहनिष्ठाही शहरी स्वकेंद्रित भोंदूपणा व औपचारिकता ह्यांना निश्चिततेने लाजवील अशी आहे. सांस्कृतिक संवेदनाशक्ति या सुशिक्षितवर्गात इतक्या क्षीण झाल्या आहेत की आपणास आपला सांस्कृतिक व नैतिक ऱ्हास जाणवतच नाही. इतिहासात नजर टाका व मग दिसेल की वरिष्ठ वर्गांनी फंदफितुरीने आदिवासींच्या जमिनीच नव्हे तर राज्य काबीज करून त्यांना जंगलात व गिरिकंदरात हाकलून दिले व वर त्यांना वनवासी म्हणावयास सुरुवात केली. शिवाजीमहाराजांसारख्या थोर विभूतींनी मात्र त्यांचे गुण ओळखून स्वराज्यासाठी त्यांच्या लढाऊवृत्तीचा उपयोग करून घेतला.

## दुराग्रह दूर होतील

या पुस्तिकेतून जव्हार, चंद्रपूर आदि राज्ये व राणी दुर्गावती, लुमाजी भोकरे, गागुजी नाईक, होन्या केंगले, तंटया आदि वीर, वीरांगना यांच्या कथा म्हणजे इतिहास वर्णिला आहे. जव्हार राज्याची तर राजमुद्राच पृष्ठ २३ वर छापलेली वाचून साधारण उदासीन वाचकांच्या डोळयांत झणझणीत अंजन पडून त्यांचे असतील नसतील ते दुराग्रह दूर होतील. पुस्तिकेत चित्रे दिल्याने थोरांइतके पोरांनाही पुस्तिका आकर्षक वाटावी. नुकतेच वणी येथे आदिवासी लेखकांचे संमेलन झाले. आदिवासी लेखकांकडूनच त्यांची सांस्कृति, चालीरीती, औषधांचे व वनस्पतींचे ज्ञान, त्यांची धनुर्विद्या यावर पुस्तके प्रकाशित झाल्यास त्याचे स्वागतच होईल, असे या संमेलनात सांगण्यात आले. सावकारांविरुद्ध त्यांचा लढा हा व्यापक लढयात सम्मीलित करून घेण्यासारखा आहे. इंग्रजांविरुद्ध लढयात आदिवासींनी वासुदेव बळवंत यांना सहाय्य केले होतेच. आताच जमीनदारी–सावकारी ह्यांच्या कबजातून मुक्त करण्यासाठी त्यांना पुढे आणणे ही कार्यकर्त्यांची क्रमप्राप्त भूमिका आहे. जंगलांच्या संरक्षणाच्या मोहिमेत आदिवासींचे सहाय्य हे अपार मोलाचे ठरावे. इतिहास पाहिला तर वरिष्ट वर्गाने त्यांच्यावर अनन्वित व क्रूर जुलूम केले आहेत. मध्यप्रदेशातल्या काही संस्थानिकांच्या सरदारांनी प्रत्यक्ष सांगितलेली माहिती अशी की, त्यांच्या आमराईत आदिवासींना पकडून त्यांच्या ढुंगणात खुंटया ठोकून त्यांना झाडावर लटकावले आहे ! आम्हा उच्च वर्गीय व मध्यम वर्गीयांना आपला आत्मगत अहंकार व वरचढ वृत्ती सोडून आदिवासींचा उद्धार करण्याची बडेजावी वृत्ति सोडून आपल्या पूर्वजांची पापे धुऊन काढून त्यांना आपल्यात मानवी प्रेमाने मिसळून घ्यावयास हवे. त्यांच्याबद्दलची गौरवाची भावना जागृत करण्यास ह्या वीरांच्या सत्य गाथेचा अत्यंत उपयोग होईल. ■

# महाराष्ट्रातील आदिवासी विस्थापितांचे पुनर्वसन



पु. र. शिरसाळकर

महाराष्ट्रातील वन व डोंगराळ भागात धरणे बांधली जात आहेत. प्रामुख्याने आदिवासी लोकवस्ती असलेल्या वन व डोंगराळ भागात जंगल आणि आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने याबाबत खालील अहवाल तयार केले आहेत :–

(१) पुणे जिल्ह्यातील कुकडी प्रकल्पातील वडूज व माणिकडोह धरणामुळे विस्थापित झालेल्या आदिवासींच्या पुनर्वसनाचा अहवाल. (१९८१)

(२) गडचिरोली जिल्ह्यातील इचंमपल्ली प्रकल्पामुळे विस्थापित होणाऱ्या आदिवासींच्या पुनर्वसनाचा अहवाल. (१९८२) या अहवालांच्या आधारेच हा लेख लिहिण्यात आला आहे.

पुणे जिल्ह्यातील कुकडी प्रकल्पातील वडूज व माणिकडोह धरणामुळे विस्थापित करावयाच्या आदिवासींची संख्या (५१०) आढळून आली. कुसूर व काटेडे या गावांचा अभ्यास केला असताना असे आढळून आले की, ७४ टक्के आदिवासी निरक्षर होते व २६ टक्के साक्षरांपैकी फक्त एका व्यक्तीचे शिक्षण मॅट्रिकपेक्षा जास्त झाले होते व बाकीचे चौथ्या अथवा सहाव्या वर्गापर्यंत शिक्षण घेतलेले आढळून आले. या दोन्ही गावांतील विस्थापनापूर्वी ६४ टक्के आदिवासी शेतमजुरीवर / मजुरीवर आपली गुजराण करीत होते व ३६ टक्के आदिवासींजवळ एक ते पाच एकर शेती होती. विस्थापनानंतर २५ टक्के आदिवासी शेती करीत होते व ७५ टक्के शेतमजुरी अथवा मजुरी. अशा रीतीने धरणामुळे शेती करणाऱ्या आदिवासीत ११ टक्केंनी घट झाली व मजुरी करणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण वाढले. धरणामुळे प्रगतीऐवजी आर्थिक विपन्नावस्थेत वाढ झाली. ६० टक्के आदिवासी कुटुंबांचे मासिक उत्पन्न रुपये १००/– पेक्षा कमी व २५ टक्के कुटुंबाचे उत्पन्न रुपये १५०/– होते. पाण्याखाली गेलेल्या शेतीच्या जमिनीचा मोबदला बहुतेकांनी घेतला. शेतीवरील झाडांचा मोबदला त्यांना मिळाला नाही. विस्थापित कुटुंबांपैकी सर्वांनी विस्थापन असमाधानकारक झाल्याचे सांगितले. कुसूर व काटेडे गावातील 'ठाकर' आदिवासींनी नारायणगावला त्यांना देण्यात आलेली जमीन नाकारली. कारण त्यांच्या मते बिगरआदिवासी आदिवासींना त्रास देतात व तेथे त्यांच्या जनावरांना चरावयासाठी सोय नव्हती त्यांच्याच परिसरात त्यांना जमीन हवी आहे. विस्थापनानंतर असे आढळून आले की, आदिवासींनी जमिनीची मिळालेली रक्कम, जमीन विकत घेण्यासाठी खर्च न करता, दारूच्या व्यसनापायी व इतर बिगरउत्पादक कामात खर्च केली. अशा रीतीने त्यांचा पैसाही गेला व जमीनही गेली !

### स्वतंत्र संचालनालय

जून, १९६५ पूर्वी विस्थापनाचे काम जलसिंचन विभागामार्फत केले जात होते; परंतु प्रकल्पांची संख्या वाढल्यामुळे व विस्थापनाचे काम गतिमानतेने व्हावे या उद्देशाने स्वतंत्र संचालनालय मंत्रालयात स्थापन करण्यात आले. या कामाची जबाबदारी संबंधित विभागीय आयुक्त, कलेक्टर, मुख्यपालन अधिकारी

(जिल्हा परिषद) व जलसिंचन विभाग यांच्यावर टाकण्यात आलेली आहे. या कामात सुसूत्रीपणा आणण्याच्या उद्देशाने जिल्हा स्तरावर कलेक्टरांच्या अध्यक्षतेखाली पुनर्वसन सल्लागार मंडळ नियुक्त करण्यात आलेले आहे. या कामासाठी शासनाने १९७६ साली कायदा केला आहे व त्यात पुनर्वसनाच्या सर्व बाबींचा तपशील निश्चित करण्यात आलेला आहे.

## मोबदला पैशात नको

या अभ्यासातील पहाणी-निष्कर्ष व सूचना खालीलप्रमाणे आहेत :— जिल्हास्तरीय सल्लागार मंडळात प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास खंड अथवा आदिवासी कल्याण अधिकारी यांचा समावेश नाही. आदिवासी विस्थापितांना येणाऱ्या अडचणीत, त्यांचे मार्गदर्शन करणारा, त्यांच्या विश्वासातील अधिकारी, सल्लागार मंडळावर आवश्यक आहे. पैशाच्या व्यवहारात आदिवासींची कोणी पिळवणूक तर करत नाही ना, हे काम निश्चितच प्रकल्प अधिकारी / आदिवासी कल्याण अधिकारी उत्तम रीतीने करू शकेल. आदिवासींचे व्यवस्थित विस्थापन होण्याच्या उद्देशाने असे सुचविण्यात आले आहे की, आदिवासींना शेतीच्या मोबदल्यात शक्यतो पैसा देऊ नये. जमिनीऐवजी लाभक्षेत्रात, एखाद्या ठिकाणी, कमीत कमी वीस कुटुंबांना एकत्र जमीन द्यावी. पैसा द्यावयाचा असल्यास तो आदिवासी कल्याण अधिकारी / निरीक्षक यांच्यादेखत द्यावा. तसेच धरणानंतर आदिवासी कुटुंबाजवळ कमीत कमी, धरणापूर्वी जेवढी जमीन होती तेवढी तरी रहावी. याचा प्रयत्न सातत्याने करणे आवश्यक आहे.

गावठाणासाठी जमीन निवडताना प्रामुख्याने त्याठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय होऊ शकेल किंवा नाही याचा प्रथम विचार करावा. भूजल सर्वेक्षण विभागातील अधिकाऱ्यांचा यासाठी सल्ला घ्यावा. भूमिहीन आदिवासींना लाभक्षेत्रात प्रत्येकी एक एकर जमिन द्यावी. सर्व आदिवासी कुटुंबांना एकत्र जमीन द्यावी. शक्य असल्यास त्यांच्या परिसरात द्यावी. म्हणजे त्यांचे मानसिक समाधान होईल. वेगवेगळ्या गावात वेगवेगळ्या आदिवासी कुटुंबाचे, त्यांच्या मर्जी विरुद्ध पुनर्वसन करू नये. गावांत शाळेची अथवा दवाखान्याची इमारत बांधताना, शिक्षकासाठी / डॉक्टर व परिचारिकासाठी निवासगृहे बांधावीत. निवासाच्या गैर सोईमुळे शिक्षक व इतर कर्मचारी वर्ग कल्याण कामात रस घेत नाहीत असेच आढळून आले आहे. प्रचलित नियमानुसार पुनर्वसित गावांत चावडी बांधण्यासाठी ५० टक्के रक्कम गावकऱ्यांनी जमा करावी लागते. पुनर्वसित आदिवासींची हलाखीची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन असे सुचविण्यात आले आहे की यासाठी १०० टक्के रक्कम शासनाने खर्च करावी. गावातील रस्ते व गावाबाहेरील रस्ते विशिष्ट कालावधीत पूर्ण करावेत व हे रस्ते बारमाही सोईचे असावेत. गावांत मुलांना खेळावयासाठी क्रीडा-मैदान, जनावरांस थांबावयासाठी जागा, स्मशानभूमीसाठी जागा, पुनर्वसनाचा आराखडा करतानाच निश्चित करणे आवश्यक आहे. काही पुनर्वसीत गावात सामुहिक संडास बांधण्यात आले आहेत. पुरेशा पाण्याअभावी व अस्वच्छ वातावरणामुळे ही योजना यशस्वी झाल्याचे आढळून आलेले नाही. अशा परिस्थितीत गांधी स्मारक निधीनी सुचविलेल्या वैयक्तिक "सोपा संडास" ची शिफारस करण्यात आलेली आहे. घर बांधणीसाठी कमीत कमी ५००/— व जास्तीत जास्त रुपये २,०००/— चे कर्ज देण्याऐवजी आदिवासी विस्थापितांची हलाखीची परिस्थिती लक्षात घेऊन ५० टक्के सबसिडी व ५० टक्के कर्ज सुचविण्यात आले आहे.

## पुनर्वसनाची गती वाढावी

विस्थापितांचे पुनर्वसन मंद गतीने न होता जलद गतीने होणे आवश्यक आहे. या कामास प्राधान्य द्यावे असे सुचविण्यात आलेले आहे. विस्थापित आदिवासींच्या सुशिक्षित मुलांना नोकरीत प्राधान्य देण्याची व यादृष्टीने प्रकल्प अधिकारी / आदिवासी कल्याण अधिकारी यांनी प्रयत्नशील रहाण्याची शिफारस करण्यात आली आहे. तसेच विस्थापित मुलांना धंदेवाईक अल्पअवधीचे प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम बनविणे आवश्यक आहे. शासनाने ज्या सवलती विस्थापितांसाठी जाहीर केलेल्या आहेत, त्या सवलती त्यांना वेळेवर देणे आवश्यक आहे. प्रकल्प अधिकारी / आदिवासी कल्याण अधिकारी या कामात आदिवासी विस्थापितांना मदत करू शकतील.

जलसिंचनाची सोय केली म्हणजे आदिवासींचा आर्थिक विकास घडून येईल असे म्हटले जाते. आदि-

वासी शेतकऱ्यांच्या बाबतीत असे दिसून आले आहे की, जरी पाणी उपलब्ध असले तरी अज्ञान, उपोषण व दारिद्र्य यामुळे जलसिंचनाच्या सोईचा जास्तीत जास्त उपयोग आदिवासी घेऊ शकत नाहीत. चंद्रपूर जिल्ह्यातील दिना नदी प्रकल्प अहवालात असे आढळून आले आहे. बिगर आदिवासी मात्र या सोईचा पुरेपूर फायदा घेतात.

गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा तहसीलमध्ये होणाऱ्या इंचमपल्ली धरणाखाली ९० हजार एकर जमिन पाण्याखाली जाणार आहे. त्यापैकी ४६ हजार एकर शेतीची जमीन व ४४ हजार एकर वने असलेली जमीन आहे. पूर्वीचे (२१) मालगुजारी तलाव व यामुळे सिंचन होत असलेली ७०० एकर जमीन पाण्याखाली जाणार आहे. जंगलातील सागवान, बांबू, जळाऊ लाकूड याचे नुकसान अंदाजे ३३ कोटी ७२ लाख रुपये होईल. याशिवाय वन विकास महामंडळाच्या वन संवर्धनाच्या कामाला या भागात खीळ बसणार आहे. तसेच चुना वाळू, कोळसा इत्यादि खनिजांचे साठे पाण्याखाली जाणार आहेत. अंदाजे एकूण नुकसान ५० कोटी होईल. या (६१) बुडणाऱ्या गावांत गोंड व परधान आदिवासींची लोकसंख्या १० टक्के आहे. त्यांचे पुनर्वसन वर केलेल्या सूचनाप्रमाणे करावे असे सुचित करण्यात आलेले आहे.

### दारिद्र्यामुळे प्रगतीस बाधा

आदिवासीजवळ एकूण जमिनच कमी असल्यामुळे पाटबंधाऱ्यांचा त्यांना विशेष लाभ होत नाही व लाभ घ्यावयाचे जरी ठरविले तरी दारिद्र्य त्यांच्या प्रगतीच्या आड येते. अशा विचित्र अवस्थेत आदिवासी शेतकरी आज आढळून येतो.

पिढ्यान् पिढ्या डोंगराळ व वन विभागात रहाणारा आदिवासी, धरणानंतर मानसिक दृष्टया दुर्बल बनतो. या कमकुवत वर्गाला, अधिक शहाण्या मंडळीं बरोबर रहावे लागते व या प्रक्रियेत तो इतरांची नक्कल करण्याचा प्रयत्न करतो व आपल्या संस्कृतीतील मूल्यांना विसरत जातो. संस्कृतिसंघर्षाच्या प्रक्रियेत ओढला जातो व आपले सर्व गमावून बसतो. विस्थापनाच्या व बदलांच्या या प्रक्रित तो आदिवासी पूर्वीपेक्षा अधिक खाली जात तर नाही ना याची काळजी घेणे शासनाच्या निरनिराळ्या विभागांचे कर्तव्य आहे.

**( मुख्य संशोधन अधिकारी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे–१ )**

## १९८० तील ‘ हाकारा ’चे खास अंक


**(१) जबरन जोत जंगल जमीन समस्या**

**(२) आदिवासी व शिक्षण**

**(३) आदिवासी व वनसंवर्धन**

**(४) आदिवासी साहित्य व कला**

# गोंडी भाषेचे प्राचीनत्व



व्यंकटेश आत्राम

' साहित्य आणि गोंडी भाषा ' यात कितीही वावडे असले तरी साहित्याच्या दरबारात शिव्याशापांचे प्रभावी माध्यम म्हणून गोंडी भाषेला साहित्यिकांनी अग्रस्थान दिल्याचे आढळते !

प्राचीन काळी सरस्वतीने विद्वान पंडितांच्या महाकाव्यांचे परिशीलन करून कवि कालीदासाला वगळून इतरांना प्रथम, द्वितीय, तृतीय असा दर्जा बहाल केला. त्यामुळे कालीदास चिडला आणि सरस्वतीला शिवी देण्यासाठी (संस्कृतमध्ये योग्य शब्द न आढळल्याने) गोंडीतील ' रण्डे ' हा शब्द निवडून त्याने सरस्वतीला ' अहम् को ऽ स्मि महारण्डे ?' हे महारांडे सरस्वते ! मी कोणत्या क्रमांकावर आहे ?' असा प्रश्न विचारला. तो शब्द एवढा प्रभावी ठरला की, सरस्वतीने त्यास सर्वप्रथम क्रम देऊन म्हणजे ' त्वं स्वामी ' स्वयम् विद्या च ' म्हणून त्याला गौरविले. गोंडीतील ' रण्डे ' शब्दाने विद्याही रस्त्यावर आली आणि तेव्हापासून विद्येला ' रस्त्यावर आलेली ' या अर्थाचे गोंडी नामाभिधान ' सरीचवाती ' देण्यात आले. त्याचाच अपभ्रंश म्हणजे ' सरस्वती ' हा शब्द होय; परंतु त्याचा विग्रह आता गोंडीत ' सरीचवोती ' म्हणजे ' मार्गानेच नेते ' असा करण्यात येतो. याप्रमाणे ' रण्डे ' या प्रभावी शब्दाने सरस्वतीचे नामकरण केले. गोंडीत ' रण्ड ' हे ' दोन ' म्हणजे संख्याविशेषण होय आणि ' डचे ' म्हणजे ' उडणारी ' हे डचमाळ ' क्रियापदाचे एक रूप होय. दोघांवर उडणारी किंवा दोन व्यक्तींशी संबंध ठेवणारी जी स्त्री तिला उद्देशून रण्डे शब्द गोंडीत प्रचलित आहे. संस्कृत मराठीतही तो त्याच अर्थाने आला आहे.

गोंडी भाषेसंबंधी विवेचन करताना ' गोंड ' शब्दाचे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. ॲथ्नॉलॉजिकल कमिटीने ' गोंड ' जमातीत २५ पेक्षाही अधिक जमाती येत असल्याचे सांगितले. कोयातूर, प्रधान, थोटी, बुरड, ओझा आदि ५० जमातींचे लोक गोंडी मातृभाषा बोलतात आणि स्वत: गोंड असल्याचे सांगतात. यावरून हे सिद्ध होते की, गोंड ही जात नसून तो एक व्यापक समाज आहे.

ज्याप्रमाणे मद्रासमध्ये रहाणाऱ्या लोकांना मद्रासी, बंगालमध्ये रहाणाऱ्यांना बंगाली, पंजाब प्रदेशात रहाणाऱ्या लोकांना पंजाबी म्हणतात, त्याचप्रमाणे गोंडवन प्रांतात रहाणाऱ्या लोकांना ' गोंड ' असे म्हणतात. यावरूनही गोंड हा जातिवाचक शब्द नसून प्रांतवाचक शब्द असल्याचे जाणवते.

४०।५० जमातींच्या लोकांची जी एकच एक गोंडी भाषा आहे. एकसारखी वेषभूषा, पेहराव, गोत्रपद्धती,

लग्नपद्धती, देवधर्म, पूजापद्धती ही एकसारखीच आहे. यावरून गोंड लोकांची एक विशिष्ट संस्कृति आहे. ती गोंडी संस्कृति होय आणि त्याचा एक विशिष्ट धर्म आहे, तो गोंडी धर्म होय. यावरून 'गोंड' हा शब्द प्रांतवाचक आणि गोंडी धर्मनिर्देशक आहे.

आर्यलोक भारतात येण्यापूर्वी गोंडांची द्रविड संस्कृति ही सर्वोन्नतावस्थेत होती, असे अनेक विद्वानांचे मत आहे. गोंडसमाज द्रविडवंशातील मध्यवर्ती (Mediteranean) समूहात मोडतो. यात गोंडी, ओराओ, कुई, कंधी आणि कोलामी या भाषा बोलणारांचा समावेश होतो. द्रविड शब्द संस्कृत असून त्याचे पाली रूप दमिळ असे आहे. ग्रीकमध्ये डमरीक तर तामिळमध्ये 'तमिळ' असे होते. गोंडीमध्ये त्यास 'तमदुल' असे म्हणता येईल. तमदूलचा अर्थ मानवी शरीर असा होतो. गोंडी भाषेचे द्रविड भाषा परिवारात कोणते स्थान आहे हे पहाण्यासाठी त्या शब्दाचा अर्थ पहाणे मनोरंजक वाटेल. जसे द्रविडसमाजरूपी मानवी शरीर म्हणून तमिळ भाषा कल्पिली तर तेलगू ही तल्ला म्हणजे शिरस्थानी, कन्नड ही कन म्हणजे नेत्रस्थानी, मलयालम ही मियाळम् म्हणजे कन्या ठरते तर गोंडी ही भाषा कोया म्हणजे हस्तस्थानी स्थित होते.

## प्राचीनतम भाषा

न्यायमूर्ती रानडे, फादर हेरास आणि कल्डवेल या थोर विद्वानांनी 'गोंडी' ही प्राचीन तमिळ होय. (Prafo Dravidian–Language) असे म्हटले आहे. यावरून गोंडी भाषा ही सर्व द्रविडसमूहातील भाषांची जननी आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. द्रविडभाषासमूहामधील सर्वच भाषा हृया आर्यांच्या आगमनापूर्वीपासून भारतात अस्तित्वात होत्या हे निर्विवाद सत्य असल्यामुळे इ. स. पूर्वी ३००० वर्षे भारतात अवतरलेल्या संस्कृत भाषेपेक्षाही गोंडी ही प्राचीन असल्याचे सिद्ध होते आणि संस्कृतोद्भव मराठी, हिंदी आदि भाषांपेक्षाही ती ओघानेच प्राचीनतम ठरते.

इ. स. पूर्वी २७५० मध्ये ऋग्वेदाची रचना झाली. तेव्हा गोंडीला 'मृध्रवाचः' असे म्हटले जात असे. ती आर्यांना अनाकलनीय असल्याने ती 'मुडदाड वाची' संबोधिली गेली.

रामायणकाळात (१) भानुबी भाषा ही आर्यांची भाषा (२) संस्कृत पंडितांची द्विजाती भाषा आणि (३) वानर म्हणजे वननरांची द्रविड भाषा म्हणजे गोंडी भाषा अशा तीन प्रकारच्या भाषा होत्या.

गोंडी भाषेचे प्राचीनत्व सिद्ध करण्यासाठी गोंडी भाषेचा सलग आणि सुसंबद्ध इतिहास उपलब्ध नसला तरी तिचे सहअस्तित्व गोंड राजे आणि गोंडी प्रजेबरोबर अनायासे सिद्ध होते.त्यामुळे गोंडी भाषिकांच्या इतिहासपरंपरेवर दृष्टिक्षेप टाकणे येथे आवश्यक आहे.

(१) सर कनिंघमच्या मते इ. स. ३८२ साली गोंड राजा या दोरायने गोंडवण राज्याची स्थापना केली आणि १८५० मध्ये शंकरशहाच्या बलिदानानंतर गोंडवण संपुष्टात आले. या १४०० वर्षांच्या गोंडवणाच्या कारकीर्दीमुळे गोंडी भाषेचे राजकीय अस्तित्व सिद्ध होते.

(२) डॉ. हंसमुख सांकलियांनी गोंडांचा इतिहासकाळ २००० वर्षे मागे रेटत नेऊन प्रागैतिहासिक काळातील वैभवाचे धनी बनवून गोंड लोकांना भारतीय इतिहासाच्या समृद्धीचे पाईक ठरविले आहे.

(३) सरदार किबे, डॉ. हिरालाल, डॉ. हंसमुख सांकलिया, जी. रामदास इत्यादि विद्वानांनी रावण हा पराक्रमी गोंडराजा असल्याचे सिद्ध करून त्याची सोन्याची लंका, सुवर्णवैभव आणि सर्वोच्च संस्कृति गोंड लोकांच्या वाटयाला दिली. गोंड लोक हे प्राचीन भूमीचे वतनदार आणि स्वामी होत असे संस्कृतकारांनीही मान्य केले आहे.

**खिलजी वंश शकेन्द्राणां अन्धेन तमसावृतः ।**
**गोंड वंश भूमींन्द्राणां शीघ्रमेव करलगतः ।।**

(४) पुराणकालातही भारतावर गोंडांचे स्वामित्व होते ते डॉ. चॅटर्जी आणि डॉ. जयनाथ पाती यांनी खालील उताऱ्यात स्पष्ट केलेले आहे.

"भारतामध्ये आलेले आर्य हे त्यांच्यापेक्षा अधिक सुसंस्कृत असलेल्या द्रवीडियन कोई लोकांशी निगडित झाले. द्रवीडियन कोईलोकांच्या भाषांचा प्रभाव आर्यांवर पडला. बाहेरून आलेल्या आर्य टोळचांना कोणतीही संस्कृति अगर धर्म नव्हता. त्यामुळे भारतातील मूळ रहिवासी असलेल्या द्रवीडियन कोई लोकांच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरा इत्यादि गोष्टींनाच आर्यांनी आत्मसात करून साहित्यबद्ध केले. त्यानांच संहिता असे म्हणतात."

यावरून गोंडी भाषेला संहिता-काळापर्यंतचे प्राचीनत्व लाभते.

(५) ऋग्वेदकाळ हा गोंडी संस्कृतीचा विध्वंस-काळ ठरतो. ऋग्वेदात दुर्योण शहर ही कुयवा राजाची राजधानी असल्याचा उल्लेख असून कुयवाच्या राज्यास कुयवाराष्ट्री असे संबोधिले आहे. कुत्स नामक आर्याने कुयवाची दुर्योण ही राजधानी जाळून भस्म केल्याचा पुरावा ऋचा[१] ४/१६/१२ मध्ये मिळतो. हेच दुर्योण शहर उत्खनित झालेले मोहेंजोदारो असल्याचे ॲडव्हो-केट देशमुखांनी सिद्ध केले आहे. फादर हेरासच्या मते वास्तव्य काळात मोहोंजोदारोला NARDUR " नारदूर " असे संबोधिले जात असावे असा निष्कर्ष काढल्यामुळे " दुर्योण " म्हणजेच " नारदूर " होय आणि त्याचा गोंडी मध्ये "धुर्वेचे गाव" किंवा "दुर्वेचे घर " असा अर्थ होतो.

या सर्व बाबींवरून हे लक्षात येते की, गोंड लोक वेद पूर्वकाळापासून केवळ प्रजा म्हणून नव्हे तर प्रजापती म्हणूनही या खंडप्राय भारतात वास्तव्य करीत होते. त्यामुळे त्यांची गोंडीभाषा ही वेदपूर्वकाळापासून भार-तात प्रामुख्याने बोलली जात आहे. तरीदेखील काही मंडळींचे असे म्हणणे आहे की, " गोंडी ही भाषा नसून बोली आहे. त्यातही ती इतकी क्षुल्लक आहे की, भार-तातील एकूण १५ राजभाषा, २८० मातृभाषा आणि १६५२ बोलीभाषामध्ये तिचा क्रमच लागत नाही. "

वस्तुत: गोंडी ही केवळ भाषा नव्हे तर गोंडवण राज्याची राज्यभाषा आणि ऋग्वेदकाळापूर्वीची कुयवा राष्ट्रींची राष्ट्रभाषा होय हे सहज लक्षात येते.

१९३१ च्या शिरगणतीत गोंडी भाषिकांची लोक-संख्या ३६,४२,३७६ आणि १९६१ साली ती २३,२२,३९६ इतकी होती. त्याउलट देववाणी म्हणून डोक्यावर मिरवण्यात येणारी संस्कृत ही मातृभाषा अस-णारे एकही कुटुंब या भारतातच नव्हे तर जगाच्याही पाठीवर अस्तित्वात नाही.

## ब्राह्मीलिपीची जननी

गोंडीला लिपी नसल्याचा एक आक्षेप उपस्थित केला जातो. पण मोहोंजोदारोत उपलब्ध झालेली चित्र-लिपी ही गोंडी लिपी होय हे समजून घेणे आवश्यक आहे. फादर हेरासने त्या संदर्भात असे म्हटले आहे की, मोहोंजोदारोची लिपी ही द्रविड प्राचीनांची लिपी होय.. आर्यलोकांनी सप्तसिंधूचा प्रदेश काबीज केल्यावर त्या लिपीचा स्वीकार केला. गोंडांच्या गाई चोरणे आणि गाई चारणे या पलिकडे त्यांना कामे नव्हती. त्यांच्या-जवळ कोणतीही लिपी अगर साहित्यही नव्हते. त्यांनी आर्यपूर्व द्रविडलिपीचा स्वीकार केला आणि त्यातून पाने व शिळावर लिहिण्याचा सराव ठेवला. पुढे त्यात सुधारणा करून ब्राह्मी लिपीचा अवतार झाला. त्यामुळे गोंडी चित्रलिपी हीच ब्राह्मीलिपीची जननी होय हे सिद्ध होते. गोंडी लिपी आता साहित्याची उपलब्धी नसण्याचे एक मुख्य कारण हे आहे की, ऋग्वेदकाळात कुयवाराष्ट्राची दुर्योण राजधानी इ. स. पूर्वी ३२०१ साली जाळून भस्म करण्यात आली.

**दृष्टीत:[२] शंबरस्य साकं हतो अप्रति असूरस्य वीरान् ॥**

ऋचा ७·९९·५

अर्थात " शंकराची तटबंदीची ९९ शहरे फोडून जाळली. ज्याला तोड नाही अशा कर्वाचि असूरांच्या एक लाख लोकांना जाळून टाकले. "

दुसरी एक ऋचा ६·१६·१९ अन्वये भारतवंशा-तील सर्व शत्रूंना जाळून टाकण्यासाठीच आम्ही आर्य लोक अग्नी यज्ञास प्रज्वलित करीत असतो, असा निर्देश मिळतो. द्रविड गोंडाचा नरमेधयज्ञ आमच्या इंद्रास आवडतो व म्हणून यज्ञेन यज्ञमय जन्त देवा: ही[३] प्रार्थना म्हणण्यात येते. पुढे रामनामक आर्याने गोंड राजा रावणाची लंका जाळून भस्म केली. अशा भया-नक जाळपोळीतून गोंड लिपीची आणि साहित्याची उपलब्धी कशी राहू शकेल, याचा अंदाज घेणे कठीण नाही. तहानलेल्या ससाण्याप्रमाणे वर्णलेला कुत्स आणि त्याचे अनुयायी आर्यलोक जेव्हा भारतात आले तेव्हा ' नीर ' म्हणजे ' जल ' पाजून त्यांना जीवदान देणारी गोंड ही एकमेव भाषा होय. "

गोंड शब्द ' येर ' म्हणजे पाणी या शब्दाचा ' नीर ' अपभ्रंश आहे. प्रा. डे, मोनियर विलियम्स, सुरेंद्रनाथ बॅनर्जी आणि डॉ. राधाकृष्णन् आदि विद्वानांचे मत हेच आहे की, नर किंवा नीर शब्द गोंडीमधून संस्कृतात आला आहे. गोंडीतील ' येरमे ' म्हणजे ' पाण्यात चरणारा ' या अर्थाने कुलगोत्र गोंड लोकात सुरुवाती-पासून आहे. फादर हेरास याने तर गोंडीत नदीला ' इर ' असे म्हणतात म्हणून सांगितले आहे. भारता-तील ललामभूत नद्यांची येथे निसर्गाने महान् देणगी दिली. नद्यांचा जन्म झाला; पण त्यांचे नामकरण संस्कार केवळ गोंडांनीच केलेले आहेत. उदाहरणार्थ नर्मदानदी गोंडीतील ' नीर+मंदा ' म्हणजे ' पानी+

मुबलक आहे ' या शब्दापासून तयार झाली आहे. सरयू हा शब्द गोंडीतील 'येर+वोयू' म्हणजे 'पाणी+नेणारी' या शब्दांनी बनला आहे.

क्षिप्रा नदी हा शब्द गोंडी देवता शिपीशेळमा म्हणजे 'जलदेवता' हिचे नामाभिधान म्हणून प्रचलित झाला आहे. परुष्णीनदी गोंड शब्द 'परास+नीर' म्हणजे 'भोपळा+पाणी' भोपळ्यातील पाण्यासारखे पवित्र अर्थाने झाला. वितस्ततानदी गोंडीतील 'येर+तुस्ता' म्हणजे 'पाणी+वाटली' या शब्दांनी बनलेली आहे. असिक्नीनदी गोंडीतील 'येर+सीका+नीक' म्हणजे पाणी+(वरदान) देईन+तुम्हांस' या अर्थाच्या शब्दांनी तयार झाली आहे. गोदावरी ही गोंडीतील 'गिर्द+आयेव+इर' म्हणजे वात्सल्य लंपट+होणारी+नदी' या शब्दांनी बनली आहे. हिन्दी भाषिक भी यह रूपसे जानते है की गंडकीनदी गोंडोकीही नदी है। यावरून लक्षात येईल की नद्यांच्या नामकरणकाळापासून गोंडी भारतात अस्तित्वात आहे आणि गोंडी भाषेएवढी अन्य कोणतीही भाषा भारतात प्राचीन ठरू शकत नाही.

अन्य स्थळांचाही गोंडी भाषेतूनच अचूक अर्थ लागतो. नर्मदेच्या उगमस्थानाला त्रिकूरा शिखरावरील अमरकंटक असे म्हणतात. तो गोंडीतील 'ओर+मुन+मटांक' म्हणजे 'ती+तीन+शिखरे' या शब्दांनी बनला आहे. 'उंडकारण' हा गोंडीतील 'डंगूर्कुरीन' म्हणजे 'जंगल+बाग' या शब्दांनी तयार झाला आहे. हेरासने कुरी म्हणजे Land असे सांगितले आहे.

गोंडीतील 'लकना' म्हणजे 'दूरचा' या शब्दापासून 'लंका' हा शब्द तयार झाल्याचे डॉ. संकलियांचे म्हणणे आहे आणि पन्हाळगड हा 'पाळालगड' म्हणजे प्रधानगडच होय हे स्पष्टपणे दिसून येते. पर्वत हा शब्द 'पर्रो+वात' म्हणजे 'वर+आलेला' या गोंडी शब्दापासून तयार झाला आहे.

पोहणे पसरणे आणि गोंडीत 'भिडमाळ' हे क्रियापद आहे. पोहणारा या अर्थाने 'मीन' म्हणजे मासा गोंडीत तयार झाला. तो तसाच संस्कृतात आला. सेतुमाधव पगडींनी गोंडीतून नामकरण झालेल्या १९ गावांची यादी दर्शविली. त्यात मकीगुडा हे गाव आंबेगाव अर्थाचे, रेंगनगुडा हे बोरगाव अर्थाने, अलिपूर हे गाव पिंपळपूर या अर्थाने झाल्याचे सांगितले. ह्याचप्रमाणे गोंडी मिच्चोकपासून 'वृश्चिक' टूटूमपासून 'उष्ट्रम', फेरापासून 'परम्' आणि 'पीर्र' पासून 'पर्जन्य' शब्द तयार झालेले आहेत. येरेत्रीपासून हेळम्बा आणि बरापासून वराह 'रियोक' पासून 'युवक' हे शब्दही तयार झाले आहेत.

ही आणि अशी हजारो गोंडी शब्दांची खाण संस्कृतमध्ये कशी सापडली? असा प्रश्न सहज डोकावतो. याचे कारण आर्य आणि द्रविड गोंडामधील हजारो वर्षांच्या संघर्षात लपलेले आहे. आर्यांनी गोंडांची शहरे जाळलीत. त्यांना देशोधडीस लावले; परंतु गोंड स्त्रियांना आर्यांनी आपल्या बंदिवासात ठेवले. हजारो गोंड स्त्रियांना दासी बनवून आर्यांनी त्याना आपल्य वासनेचा विषय बनवून भारतात त्यांच्यापासून आर्यप्रजेची वाढ केली.

## भाषेची सरमिसळ

तात्पर्य हेच की हजारो गोंड स्त्रिया ह्या आर्यांच्या कुटुंबात मिसळल्यामुळे त्यांची गोंड भाषाही त्यांच्याबरोबर संस्कृत भाषेत शिरली. त्याचाच परिणाम संस्कृतमध्ये हजारो गोंडी शब्दांचे प्राचुर्य दिसून येत आहे.

गोंडी भाषा ही मराठीची जननीच म्हटली पाहिजे. मराठीतील 'आई' हा पवित्र शब्द गोंडीतील 'अवा 'आया' शब्दापासून आलेला आहे. तो संस्कृतातील मातृपासून कधीच आलेला नाही. सुरुवातीला असे विधान मराठीकारांना खटकल्याशिवाय रहात नाही. पण गोंडीने लोण्याचे गोळे खायला दिले तर ते मिटकावून गिटकल्याशिवायही रहायचे नाहीत. मराठीतील लोणी हा शद्व गोंडीतील 'पालणी' या शद्वापासून आलेला आहे. गोंडीतील 'पाल' म्हणजे 'दूध' व 'नीइ' म्हणजे 'तेल'. दुधाचे तेल या अर्थाने 'पालणी' म्हणजे लोणी हा शद्व गोंडीत तयार झाला. 'पा' चा लोप होऊन मराठीत 'लोणी' शद्व त्याच अर्थाने आला.

## मराठीचे मूळ तामिळ भाषेत

मुंबईच्या एका व्याख्यानमालेत बोलताना श्री. वि. आ. खेर म्हणाले की, मराठी भाषेचे मूळ हे संस्कृतात न शोधता प्राचीन तमिळ भाषेत शोधणे आवश्यक आहे. कारण प्राचीन तमिळचे स्वरूप मराठीशी जुळते. मराठी क्रियापदाची भविष्यकाळातील रूपे ही लका-

रान्त स्वरूपाची असून ती संस्कृतशी मेळ न जमता प्राचीन तमीळशी मिळतात.' येथे प्राचीन तमीळ म्हणजेच गोंडी होय, हे लक्षात घेतले पाहिजे. मराठीतील जाईल, येईल, खालील मधील 'ल' गोंडीतील हंदाल, वायाल, तिदाल, या शद्वातही तसाच दिसून येतो.

मराठी भाषेवरही गोंडी भाषेचा विशेष प्रभाव आहे. मराठीतील 'तंबोरा' हा गोंडीतील 'तुंबा+वारा' म्हणजे 'भोपळा+गातो या शद्वापासून तयार झाला आहे. 'लय' हा शद्व गोंडीतील 'लेड्' म्हणजे गळ्यातील काढलेला 'आवाज' या शद्वापासून आलेला आहे. 'सरीता' हा शद्व गोंडीतील 'सरी + ताके' म्हणजे 'रस्ता + चालणारी' यापासून तयार झाला आहे. 'वाटसरू' हा शद्व गोंडीतील 'वात+सरी' म्हणजे 'आलेली + रस्ता या शद्वापासून तयार झाला आहे. वारा, वात, वायू हे शद्व गोंडीतील 'वामाळ' क्रियापदाची रूपे असून गोंडीत वाऱ्याला 'वळी' असे म्हणतात. गोंडी शद्व कूर्स म्हणजे हरिणी यापासून लक्षणेने मराठीत 'कृष' हा हडकुळा अर्थाचा शद्व आलेला आहे. त्रास हा मराठी शद्व गोंडीतील 'तरास' म्हणजे सर्पापासून लक्षणेने आला आहे.

गोंडीतील मट्टा म्हणजे 'टेकडी' पासून 'माथा,' वल्ला आमाळ म्हणजे 'पुष्कळ होणे' पासून पाल्हाळ; हुकमाळ पासून हुडकणे असे अनेक मराठी शद्व आलेले आहेत आणि गोंडी भाषेची प्राचीनताही सिद्ध झालेली आहे

म्हणूनच ॲडव्होकेट पी. आर. देशमुख म्हणतात 'हिंदुस्थानातील मराठी वगैरे विविध भाषा ह्या संस्कृतमधून निर्माण झाल्याचे समजणे मूर्खपणाचे आहे. कारण त्यामुळे भाषांच्या इतिहासाचा एक विचारप्रवाह गडप झालेला आहे.' अशा प्रकारच्या आधुनिक विचार प्रवाहाने गोंडी भाषेचा कायापालट होण्यास आता विलंब लागणार नाही, असा विश्वास वाटतो. ■

---

**प्रस्तुत लेख आम्ही पुणे विद्यापीठाच्या 'संस्कृत प्रगत अध्ययन केंद्रा'कडे विचारार्थ पाठविला होता. त्यांच्याकडून आलेली माहिती पुढीलप्रमाणे आहे. — संपादक**

१. ऋ. ४·१६·१२ मध्ये इंद्राने कुत्सासाठी शुष्ण नामक असुराला मारले, सकाळी कुयवनामक असुराला मारले, तसेच कुत्साचे शस्त्र जे वज्र त्याने शत्रूंचा नि:पात केला व सूर्यचक्र भिन्न केले, असा उल्लेख आहे. त्यावरून कुयवराजाची राजधानी जाळल्याचा अर्थ निष्पन्न होत नाही. "दुर्योण" या राजधानीचा या ऋचेत उल्लेखही आढळत नाही. दुर्योणाचा उल्लेख ऋ. ५·२९·१० मध्ये येतो; परंतु त्याचा अर्थ संग्राम असा असून राजधानी किंवा शहर असा नाही. या ऋचेत इंद्राने मूक दस्यूंना व वाईट बोलीच्या लोकांना वज्राच्या सहाय्याने युद्धात मारल्याचा उल्लेख आढळतो.

२. ऋचा ७·९९·५.

इन्द्राविष्ण दृंहिता: शम्बरस्यू
नव पुरोनवति च श्नतिष्टम् ।
शतं वर्चिन: सहस्रं च
साकंहथो अप्रत्यसुरस्य वीरान् ।

प्रस्तुत ऋचा लेखात अपूर्ण व चुकीच्या स्वरूपात आली आहे. इंद्र व विष्णू या दोन देवतांना या ऋचेत असे आवाहन केलेले आहे की; शंबराची ९९ शहरे त्यांनी नष्ट करावी, तसेच असुरांच्या सहस्रावधी बलवान सैनिकांना एकत्रच मारावे.

३. ऋ. १०·१६४·५०

"यज्ञेन यज्ञमयजन्त देवा:" या ऋचेचा अर्थ व्यंजनेनेही नरमेधाविषयी काही सांगत नाही. तो अर्थ कसा निषन्न होतो याची कल्पना करता येत नाही. ■

आदिवासी साहित्याची चळवळ

# वणी येथील दुसरे आदिवासी साहित्य संमेलन



भाऊसाहेब मडावी

मराठी साहित्याच्या संसारात नव्यानेच जन्माला आलेलं हे 'आदवासी' साहित्य! साहित्य हे काय आहे? हे अजूनही बऱ्याच आदिवासींना समजलेलं नसावं असं स्पष्ट सांगून, का समजू शकलं नाही हे मात्र सांगणं कठीण जाईल. या भूमीवर मानवाची ग्वाही देणारा 'आदिवासी' हा शब्द विशिष्ट संस्कृतीने पछाडलेल्या, अंधारात चाचपडत असलेल्या विशिष्ट सामाजिक समूहाची ओळख करून देण्यासाठी सर्व मुखी औपचारिकरीत्या वापरला जातो. भारत सरकारपासून तर त्या अंतर्गत येणाऱ्या सर्व राज्यांत आदिवासी ह्या शब्दाचा मोठा गाजावाजा होतो. आज येथील विभिन्न भाषिकांनी त्यांच्यावर, त्यांच्या संस्कृतीवर विशेष विवेचन केलेलं दिसत नाही.

'आदिवासी साहित्य' हे एका विशाल अशा मोठ्या झाडाचं एक लहानसं रोपटं आहे. आयुष्याच्या आरंभी ज्यात काही अर्थ आहे, असं वाटतं त्यातच खोल अर्थ भरलेला आहे, हे आयुष्याच्या शेवटी आढळून येतं. झाड चांगल्या रीतीनं वाढविण्यासाठी पावसाइतकंच ऊनही आवश्यक असतं. आम्ही फक्त त्यांच्या पायांत मणामणाच्या बेडया ठोकल्या आहेत नी अज्ञानाच्या तुरुंगात दारिद्र्याच्या अंधारकोठडीत त्यांना कोंडून ठेवलं आहे. समाजाला विचारतो आहोत, आमचे पंख कापल्यावर कधी उडायला येईल का? आदिवासी साहित्याने त्याला भूतकाळात नेऊन फसनित्रिणाऱ्या सर्व बाबींची सूची समाजापुढे ठेवली आहे. आपल्या समाजाचं रूप पालटण्यास, अंतरंगबदलाच्या अपर्यायी प्रतिज्ञा ह्या साहित्याच्या रक्त प्रत्यंगातून हुंकारत आहेत. हे या साहित्याचं राष्ट्रीय व सामाजिक महत्त्व आहे. पूर्ण विकसित जीवन–जाणिवांनी मराठी साहित्याचा संसार थाटण्यात आणखी भर पडेल. ह्याने साहित्याचं वाङमयीन महत्त्व वाढेल. आदिवासी साहित्याची मूल्ये आता संस्कार म्हणून लहान मुलांच्या मनात पेरावीत, ते त्याचं शैक्षणिक महत्त्व ठरेल. समाजाच्या तसेच माणुसकीच्या ही शुभांचा तो आकार ठरेल. आदिवासी साहित्याने या प्रगत समाजापुढे अशी कैफियत मांडली आहे की, आदिवासींचे मुख्य दैवत भगवान पेरसापेनसारख्या व क्रांतिकारी साहित्याकांना स्मरून आपल्या समाजाने आता तरी डोळे उघडावे, अशी ह्या साहित्याची नम्र विनंती आहे. आदिवासीतील अंध श्रद्धा, मांत्रिक पद्धती, सध्याच्या प्रगत समाजाच्या जवळीक संबंधाने धर्मांतर वगैरेंनी व कर्मविपाकासारख्या बाबींनी मानवानेच मानवाला लुबाडलं आहे. अपूर्व सत्य आपल्या समाजाला सांगण्यासाठी ह्या साहित्याने ओठात घेतलं आहे. श्रेष्ठ जीवनमूल्यांचा व कलामूल्यांचाही अपूर्व एकरस मीलनसोहळा साकार करणारं साहित्य यापुढे आदिवासी साहित्य म्हणून ओळखलं जाईल. त्याने मांडलेला कलावादही आदिवासी साहित्याच्या इतिहासासाठी गौरवाचा महिमा होईल. मराठी साहित्याच्या प्रवाहात 'जनवादी साहित्य', 'ग्रामीण साहित्य', 'दलित साहित्य', 'बौद्ध साहित्य' आणि नव्यानेच प्रारूपास आलेलं 'आदिवासी साहित्य' असे वेगवेगळे प्रवाह जन्म घेत आहेत.

भद्रावती येथे झालेल्या पहिल्या–वहिल्या आदिवासी साहित्य संमेलनाला लाभलेले प्रमुख अतिथी म्हणून

प्रख्यात साहित्यिक सर्वांचे आवडते प्राचार्य राम ऊर्फ नानासाहेब शेवाळकर यांनी वणीत एक साहित्याची बाग जोपासली आहे. बागेत गुलाबासारखी अनेक प्रकारची फूलझाडे, तर बाभळी–बोरीसारख्या काटेरी झाडांना खतपाणी घालून फुलवित आहेत. अशा ह्या साहित्याच्या बागेत 'आदिवासी साहित्य' हे बाभळी-बोरीसारखं, मराठी साहित्याच्या संसाराचं रक्षणकरतं साहित्य संमेलन म्हणून पार पडलं. वणी येथील 'दुसऱ्या आदिवासी साहित्य संमेलनाला' उद्‌घाटक म्हणून आदिवासी कल्याण उपमंत्री शिवाजीराव मोघे आणि उपमंत्री यशवंतराव शेरेकर, संमेलनाचे आधारस्तंभ म्हणून आदिवासींचे झुंजारनेते बाबूरावजी मडावी आणि संमेलनाचे अध्यक्ष म्हणून महाराष्ट्र ख्यातीचे दलित साहित्यिक व एक उत्तम समीक्षक प्राध्यापक रावसाहेब कसबे हे लाभले.

लाडक्या व झुंजार नेत्याने साहित्यकांना विचारात पाडलं. या संमेलनात अनेक गोष्टी प्रथमच उजेडात आल्या. जिथं, जंगलात अनेक प्रकारची काटेरी, विषारी झाडे असतात, त्यात चंदनासारखीही झाडे असतात व ते आपल्या श्वासाने पूर्ण जंगलातील वास्तव्यास आपल्याकडे आकर्षित करून घेतात. अशीच कथा यवतमाळ जिल्ह्यातील **अरुण गिरडकर** ह्या तरुण चित्रकाराची आहे. हा तरुण आदिवासी चित्रकार मुंबईत राहून आदिवासींच्या समस्या व त्यांच्यावरील अत्याचार आपल्या कुंचल्यातून चितारतो. हा आदिवासीतील पहिलावहिला चित्रकार असावा. चित्रप्रदर्शनाचं उद्‌घाटन जगप्रसिद्ध चित्रकार भाऊ समर्थ यांनी केलं. संमेलनानिमित्ताने आयोजित केलेली '**पोस्टर पोएट्री**' मनोवेधक होती. तसंच आदिवसी कवींचा पहिलावहिला काव्यसंग्रह '**मोहळ**' ही या वेळी प्रकाशित करण्यात आला.

# बोलीभाषेत वाङ्‌मय निर्माण होण्याची गरज

'सध्याच्या अस्तित्वात असलेल्या आदिवासींच्या बोलीभाषेतील शब्दांना प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी त्याच बोलीभाषेत वाङमय निर्माण झाले पाहिजे. मराठी भाषेच्या समृद्धीमध्ये भर घालण्यासाठी मराठी भाषेतील शब्दांचा ह्या बोलीभाषेतील बलदंड शब्दांशी संकर होणे जरुरीचे आहे. त्यासाठी साहित्यिक समीक्षेचे मापदंड बदलण्याची पाळी आली तरी हरकत नाही' असे प्रखर विचार प्राध्यापक कसबे ह्यांनी अध्यक्षीय भाषणात मांडले.

'आदिवासी साहित्याची चळवळ ही केवळ साहित्यापुरती मर्यादित नाही तर आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी मार्गदर्शन मिळून त्याचा लाभ सर्वसामान्य आदिवासींना मिळावा' अशी अपेक्षा श्री. शिवाजीराव मोघे व श्री. यशवंतराव शेरेकर यांनी व्यक्त केली; परंतु आमदार बाबूरावजी मडावी यांनी आपल्या भाषणात आदिवासींवर होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडून, 'सरकारच्या विकासाच्या योजना सदोष नियोजनामुळे आदिवासींसाठी फलद्रूप नाहीत' असं सांगितलं व 'आदिवासी साहित्याला नियोजनाचे स्वरूप देता येईल काय? हा महत्त्वपूर्ण प्रश्न साहित्याकांपुढे मांडला. नव्यानेच जन्माला आलेल्या आदिवासी साहित्याकडून इतपत अपेक्षा व्यक्त करून मात्र आमच्या

कविसम्मेलनाच्या निमित्ताने कविवर्य सुधाकर गायधनी यांच्या अध्यक्षतेखाली श्रीमान विनायकराव तुमराम, पुरुषोत्तम शेडमाके, भुजंग मेश्राम, डॉ. निलकांत कुलसंगे, कु. उषाकिरण आतराम, अरुण गिरडकर, वासुदेव आतराम, बामनराव इंगळे, अशोक थोरात, धर्मराज निमसरकर, या नवोदित आदिवासी

आदिवासीतील बंजारा समाजातील तरुण कवी श्री. आत्माराम राठोड यांची एक कविता आज आमची मनोवेदना अचूकपणे व्यक्त करते आहे, असं वाटतं ... त्यांच्या कवितेच्या ओळी अशा,

**'चक्रव्यूहात शिरलेले**<br>
**आमचे अवघे दिवस**<br>
**अवसेने बेडीबंद केलेल्या अवघ्या रात्री**<br>
**अजून संपायच्या आहेत**<br>
**यापुढची घटना आम्हीही लिहू**<br>
**अजुन आमची भाषा**<br>
**लिपीबद्धच व्हायची आहे.**

कवींच्या कविता श्रोत्यांच्या आक्रोषित मनाचा ठाव घेत होत्या. श्री. विठ्ठलराव कन्नाके यांच्या गोंडी भाषेतील कवितांनी तर कविसंमेलनात आगळीच बहार आणली.

आदिवासी साहित्यसम्मेलनाच्या दुसऱ्या दिवशी **नेताजी राजगडकर** यांच्या अध्यक्षतेखाली, 'आदिवासी साहित्याच्या प्रेरणा आणि दिशा' या विषयावरील परिसंवादात जनवादी साहित्याचे पुरस्कर्ते प्रा. या. वा. वडस्कर, वामनराव इंगळे, नागेश चौधरी, एकनाथराव साळवे आणि प्रा. रावसाहेब कसबे यांनी भाग घेतला.

'साहित्याच्या क्षेत्रात आज जाणीवपूर्वक आवाज उठविला जात आहे त्याचा हेतू, आदिवासी जंगलात दऱ्याखोऱ्यात फेकला गेला आहे व ज्याने फेकणे नाकारले त्याची स्थिती काय? याचा शोध घेण्याची प्रेरणा आदिवासी साहित्यात आहे. समाजपरिवर्तनाची, संघर्षाची दिशा साहित्यातून स्पष्ट व्हायला हवी.' असं प्रा. या. वा. वडस्कर यांनी आपल्या भाषणात सांगितलं.

'आदिवासींचे जीवन रेखाटणे म्हणजे आदिवासी साहित्य नव्हे, तर सध्याच्या सर्व चळवळीत माझा आदिवासी कुठे आहे हे शोधणे अगत्याचे आहे. जे साहित्य समाजजागृतीचे कार्य करू शकणार नाही ते आदिवासी साहित्य होऊ शकणार नाही.' असे विचार परिसंवादाचे अध्यक्ष नेताजी राजगडकर यांनी मांडले. या परिसंवादात मांडलेल्या विचारांवरून दलित साहित्य, जनवादी साहित्य आणि आदिवासी साहित्य हे परस्परांपासून भिन्न आहेत, असा संभ्रम निर्माण झाला; परंतु रावसाहेब कसबे यांनी आपल्या चर्चेतून खालील विचार व्यक्त केले.


'आदिवासी साहित्य जातीय चळवळींना खतपाणी घालणार आहे काय? या चळवळी निर्माण होतील तसतसे आपण अधिक व्यापक होऊ. दलित साहित्य निर्मितीच्या वेळी उपेक्षित वर्ग प्रस्थापित साहित्यिकांना विचारीत होता की, तुमच्या साहित्यात दलित कुठे आहे? त्याचेच अनुकरण म्हणा, आदिवासी माणूस जागा झाला आहे. आज आदिवासीतील साहित्यिक दलित साहित्याला विचारीत आहेत की, दलीत साहित्यात आदिवासी कुठे आहे?'

दुसऱ्या सत्रात प्रा. या. वा. वडस्कर यांचे अध्यक्षतेखाली 'सामाजिक चळवळी व आदिवासी' या विषयावर **'रूषी मसराम'** 'इतिहास-लेखन व आदिवासी' यावर **व्यंकटेश आतराम**, 'साहित्यिक चळवळी आणि आदिवासी' या विषयावर आदिवासी साहित्याचे शिल्पकार **विनायकराव तुमराम** यांची अतिशय निकटची व अभ्यासपूर्ण भाषणे झाली. श्री. विनायकराव तुमराम यांनी आपल्या चर्चेत, 'आजपर्यंतच्या कोणत्याही चळवळीने आदिवासींच्या सुखदुःखाची व्यथा समजावून घेण्याचा प्रयत्न केला नाही' असं सांगून, 'दलित साहित्य गावकुसाबाहेर निर्माण झाले; पण ते जंगलातील आदिवासीपर्यंत पोहचू शकले नाही' असा आरोप केला.

अशा रीतीने चर्चासत्राच्या दुसऱ्या दिवशी संपूर्ण संम्मेलन उल्लेखनीय ठरलं. साहित्याच्या क्षेत्रात आदिवासी साहित्याने संपूर्ण 'आदिवासी' या एका शब्दाखाली इतर साहित्याच्या संदर्भात आपली वेगळी भूमिका दर्शविली. सम्मेलनाच्या समारोपप्रसंगी झालेल्या खुल्या अधिवेशनात, 'येत्या लोकसभा अधिवेशनात जे वनविधेयक येत आहे ते आदिवासींवर घोर अन्याय करणारे आहे. ते विधेयक मागे घेण्यात यावे.' असा ठराव करण्यात आला.

पहिल्या-वहिल्या आदिवासी साहित्यसम्मेलनाचे शिल्पकार श्री. विनायकराव तुमराम यांनी महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यात भद्रावती या ग्रामीण भागात पहिले सम्मेलन घेऊन इतिहासपूर्ण कार्य घडवून आणले, त्यांचे आभार मानावे तेवढे अपुरेच आहे त्यांच्या पावलावर पाऊल टाकून वणी येथील 'आदिवासी साहित्य' सम्मेलनाचे कार्याध्यक्ष श्री. राजाभाऊ राजगडकर व त्यांचे सहकारी यांनी घेतलेले परिश्रम विशेष वाखाणण्यासारखे होते. ह्या सम्मेलनात आदिवासी साहित्यसम्मेलनाचं पहिलं कार्यकारी मंडळ म्हणून व भद्रावतीतील पहिल्या साहित्यसम्मेलनामध्ये जाहीर केल्याप्रमाणे वैयक्तिक संकुचितपणामुळे साक्षित घेतल्या गेले नसल्याचे आढळले. तेव्हा वेळीच दखल घेणे अगत्याचे आहे. शेवटी तिसरे आदिवासी साहित्यसम्मेलन भंडारा येथे घेण्याचे जाहीर करण्यात आले.

# 'भारतातील जंगल व्यवस्थापन : एक अभ्यास



माधव गाडगीळ
नरेंद्र प्रसाद
राऊफ अली

( मूळ अहवालाचे शीर्षक Forest management in India : A critical Review असे आहे. त्याचे प्रयोजन 'Material for discussion at the meeting of National Committee on Environmental Planning on 28th August 1982' असे दिलेले आहे. हा संक्षिप्त अनुवाद डॉ. अनिल गोरे यांनी केला आहे–संपादक– )

या अहवालाची कल्पना निघाली ती एका समितीच्या कामातून. माजी इन्स्पेक्टर जनरल ऑफ फॉरेस्ट श्री. एम्. के दळवी यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती बस्तरमध्ये होऊ घातलेल्या पाइनवृक्षांच्या लागवडीच्या प्रकल्पाचे गुणदोष तपासणार होती.

या प्रकल्पामध्ये ४०,००० (चाळीस हजार) हेक्टर जंगल साफ करून पाइन लावावे व त्यातून कागद-कारखान्यांना कच्चा माल पुरवावा अशी कल्पना होती. यामुळे अर्थातच या भागात सध्या प्रामुख्याने आढळणारा सालवृक्ष अदृश्य झाला असता. आम्हाला असे वाटले की, या वरवर साध्या दिसणाऱ्या एका प्रश्नाच्या पोटात अनेक प्रश्न लपले आहेत. एका प्रकल्पाचा निसर्गावर परिणाम काय होतो हे पहाण्याऐवजी एकंदरच जेव्हा माणूस जंगलाची मोठ्या प्रमाणावर फेररचना करू पहातो तेव्हा प्रत्यक्षात काय घडते याचा अभ्यास करावा. आम्ही तशी विनंती केली आणि इन्स्पेक्टर जनरल ऑफ फॉरेस्टस यांच्या कार्यालयातून आम्हाला सर्वतोपरीने मदत मिळाली. त्यामुळे देशभर चाललेले जंगल लागवडीचे कार्यक्रम आम्हाला तपासता आले. हा अभ्यास जून १९८१ ते मे १९८२ या काळात झाला.

यापूर्वी कर्नाटक सरकारच्या विनंतीवरून आम्ही त्या राज्यातील बांबूच्या जंगलांचा ५ वर्षे अभ्यास केला. बांबूचा वापर करणारे कारखाने वा सरकारी उपक्रम त्या जंगलाचे व्यवस्थापन कसे करतात, तोड करताना काय नियम वापरतात हे बारकाईने पाहिले. ८१–८२ साली आम्ही वनीकरणाच्या कामात उतरलेल्या तीन स्वयंसेवी संस्थांच्या कामाचा व अनुभवांचा अभ्यास केला.

१९७३ सालापासून आम्ही निसर्गसंरक्षणाचे अनेक कार्यक्रम तपासून पहात आलो आहोत. बंदीपूर व्याघ्र-अभयारण्याचा आम्ही ७५ ते ७९ अशी चार वर्षे अभ्यास केला. पश्चिम घाटातील हत्तींचे जीवन जवळून पाहिले. धरणांचा जंगलावर होणारा परिणाम तपासला.

अशा प्रकारे वनसंरक्षण, वनसंवर्धन व वनउत्पादन अशा तीनही पैलूंशी आमचा परिचय झाला. सरकारी खाती तसेच स्वयंसेवी संस्था दोन्ही प्रकारचे काम आम्ही पाहिले. या विविध अभ्यासात हाती लागलेली माहिती, तसेच इतरांकडून मिळालेली माहिती या सर्वांचे सिंहावलोकन आत्ताच्या अहवालात करावयाचे आहे आणि शेवटी वनांचा समाजाला अधिकाधिक उपयोग होण्यासाठी वनव्यवस्थापनात कोणते बदल करायला हवेत याबाबत निष्कर्ष काढायचे आहेत.

## ऋणनिर्देश

या अभ्यासात आम्हाला अनेक व्यक्ती व संस्थांचे साहाय्य व मार्गदर्शन लाभले. आमच्या समितीचे अध्यक्ष श्री. दळवी, कर्नाटकचे प्रमुख वनरक्षक, दांडेलीच्या वेस्ट कोस्ट पेपर मिलचे अधिकारी, डिपार्टमेंट ऑफ एन्व्हायरॉनमेंटचे अधिकारी यांचा उल्लेख आवर्जून केला पाहिजे. खेडूत व आदिवासी यांच्याकडून आम्ही बरेच काही शिकलो. केंद्र व राज्यसरकारांच्या विविध खात्यांकडून आम्हाला वेळोवेळी आर्थिक साहाय्यही मिळाले. या सर्व मदतीबाबत आम्ही कृतज्ञ आहोत.

## वनांचे कार्य व उपयोग

जंगलांचे अनेक उपयोग आहेत हे सर्वजण जाणतात. त्यांचे ढोबळ मानाने चार प्रकार पडतात : (१) जंगले ही माणसाला उपयोगी पडणाऱ्या विविध वनस्पती आणि प्राणी यांचे भांडार आहेत. (२) पडणारा पाऊस जमिनीत मुरणे, माती पावसाने वाहून न जाणे व मुरलेले पाणी धिमेपणाने मिळत रहाणे यासाठी जंगलांची जरुरी आहे. (३) ग्रामीण जनतेतैकी दुर्बल घटकांच्या अनेक प्राथमिक गरजा जगले भागवितात. (४) अनेक कारखान्यांना कच्चा माल जंगलांतून मिळतो. कोणाला जंगलाचे सौंदर्य भावते, कोणाला त्यामध्ये देवाचे अस्तित्व जाणवते वगैरे भाग वेगळाच.

वनांच्या उपयोगांचा फार उपयुक्त आढावा पुढील लेखात सापडेल.

( Poore, D [ 1976 ] The values of the tropical moist forest ecosystems and the environmental consequences of their removal committee on forest development in the tropics, 4th Session Nov. 1976, Rome F. A. O. )

जंगलांच्या या चौपदरी उपयोगाबद्दल थोड्या तपशिलाने खुलासा करून घेऊ.

(१) जंगलांचा नव्याने पद्धतशीर अभ्यास झाला की दरवेळी अनेक अज्ञात पण उपयोगी पडू शकणाऱ्या वनस्पती उजेडात येतात. त्यात खाण्यालायक वनस्पती असतात. नवी तृणधान्ये, नवे कंद, नव्या पालेभाज्या, नवी फळे सापडू शकतात. दक्षिण अमेरिकेतील अभ्यासात अलीकडे शास्त्रज्ञांना अशा व याच वनस्पती सापडल्या. औषधी वनस्पतींबद्दल असेच सांगता येईल. आजही अमेरिकेत बनणाऱ्या औषधांपैकी ४०% औषधे निसर्गजन्य असतात. उष्ण प्रदेशातील विशेषत: बारमास हिरवी असणारी जंगले शोधल्यास पाने, साली, फळे यामध्ये औषधी गुणधर्म सापडण्याची खूपच शक्यता असते. अशा वनस्पती बरेचदा आधुनिक औषधतज्ज्ञांना माहीत नसतात. केरळमधाल वनसंशोधन संस्थेने अट्टापडी भागात असा शोध घेतला. त्या पहाणीनुसार तेथील आदिवासी ३९ प्रकारची मुळे, ३० प्रकारची पाने, १५ प्रकारची फळे, १२ प्रकारची खोडे, १२ प्रकारच्या साली, २ प्रकारच्या वनस्पतींचे चीक व ९ प्रकारच्या अखंड वनस्पती उपचारासाठी वापरतात. यांचा वापर ताप, जखमा, भाजणे, दुखणे, त्वचारोग वगैरेंसाठी करतात. जंगली झाडपाले शोधून सर्पगंधेसारखे रक्तदाबावर गुणकारी औषध आधुनिक वैद्यकशास्त्राला मिळाले ही गोष्ट तर सर्वांनाच माहीत आहे. केरळमधील पहाणीचा तपशील पुढील रिपोर्टमध्ये दिला आहे.

( Kerala Forest Research Institute Peechi, Dist. Trichur, Kerala, Studies on the changing pattern of man-forest interactions and its implications on ecology and management Research Report No. 5,1980 )

याच अभ्यासात गर्भपात व कुटुंबनियोजनासाठीही औषधे सापडली आहेत.

याशिवाय ज्या वनस्पती आपण शेती, फळबागा वगैरेमध्ये वाढवतो, त्यांचे जंगली सोयरेही भरपूर असतात. जंगली भात, जंगली आंबे, जंगली मिरी, जंगली द्राक्षे, जंगली रागी एक ना दोन. त्यांच्यातील एखादा गुणधर्म गरज पडल्यास माणसाळलेल्या वनस्पतीमध्ये आणणे शक्य असते. उदाहरणार्थ पिकावर एखादा नवीनच रोग पडला तर त्या रोगाचा प्रतिकार करणारी त्या वनस्पतीची जंगली जात शोधून तिच्यापासून नवी संकरित जात तयार करता येण्याची शक्यता असते.

२. जंगलामुळे पाऊस पाढतो, अशी समजूत आहे. या समजुतीचा शास्त्रीय आधार मर्यादितच आहे. एक गोष्ट निर्विवाद की, जंगलांमुळे मातीची धूप कमी होते. पाणी वाहून न जाता जमिनीत मुरण्यास अवसर मिळतो. बारमास हिरव्या जंगलांच्या एका तुकड्यातून दर वर्षी


१ लाख टन माती धुपून जात असेल तर तेवढयाच आकाराच्या वेलची बगीच्यातून २० टन माती धुपेल. तेवढयाच आकाराच्या गवताळ पट्ट्यातून १३० टन माती वाहून जाईल. तर तेवढीच जमीन शेतीखाली असल्यास ३२५० टन धूप होईल. गंगेतून इतकी माती धुपून जाते की, बंगालच्या उपसागरात नवीन बेटेसुद्धा तयार होतात. मलेशियातील एका अभ्यासात दिसून आले की, एक चौरस किलोमीटर जंगलामधून पावसात जर दर सेकंदाला १ घनमीटर पाणी वाहून जात असेल तर जंगल कापल्यावर ४३ घनमीटर पाणी वाहून जाते. म्हणजेच हे फरकाचे ४२ घनमीटर पाणी त्या जागी जंगल असते तर जमिनीत मुरले असते. भारतातही जंगले गेल्यामुळे पूर वाढले असे शास्त्रीय दृष्टया ठामपणे म्हणता येते.

३. मनुष्यांच्या बहुतेक सर्व गरजा आदिकालापासून जंगलांमधूनच भागवल्या जात आल्या. आजही जगातील पण त्यातल्या त्यात मागास देशांतील ग्रामीण जनता अनेक गोष्टींसाठी जंगलांवर विसंबून असते. जळणासाठी तर शहरातील गरीबही जंगलावरच अवलंबून आहेत. बहुसंख्य गरिबांची घरकुले जंगलउत्पादनापासून बनतात. गुरांना चाऱ्यासाठी जंगलाकडेच बघावे लागते. बहुसंख्य आदिवासींचे तर रहाण्याचे ठिकाणच जंगल आहे.

४. आज अधिकाधिक कारखाने कच्चा माल म्हणून जंगलसंपत्तीचा वाढत्या प्रमाणावर वापर करीत आहेत. कौटिल्याच्या अर्थशास्त्रामध्ये साग, देवदार, बांबू, वेत, प्राण्यांची कातडी यांचा महत्त्वाचा कच्चा माल म्हणून उल्लेख केला आहे. शिवाजीमहाराजांनी १७ व्या शतकामध्ये जहाजबांधणीसाठी जंगलतोड करण्यावर निर्बंध घातले होते. या ऐतिहासिक गोष्टी खऱ्या असल्या तरी जंगलसंपत्तीला मोठे व्यापारी महत्त्व आले ते इंग्रजांमुळे. त्यांना आगगाड्यांच्या रुळांखाली घालायला लाकडी स्लीपर्स लागत. आज कागद, प्लायवुड, काड्यांच्या पेट्या, टर्पेनटाइन, टॅनिन व इतर अनेक गोष्टी, द्रव्ये व औषधे बनविणाऱ्या कारखान्यांना कच्चा माल जंगलातून मिळतो.

## (ब) आपल्या निसर्गाची आजची अवस्था

**१. जमीन** : भारत हा एक खंडप्राय देश आहे. एका बाजूला उत्तुंग पर्वत, तर दुसरीकडे नद्यांची विस्तीर्ण



खोरी, एकीकडे तुफान पाऊस, तर दुसरीकडे ठणठणाट. आपली एकूण जमीन आहे ३० कोटी हेक्टर किंवा ७५ कोटी एकर. पैकी २ कोटी हेक्टर अनुत्पादक, २ कोटी हेक्टरवर गावठाणे वा कारखाने, १५ कोटी हेक्टरवर शेती, ७॥ कोटी हेक्टरवर जंगल, १ कोटी हेक्टरवर कुरणे तर उरलेली पडीक ! ज्याना जंगल म्हटले जाते त्याच्यापैकी निम्म्याच जमिनीवर झाडोरा आहे. शेतजमिनीपैकी ९ कोटी हेक्टर जमिनीची वेगाने धूप होत आहे. किमान १ कोटी हेक्टर शेतजमीन पाणथळ किंवा खारी झाली आहे. ज्या जमिनीवर उत्पादक शेती होत नाही ती सर्व जंगलाखाली यायला हवी. एका हिशेबानुसार जवळपास १२ कोटी हेक्टर जमिनीवर जंगल वाढविण्याची गरज आहे.

**२. जीवसृष्टी** : वर सांगितल्याप्रमाणे कागदोपत्री जंगल म्हणून नोंद असलेल्या जमिनीपैकी ५८ टक्के जमिनीवर झाडोरा आहे. तोही बेताचा. फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडिया १९८२ अनुसार फक्त ०.६० कोटी हेक्टर जंगल (नामके वास्ते जंगलाचा दहावा हिस्सा फक्त) उत्तम नैसर्गिक अवस्थेत आहे. जगातील जमिनीपैकी फक्त २% जमीन भारताच्या वाट्याला आली आहे; पण जीवसृष्टीच्या एकूण ज्ञात जातींपैकी ५% जाती भारतात आढळतात. हा ठेवा जतन करण्याऐवजी आपण तो गमावून टाकत आहोत.

**३: माती आणि पाणी** : जंगले कमी होण्याचा सर्वात जास्त परिणाम होतो तो माती आणि पाणी यांच्यावर. असे म्हणतात की, आपली सर्वांत मोठी निर्यात आहे जमिनीवरील मौल्यवान मातीची. ही सगळीच देशाबाहेर जाते असे नाही. बरीचशी माती तिचे योग्य स्थान सोडून तळ्यामध्ये, धरणात, नदीच्या पात्रात अशा अस्थानी पोहोचते. धरणाच्या बाबतीत तज्ज्ञांनी

केलेल्या हिशोबाच्या सव्वादोन पट वेगाने धरणात गाळ साठत आहे. १९ वर्षांत गाळामुळे पानशेत धरणाची पाणी साठवण्याची क्षमता १२ टक्क्यांनी कमी झाली आहे. ३० वर्षांपूर्वी २½ कोटी हेक्टर जमीन पुराच्या पाण्याखाली बुडत असे ती आता ४ कोटी हेक्टर झाली आहे. या सगळ्यामुळे अर्थातच अफाट नुकसान होते. १९७६ ते ७८ या दोन वर्षांत पूरनियंत्रणावर ३१८० कोटी रुपये खर्च करावे लागले.

**४. आदिवासी आणि ग्रामीण भागातील दारिद्र्य :** एका बाजूला अफाट निसर्गसंपत्ती आणि दुसऱ्या बाजूला गरिबी असे का ? गेल्या ३० वर्षातील विकास-कार्यक्रमाचा परिणाम काय तर ९० टक्के जनतेचे दर-डोई वार्षिक उत्पन्न ३०००|– रुपयांपेक्षा कमी आहे. यातील ग्रामीण गरीब कुटुंबांची मुख्य समस्या आहे उत्पादक रोजंदारीची. आपले दुष्काळ हे शेतीउत्पादनाचे दुष्काळ नसतात तर रोजंदारीचे असतात हे डॉ. एम्. एस्. स्वामिनाथन यांचे उद्‌गार पटतात. आजच आपल्या देशात ९ कोटी लोक बेकार आहेत व त्यांच्या संख्येत या वर्षी ७० लक्ष लोकांची भर पडेल. दुर्दैवाने आपण स्वीकारलेल्या पद्धतीच्या औद्योगिकरणात फारसा रोजगार निर्माण होत नाही. एकमेव आशा आहे ती शेती, सिंचन, जंगल यांच्याशी संबंधित रोजगाराची. यातल्या कोणत्याही साधनसंपत्तीची नासधूस झाली की, तिची रोजगारनिर्मितीची क्षमता कमी होणार. १९७० मध्ये तामिळनाडूच्या बांबूच्या टोपल्या विणणाऱ्यांना आठ रुपये रोजी सुटत असे. आता बांबूची जंगले बरीच कमी झाली. आता जेमतेम सहा रुपये सुटतात आणि तरीही बांबू पुरेसे नसल्यामुळे पुरेसे दिवस काम मिळत नाही.

रोजगार कमी होणे हा एक भाग; पण जळण आणि चारा न मिळाल्यामुळे होणारे हाल वेगळेच. गढवाल भागात काही ठिकाणी बायकांना दिवसाचे आठ-दहा तास निव्वळ सरपण गोळा करण्यात घालवावे लागतात. सह्याद्री भागातल्या गवळी धनगरांना पुरेसा चारा नसल्यामुळे पाळलेल्या म्हशींची संख्या कमी करावी लागली आहे.

**५. उद्योगांची स्थिती :** अनेक उद्योगांना आता जंगलातून मिळणाऱ्या कच्च्या मालाचा तुटवडा भासू लागला आहे. कारवार भागात कागदउद्योगाला सुरुवात झाली तेव्हा तेथे मिळणारा बांबू कायम पुरेल असा




अंदाज होता. आता हिमालय आणि नागालँडमधून बांबू आणावा लागतो आणि तरीही बांबू पुरत नाही. हीच कहाणी रेयॉन, काड्याच्या पेट्या, प्लायवुड व इतर उद्योगांची आहे.

**६. तात्पर्य :** आपली आजची जंगलसंपत्ती आपल्या विविध गरजा व अपेक्षा पूर्ण करण्यास असमर्थ बनली आहे; पण गरज आणि उपलब्धता यात नेमका किती फरक आहे हा हिशेब मांडणे अवघड आहे.

एक अडचण म्हणजे हवी ती आकडेवारी कुठे मिळत नाही. उदा. नेमकी किती जमीन जंगलाखाली आहे. याचे अनेक परस्परविरोधी अंदाज केले गेले. आता उपग्रहांनी पाठविलेले फोटो पाहून जास्त अचूक अंदाज करता येतील. आपण असे मानू की ३½ कोटी हेक्टर जमिनीवर जंगल आहे. या जंगलात किती घनमीटर लाकूड असेल याचा अंदाज ११० कोटी ते २६० कोटी घनमीटरपर्यंत आहे. या अंदाजावर किती विश्वास ठेवावयाचा हाही प्रश्नच आहे. फॉरेस्ट रिसोर्स सर्व्हे १९७१ अनुसार दांडेली भागात दर हेक्टरी ९१६ बांबू बेटे आहेत. तर आम्ही मोजल्यावर ती फक्त १९७ सापडली. त्याच सर्व्हेने एका विशिष्ट भागात १ लाख बांबू बेटे असल्याचे सांगितले आहे; पण १९५७ पासून त्या जागेवर एक कारखाना आहे म्हणून जंगलच नाही, त्यामुळे या सरकारी अंदाजाची विश्वासार्हता किती ? असा प्रश्न निर्माण होतो.

पुढचा प्रश्न म्हणजे या जंगलात दरवर्षी किती

नवीन लाकूड निर्माण होते ? याचे अंदाज आहेत दीड ते सात कोटी घनमीटर किंवा ६० लाख ते ३ कोटी टन. खरे तर एक हेक्टर जंगलातून सरासरी दरवर्षी १ टन लाकूड सहज निर्माण व्हायला हवे. प्रत्यक्षात याच्या फक्त ४४ टक्के लाकूड निर्माण होते असे दिसते. आम्ही स्वत: उत्तर कारवारमध्ये सुपा भागात अशी मोजमापे घेतली. इथे पडणारा पाऊस, इथली जमीन वगैरे लक्षात घेता दर हेक्टरी दरवर्षी १५ ते २० टन लाकूड निर्माण व्हायला हवे. प्रत्यक्षात हा आकडा फक्त ०.८ टन आहे.

समजा की, वार्षिक नवे उत्पादन दीड ते सात कोटी घनमीटर आहे आणि वापर किती ? अधिकृतरीत्या जंगलातून एक कोटी घनमीटर लाकूड औद्योगिक वापराकरता व दीड कोटी घनमीटर लाकूड जळणाकरता काढले जाते. तोडलेल्या झाडांचे ५०% लाकूड वापरण्याइतक्या आकाराचे असते असे धरल्यास पाच कोटी घनमीटर लाकडाची अधिकृत तोड होते. यात अनधिकृत म्हणजे लांड्यालबाड्यांची तोड धरलेली नाही. देशाची आजची जळाऊ लाकडाची गरजच २० कोटी घनमीटर आहे. पुढे दिलेल्या पुस्तिकेमध्ये गुजरातपुरते अंदाज दिले आहेत.

(K. P. Karamchandani (Chief Conservator) (1982) Extension components, social forestry, Gujarat. Gujarat Forest Department, Vadodara).

या मुख्य वनरक्षकाच्या अंदाजाप्रमाणे गुजरातची जळाऊ लाकडाची गरज ६० लाख टन. पैकी दीड लाख टन लाकूड जंगलातून रीतसर तोडलेले. १० लाख टन जंगलातून चोरटी तोड. तरी आणखी अर्धा कोटी टनाची गरज उरलीच. त्यापैकी ८० टक्के म्हणजे जवळपास ४० लक्ष टन जळण शेतजमीन वा पडीक जमिनीवरील झाडोरा तोडून मिळवले जाते.

हेच हिशोब देशाला लागू पडतात असे धरले तर रीतसर तोडीच्या सात–साडेसात पट चोरटी तोड होते, म्हणजेच दीड कोटी घनमीटर लाकूड जळणासाठी कायदेशीरपणे तोडले जाते तर साडेदहा कोटी घनमीटर जळण जंगलातून चोरून नेले जाते. यात औद्योगिक कच्चा माल म्हणून होणारी तोड मिळवा. अर्थ स्वच्छ आहे ! जंगलातील उभी झाडे हे मुद्दल मानले तर त्यात दरवर्षी होणारी वाढ म्हणजे व्याज; पण तोड (सुमारे बारा कोटी घनमीटर) व्याजाच्या वा वाढीच्या अगदी कमाल अंदाजाच्या (सात कोटी घनमीटर) दीड-पावणेदोन पट आहे. म्हणजेच आपण व्याजाशिवाय मुद्दलही मोडून खात आहोत. मुद्दल घटले की, पुढच्या वर्षी व्याजही कमी येते; पण गरज तेवढीच असते. म्हणून मुद्दलाचा आणखी मोठा लचका तोडावा लागतो. मुद्दल झपाट्याने दिसेनासे होऊ लागते ते याचमुळे.

अशा परिस्थितीत जंगलांचे व्यवस्थापन करणे हे एक फार मोठे आव्हान आहे.


शुभेच्छा

मे. रंजनलाल हरीराम आणि कंपनी

जालना

# जंगलव्यवस्थापन

## १. ब्रिटिशपूर्वकाळ

माणूस शेती करू लागण्यापूर्वी जमीन जंगलांनी झाकलेली असणार. शेती आणि पशुपालन मोठ्या प्रमाणावर सुरू झाले तेव्हा नद्यांची खोरी व इतर मैदानी प्रांतामधून जंगल तोडले जाऊ लागले. गौतम बुद्धाच्या काळापर्यंत गंगेच्या विस्तीर्ण खोऱ्यातील सर्व जमीन शेतीखाली आली होती. डोंगरी भाग, अत्यंत कमी पावसाचा भाग, मलेरियासारख्या रोगांची भीती असलेले प्रदेश यामधली जंगले मात्र वाचली होती. ब्रिटिश सत्ता येण्यापूर्वी जंगलांची मालकी आणि व्यवस्था गावकीकडे असे. या जुन्या जमान्यातल्या मंडळींना निसर्गसंरक्षण, संवर्धन वगैरे गोष्टी समजत नव्हत्या असे मात्र मुळीच नाही. उलट या गोष्टींना अनुकूल असे अनेक रिवाज व रूढी त्या समाजात पाळल्या जात होत्या. उदाहरणार्थ गढवाल भागात गावकीच्या जंगलातून जळण–तोडीबाबतची शिस्त कडक आहे. राजस्थानात दुष्काळी अरवली भागात जळणासाठी फक्त हाताने मोडता येईल तेच लाकूड घ्यावयाचे, कुऱ्हाड चालवायची नाही असा संकेत ओरान नावाने संबोधलेल्या जंगलांबाबत होता. राजस्थानातल्याच बिरनोईंनी त्यांच्याकडे उगवणाऱ्या या बाभळीची चांगली जपणूक केली. अर्थात त्या वेळी मुळात मागणीच कमी असल्याने हे सहजी जमूनही जात असेल. अगदी जुन्या म्हणजे मार्कोपोलोच्या काळापासून बिक्री केला जाणारा चंदन, हस्तिदंत असा मोजका माल आहे.

## २. राखीव जंगले

भारतात शेतजमीन वगळता बाकी सगळीकडे जंगल होते. इंग्रजांनी भारत जिंकला त्या काळापर्यंत त्यांनी आपल्या मायभूमितील वनस्पती एव्हाना उधळून टाकली होती. हे पुरलं नाही म्हणून की काय १८ व्या व १९ व्या शतकात त्यांनी दक्षिण आफ्रिका, अमेरिकेचा पूर्व भाग येथील जंगलेही पार तोडून टाकली. तेव्हा इंग्रज हे जंगलांचे फार प्रेमी होते आणि अडाणी 'नेटिवां'नी चालवलेला जंगलांचा विध्वंस त्यांनी शास्त्रीय व्यवस्थापनपद्धती आणून थांबवला हा समज चुकीचा आहे.

एकदा भारतावर त्यांची मजबूत पकड बसल्यानंतर ब्रिटिशांनी येथे रेल्वेमार्गांचे विस्तृत जाळे पसरण्याला सुरुवात केली. कशासाठी ? तर भारतातील कच्चा माल निर्यात करता यावा आणि इंग्लंडमधला पक्का आयात माल देशाच्या कानाकोपऱ्यात नेता यावा म्हणून. कधी कधी रेल्वेमार्ग आवर्जून उत्तम जंगल असलेल्या भागांतून नेले जात. या जंगलांमधून तोडलेल्या मालाबद्दल एक छदाम द्यावा लागू नये म्हणून या जंगलांची मालकी त्यांनी सरकारकडे घेऊन ती जंगले राखीव म्हणून जाहीर केली. ज्या गावांचे त्यांमध्ये हक्क होते त्यांना नुकसानभरपाई काहीच मिळाली नाही. सहाजिकच या राखवणीला अनेक ठिकाणी लोकांनी विरोध केला. गोळीबार झाले. माणसे मेलीसुद्धा.

## ३. खाजगी आणि सामाजिक जंगलें

काही जंगले राखीव करतानाच गावराने खेडुतांच्या वापराकरता वेगळी काढून देण्यात आली. राखीव जंगलांमध्येही स्थानिक मंडळींना जुजबी का असेना पण अधिकार देण्यात आले. शेतकरी, जमीनदार यांपासून राजामहाराजांपर्यंत सर्वांच्याच खाजगी मालकीच्या जमिनींवरही थोडीबहुत जंगले होतीच. आता गावकऱ्यांच्या वापरासाठी ठेवलेल्या वनांमधून त्यांच्या गरजा भागतील किंवा नाही याचा हिशोब कोणी केला नव्हता. सहाजिकच ही गावराने हळूहळू खच्ची झाली. नमुना म्हणून हा हिशोब बघा. एका गावाला ५८० टन जळण लागत असे आणि त्याची २०० हेक्टर जंगलजमीन होती. तिची उत्पादनक्षमता हेक्टरी दरवर्षी ४ टनांची होती. २०० हेक्टर जंगलजमिनीपैकी १८० हेक्टर जमीन राखीव असे. उरलेल्या २० हेक्टरांची लांडगेतोड केल्याशिवाय त्या गावाचे भागत नसल्याने गावकरी राखीव जंगलामध्ये अतिक्रमण करीत आणि प्रथम त्याची कड खाऊन टाकीत. प्रत्यक्षात असेच काहीसे घडले असणार. शिवाय ग्रामीण अर्थव्यवस्था या काळात फारच कुचंबली होती. लोकसंख्या २ टक्क्यांनी वाढत होती; पण शेतीउत्पादनामध्ये मात्र पाव टक्क्याच्या आसपास वाढ होत होती. परंपरागत उद्योगधंदे बसले होते आणि आधुनिक कारखाने फारच तुरळक होते. दिवसेंदिवस भिकेला लागलेली ही जनता मग झाडांच्या मुळावर उठली. राखीव नसलेल्या जंगलांची अफाट हानी झाली.

यालाही सन्माननीय अपवाद आहेत. खास करून जेथे गावकीने गावराने जपली आणि महसूलअधिकाऱ्यांचे हात तेथपर्यंत पोचले नाहीत तेथे वेगळे चित्र दिसले. टेहरी–गढवाल भागातल्या वनपंचायतींनी वने राखीव जंगलांपेक्षाही जास्त चांगली टिकवली आहेत. उलट काही ठिकाणी राखीव जंगलेही नष्ट झालेली दिसतात. पुणे जिल्ह्यात मुळशी–वेल्हे–मावळ भागात अशा अनेक जागा आम्ही पाहिल्या.

आजमितीला जे थोडेबहुत जंगल आहे ते सगळे सरकारी राखीव वन या स्वरूपातच. सरकार बऱ्याचदा जंगल असलेल्या खासगी जमिनी ताब्यात घेत असल्यामुळे कोणालाही आपल्या जमिनीवरची झाडे लगेच तोडून टाकण्याचीच बुद्धी होते. कर्नाटक–केरळमध्ये अनेक चहा–कॉफी–मळे मालकांनी आपल्या मालकीची मोठाली जंगले तोडून तिथे चहा–कॉफीचे आणखी मळे केले. कारण भीती की जंगल म्हणून जमीन ठेवली की सरकारने उचललीच. जंगलखातेसुद्धा आपली जमीन दुसऱ्या खात्याला द्यावी लागली तर आधी वरची झाडे तोडून घेते. कर्नाटकात कारवार भागात बाळेकोप्पाजवळ शेकडो हेक्टर जंगल कुरण विकास संस्थेस देण्यात आले. ते आधी बोडके करूनच. त्यातला लहानसा हिस्सा प्रत्यक्षात वापरला जातोय बाकी जमिनीची फक्त धूप होत आहे.

## ४. व्यवस्थापनाचे तर्कशास्त्र

राखीव जंगलामध्ये इंग्रजांनी एक आधुनिक व्यवस्थापन पद्धत रूढ केली. तिला 'वैज्ञानिक' असे विशेषण लावण्यात येते; पण ते बरोबर नाही. एखादी गोष्ट अनुभवसिद्ध, प्रयोगसिद्ध असल्याशिवाय वैज्ञानिक ठरू शकत नाही. आजच्या वनव्यवस्थापनपद्धतीला असा अनुभवाचा वैज्ञानिक संशोधनाचा ठोस आधार फारसा नाही. आपण पाहिलेच की,

(१) जंगलखात्याच्या ताब्यात नेमकी किती जमीन आहे याचा अचूक अंदाज बांधता येत नाही.

(२) या जंगलात उभे असलेले एकंदर लाकूड किती व त्यात दरवर्षी वाढ किती होते याबाबत खात्रीलायक माहिती फारशी नाही.

(३) जंगलातून एकंदर किती जळाऊ लाकूड काढले जाते याचा कोणताही अंदाज जंगल खात्याजवळ नाही.


प्राथमिक माहिती मिळण्यातच अडचणी असल्याने वैज्ञानिक व्यवस्थापनासाठी लागणारी तपशीलवार माहिती मिळणे कठीणच. त्यातच जंगलाच्या विविध उपांगांच्या परस्पर नात्यासंबंधांची उत्तम जाण असायला हवी. ती नसल्याने बऱ्याचदा अनमानधक्क्याने काही तरी नियम ठरविले जातात. कर्नाटकच्या बारमाही हिरव्या जंगलांचेच उदाहरण घ्या – इथे खात्याने असा नियम घालून दिला आहे की, दर ३५–४० वर्षांनी दर हेक्टरी १० झाडे तोडवीत, झाडतोडीचे प्रमाण इतपत ठेवले की, मुद्दल घटणार नाही अशी कल्पना; पण राय नावाच्या शास्त्रज्ञांनी १९८१ साली दाखवून दिले की, हा हिशेब चुकला आहे आणि ही जंगले खच्ची होत चालली आहेत. अशा दृष्टीने खरे तर फारसा अभ्यासच केलेला नाही आणि अचूक माहितीही मिळवलेली नाही. मग या नियमांना वैज्ञानिक का म्हणावे ?

ब्रिटिशांच्या वनव्यवस्थेचे उद्देश स्वच्छ होते. शहरे व कारखाने यांची गरज भागवणे. त्यामुळे जीवसृष्टीची विविधता, मातीची धूप, ग्रामीण भागाची गरज याकडे हेतुपुरस्पर दुर्लक्ष झाले. निसर्गसंवर्धनाचे प्रयत्न सुरू झाले ते खरे स्वातंत्र्यानंतर आणि तरीही जमिनीची धूप, पाणी मुरणे व वाहून जाणे आणि जंगलाची स्थिती याचे संबंध नेमकेपणाने सांगता येत नाहीत. १९६० ते ७० या काळात वनशेतीचे कार्यक्रम सुरू झाले. तोपर्यंत ग्रामीण जनतेच्या गरजांचा कोणी गंभीरपणे विचार करीत नसे. आजही वनशेती आणि सामाजिक वनीकरणाच्या कार्यक्रमांचा रोख बहुतांशी शहरी वस्ती आणि कारखाने यांच्या गरजा भागवण्याकडेच दिसतो.

आपण जी वनसंवर्धनाची उद्दिष्टे मानतो त्या दृष्टीने आता वनव्यवस्थापनपद्धतींचा विचार करू या.

## ५. जीवसृष्टीच्या विविधतेचे रक्षण

इंग्रज इथे आले तव्हा ही भूमी शिकारी मंडळींचे नंदनवन होती. अर्थात जिथे दाट लोकवस्ती होती तिथे वन्यप्राणी कमी होतच होते. उदाहरणार्थ आपल्या देशातला एकशिंग्या गेंडा पूर्वी अगदी खैबरखिंडीपर्यंत सापडत असे; पण बाबराच्या आगमनापर्यंत गंगेच्या खोऱ्यातून गेंडा अदृश्य झाला होता. तरीपण एकंदरीत वन्य पशू मोठ्या संख्येने देशभर होते. ते इंग्रज अंमलाखाली कमी होऊ लागले. सिंह जवळपास संपून गेले; पण जुनागढच्या नबाबामुळे गीरच्या अभयारण्यात त्यांना आसरा



जंगल अच्छादन गेल्याने खचलेली शेत जमीन

मिळाला. संस्थानिकांचे पाहून इंग्रजांनीही अभयारण्ये ठेवायला सुरुवात केली. स्वातंत्र्याच्या वेळेपर्यंत वन्य पशू उरले ते अशा अरण्यात किंवा सायलेंट व्हॅलीसारख्या दुर्गम प्रदेशात.

वन्य प्राण्यांच्या संरक्षणाचे जे प्रयत्न स्वातंत्र्योत्तर काळात झाले ते नबाबी, संस्थानी थाटाचेच. या अर्थाने की, वाघ-गेंडा अशा बड्या प्राण्यांकडेच लक्ष दिले गेले. बंदीपूर, भरतपूर, रणथबोर अशी नबाबांनी शिकारी-साठी राखलेली जंगलेच अभयारण्ये करण्यात आली. काहीच नसण्यापेक्षा हे बरे; पण वन्यप्राणी संरक्षण कल्पनेचा जो गाभा म्हणजे जीवसृष्टीच्या विविधतेची जपणूक तो मात्र इथे नव्हता. त्यामुळे अनेक प्राणी आणि वनस्पतींच्या जाती संपून जाऊ लागल्या तरी त्यांच्याकडे पद्धतशीर लक्ष दिले गेले नाही. आता कित्येक वनस्पती शिल्लक राहिल्या आहेत त्या केवळ देवरायांमध्येच. गेल्या वर्षी केरळमधील दोन शास्त्रज्ञांना एका देवराईत देशात इतर कोठेही न दिसलेली एक वेल सापडली. वनस्पतींचे विविधत्व जपणाऱ्या या देव-राया काही ठिकाणी जंगलखात्याने ताब्यात घेतल्यावर नष्ट झाल्या आहेत.

जीवसृष्टीच्या संरक्षणामध्ये सम्यक दृष्टीचा अभाव ही एक अडचण झाली. दुसरी अडचण म्हणजे हे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना त्यात रस वा बांधिलकी वाटत नाही. संरक्षणाचे काम करण्यासाठी नोकरवर्गाची वेगळी फळी उभारलेली नाही. यासाठी इंडियन बोर्ड फॉर वाइल्डलाइफसमोर अनेकदा गाऱ्हाणे मांडून झाले; पण व्यर्थ. रस नाही त्यांना पाठवतात आणि आहे त्यांना डावलतात असेही होते.

या अभयारण्याभोवती आहेत गरीब आणि मागास-वर्गीयांची खेडी. मग चोरटी तोड, चोरटी शिकार, या गोष्टी आल्याच.

## ६. पाणी आणि माती

डोंगरावरचे उतार आणि इतर काही जागा अशा असतात की, तिथे जर झाडी नसेल तर अफाट नुकसानी होते; पण अशा ठिकाणांसाठीसुद्धा आपण काहीही व्यवस्था अजून केलेली नाही. १९७० साली अलकनंदेला न भूतो न भविष्यति असा पूर आला. मग चौकशीत लक्षात आले की, उतारावरच्या तोडीमुळे दरडी कोसळल्या व त्यामुळे पूर आले. शेवटी वृक्षतोड थांबवण्यात आली; पण अजूनही या सर्व प्रकाराचा शास्त्रीय अभ्यास झालेला नाही.

धरणांच्या पाणलोटक्षेत्रात झाडी राखण्या–वाढवण्याचे अगत्यही आम्हाला नाही. उलट धरणांच्या बांधकामांच्या निमित्ताने या भागात रस्ते झाले की, कंत्राटदार तुफान लाकूडतोड करतात. सह्याद्रीमध्ये सगळीकडे अशी उदाहरणे सापडतात.

## ७. जंगलातून उत्पादन :

काही थोडे अपवाद सोडले तर सर्व जंगलांतून आपण नाना गोष्टी दरवर्षी काढतो. झाडांच्या वाढीतून आपोआप जे उत्पादन मिळेल त्यात समाधान नसल्यास उत्पादनवाढीचा काही प्रयत्न करावा लागतो. मग त्यात 'सिलेक्शन फेलिंग' किंवा 'वेचक तोड' हा एक मार्ग आहे. झपाट्याने वाढणाऱ्या जातींची लागवड आहे किंवा अधिक मूल्यवान जातींचा प्रसार आहे.

सिलेक्शन फेलिंग–जंगल खात्याच्या व्यवस्थापनात ही पद्धत सर्वात महत्त्वाची; पण दुर्दैवाने आज या पद्धतीतही मूळ जंगल कायम ठेवले जाण्याची शाश्वती नाही. याला अनेक कारणे आहेत. उदा. जंगलाबद्दलच्या पुरेशा आकडेवारीचा अभाव, ग्रामीण जनतेच्या गरजांबद्दल बेफिकीरपणा, आर्थिक लाभाकरता होणारे नियमांचे उल्लंघन, गुरांच्या चाऱ्यासाठी होणारे आत्यंतिक आक्रमण इत्यादि.

कर्नाटक आणि तामिळनाडूमधील बांबूच्या जंगलांचे उदाहरण पाहू. बांबूचे ग्रामीण जनतेच्या दृष्टीने अनेक उपयोग असूनही सुरुवातीच्या जंगलयोजनांमध्ये (त्यांना वर्किंग प्लॅन्स असे म्हणतात) बांबूला तण मानलेले आहे. एवढेच नव्हे तर त्याचे उच्चाटन करण्याचा विचार केलेला आहे. १९१९ नंतर कागदाच्या उत्पादनासाठी कच्चा माल म्हणून त्याला महत्त्व आले. सुरुवातीला बांबू अमर्याद प्रमाणात उपलब्ध आहे असे मानून कारखान्यांना एक रुपया टन यासारख्या क्षुल्लक भावात तो पुरवण्यात आला; परंतु गेल्या वीस–पंचवीस वर्षांत जंगलातून अपेक्षेइतका बांबू मिळत नाही. वेस्ट कोस्ट पेपरमिलला उत्तर कर्नाटकात नेमून दिलेल्या क्षेत्रातून वार्षिक दीड लक्ष टन बांबू मिळेल असे वाटले होते. प्रत्यक्षात चाळीस हजार टनाच्या आसपास माल मिळाला आहे व कंपनीला अरुणाचल प्रदेशासारख्या लांब मुलुखातून बांबू आणावा लागला आहे. तरीही कारखाना पूर्ण क्षमतेने चालवता आलेला नाही. या अवघड परिस्थितीत कारखाने वेचक तोडीचे नियमच तोडतात. मग मुद्दामच घट होते व पुढच्या वर्षी आणखी वाईट दिवस येतात.

वेचक तोडीच्या मर्यादा ओलांडल्या (आणि बहुतेक सगळे ओलांडतातच) की, तऱ्हेतऱ्हेचे प्रश्न निर्माण होतात. कर्नाटकात काड्यापेट्या आणि प्लायवुडच्या कारखान्यांनी उंचउंच झाडे नष्ट केली आणि अशा झाडांवर रहाणारे जीव बेघर झाले. प्रचंड काळ्या–पांढऱ्या शिंगचोच्यांना आता पुरेशा ढोल्या मिळत नाहीत तर आग्या माशांना पोळी बांधायला जागा मिळत नाही. या माशाच नसतील तर मध गोळा करून पोट भरणारांनी कुठे जायचे ?

## ८. सागाची वने :

जंगलापासून मिळणारे उत्पन्न वाढवण्याची ब्रिटिश अमदानीपासूनची मुख्य पद्धत म्हणजे नैसर्गिक जंगल नाहीसे करून साग लावावयाचा. ही लागवड करताना लावलेल्यांपैकी इतकी जगतील, त्याची दरवर्षी इतक्या प्रमाणात वाढ होईल असे आडाखे असतात. लागवडीच्या कार्यक्रमाचा फायदेशीरपणा या आडाख्यांच्या आधारावर हिशोब करून ठरवतात; पण पुढे प्रत्यक्षात हे आडाखे किती खरे ठरले याचा फारसा तपास कोणी करीत नाही. जर अपेक्षेपेक्षा प्रत्यक्ष वाढ फार कमी असेल तर सागवान लागवडीचे अर्थशास्त्र कोसळेल. अशी मोजमापे कोणी केल्याचे दिसेना. तेव्हा आम्हीच देशाच्या विविध भागात मापन करायला घेतले. मध्य प्रदेश, महाराष्ट्र व कर्नाटक या तीन प्रांतात काम केले. कर्नाटकात जास्त तपशिलाने मोजणी झाली. तेथे प्रत्यक्ष मिळणारे लाकूड अपेक्षेच्या १० टक्के ते १५ टक्केच होते. सरासरी उत्पन्न अपेक्षेच्या तिसरा हिस्सा होते. इतर ठिकाणीही अशीच स्थिती आहे.

## ९. निलगिरींची लागवड :

ब्रिटिशांच्या वेळी मुख्य व्यापारी मागणी होती ती रेल्वेचे स्लीपर्स, कोळसा, जहाजबांधणी, घरे व फर्निचर यासाठी. म्हणून लागवडीसाठी सागाची निवड झाली. स्वातंत्र्यानंतर कागद, प्लायवुड, काड्यापेट्या, रेयॉन यांच्या कारखान्यांची मागणी वाढली. आता हे कारखाने काढले तेव्हा आहेत त्याच जंगलातून त्यांना पुरेसा कच्चा माल मिळणार असे गृहीत धरूनच; पण नेहमीप्रमाणे तो माल पुरेना आणि कारखाने संकटात आले.

मग त्याना योग्य असे मऊ लगदा करण्याजोगे लाकूड वाढवण्यासाठी धावपळ सुरू झाली. त्याकरता निलगिरी सर्वांना सोईचे वाटले. हे झाड हिंदुस्थानात प्रथम टिपू सुलतानाने आणले असे म्हणतात. त्याचा गाभा मऊ व या कारखान्यांना योग्य असा आहे आणि जनावरे या झाडाला तोंड लावत नाहीत. १९५० पासून निलगिरीची लागवड मोठ्या प्रमाणावर करण्यात आली. सगळ्यांच्या मते अनुकूल परिस्थितीत निलगिरीमुळे वर्षाला दर हेक्टरी २० ते ३० टन लाकूड मिळावे आणि प्रतिकूल परिस्थितीतही ७ ते १४ टन मिळायला हरकत नाही.

प्रत्यक्षात काय दिसते ? आम्ही तपासलेल्या कित्येक ठिकाणी वर्षाला फक्त एक ते दोन टन लाकूड मिळाले. म्हणजे अपेक्षेच्या दहा टक्के. याहूनही वाईट स्थिती झाली पश्चिम घाट डोंगरमाथ्यावर भरपूर पावसाच्या जागी उत्तम जंगल तोडून लावलेल्या निलगिरीच्या या लागवडीवर बुरशीची बाधा होऊन संपूर्ण लागवड नष्ट झाली ! म्हणजे उत्पादन शून्य ! शेवटी नैसर्गिक उत्तम जंगल नष्ट करून ओसाड माळ मात्र तयार झाले ! बस्तरमधील लागवडही अशीच वाया गेली. या भागात लावलेल्या रोपांपैकी जेमतेम १ टक्का रोपे जगली !

हिमालयात देवदार, वॉलनट, चीड, अॅश वगैरे झाडांच्या लागवडीचे प्रयत्न झाले. येथेही बालतरूंच्या मृत्यूचे प्रमाण बहुतेक ठिकाणी ५० टक्क्यांहून जास्त होते. ७० ते ९० टक्के बालतरु मरण्याचे प्रमाण अनेक ठिकाणी आढळते. या अपयशाचा थोडाबहुत विचार झाला. त्याच्या कारणांपैकी काही पुढीलप्रमाणे.

१) रोपे चुकीच्या जागी लावणे. देवदार फार कमी उंचीवर लावल्याने जगला नाही.

२) अयोग्य बियाण्याचा व चुकीच्या तंत्राचा वापर.

३) लागवडीच्या कार्यक्रमाची सदोष देखरेख.

४) गुरांचा उपद्रव.

**निष्कर्ष** – जंगलात एकजाती रोपवने लावण्याच्या कार्यक्रमांचे पर्यावरणावर तसेच समाजावर आघात होतात. नैसर्गिक, लोकांना उपयोगी पडणारे जंगल हटवले जाते. सहाजिकच लोक या लागवडीच्या विरुद्ध असतात. कारवार भागात ४० वर्षांपूर्वी लोकांनी निलगिरीच्या लागवडीला विरोध केला. मध्यभारतातील आदिवासी सालवृक्षांची जंगले तोडून साग लावण्याच्या योजनांना विरोध करीत आहेत. सिंगभूम भागात हा विरोध झारखंड चळवळीचे एक अंग बनला आहे.

या लागवडीत झाडेही फार तीच तीच असतात. आपल्या जंगलातल्या चांगल्या जातींकडे आपण दुर्लक्ष करतो. उदा. आपल्याकडचे Gmelina arborea अर्थात शिवण. हे झाड ब्राझीलमध्ये कागदकारखान्याचा आधार झाले आहे.

एकाच प्रकारची वनस्पती लावल्यामुळे रोगांना आमंत्रण दिल्यासारखे होते. निलगिरीवर बुरशीचा भीषण परिणाम झाल्याचे आधी सांगितले आहे. कर्नाटकच्या साउथ कॅनरा जिल्ह्यात रबराच्या मळ्यांची अशीच गत झाली, तर कारवार भागातील लेमन ग्रास मळ्यांची तीच कथा आहे.


शेवटी हाही प्रश्न आहेच की रोपवनांची नैसर्गिक जंगले उपटून लावलेल्यात उत्पादनक्षमता त्या जंगलांपेक्षा जास्त आहे का ?

साग लागवडीसाठी नैसर्गिक जंगल तोडतात. त्या तोडीच्या मापनावरून उत्पादकतेचा अंदाज करता येतो. बंगलोर भागातल्या एका नैसर्गिक जंगलाची उत्पादकता दरवर्षी दर हेक्टरी २.८ टन अशी काढण्यात आली. निलगिरी मळ्यांच्या उत्पादकतेचे आकडे इतपतच किंवा याहून कमीच आहेत.

**तेव्हा झाडांच्या कृत्रिम लागवडीतून (अगदी फार वेगाने वाढणारी झाडे लावूनसुद्धा) नैसर्गिक जंगलांपेक्षा अधीक उत्पादनक्षमता मिळवता येत नाही. असा आपला अनुभव आहे.**

## सामाजिक वनीकरण

**१. तामिळनाडूमध्ये वनशेती :** १९५० च्या आसपास आपल्याकडील जळाऊ लाकडांची दुष्काळसदृश टंचाई व आपल्या जंगलांची, मळ्यांची तोकडी उत्पादनक्षमता या गोष्टींची जाण अनेकांना होऊ लागली होती. याबाबतच्या विचारातून सामाजिक वनीकरणाच्या कल्पना मूळ धरू लागल्या. तलावांचे बांध वा तत्सम समाईक जमिनीवर जळणासाठी झाडे लावण्यात येत. त्यांची राखण करण्यासाठी एक खेडुत नेमला जाई. कामाच्या दर्जावर त्याची रोजी अवलंबून असे. झाडे तोडल्यानंतर अर्धा वाटा ग्रामपंचायतीला द्यायचे ठरले होते; परंतु प्रत्येक रखवालदाराला ४० हेक्टर जंगल राखायचे होते. हे एका माणसाच्या आवाक्याबाहेरचे होते. या योजनेत



दरवर्षी हेक्टरी एक टनाच्या आसपास उत्पादन झाले; पण आता लाकूड ग्रामपंचायतीला देण्याबद्दल कोणी फारसे बोलत नाही.

**कर्नाटक**–१९७० नंतर कारखान्याना सरकारी जंगलातून मिळणाऱ्या कच्च्या मालाचा तुटवडा भासू लागला. मग कारखानदार आकर्षक किमती देऊन शेतकऱ्यांकडून कच्चा माल गोळा करू लागले. हरिहर पॉली फायबर कंपनीला सरकारकडून १२० रु. टन भावाने मिळणारे निलगिरी लाकूड अपुरे पडल्याने त्यांनी शेतकऱ्यांकडून ३०० रु. टन भावाने खरेदी करण्यास सुरुवात केली. चांगले भाव आणि कर्ज वगैरेच्या सोयी यामुळे शेतकऱ्यांना वनशेती परवडू लागली. वनशेतीमध्ये पाऊस इकडे तिकडे झाला तरी लगेच सूत धरण्याची वेळ येत नाही, शिवाय मजुरांची गरज कमी होते. रोपे सरकारकडून मिळतात.

**इथे सरकारी लागवड आणि शेतकऱ्यांची लागवड यामधला फरक उठून दिसतो. सरकारला आमच्या हिशेबाप्रमाणे दर हेक्टरी २००० रुपये खर्च करून वर्षाला २ टन लाकूड उत्पादन करता येते, तर शेतकऱ्याला याच्या निम्म्यापेक्षा कमी खर्चात पाचपट उत्पन्न मिळते. म्हणजेच शेतकरी सरकारच्या दसपट जास्त कार्यक्षम आहे हे खरे. या हिशेबात ओव्हरहेड खर्च म्हणतात ते धरलेले नाहीत. एरवी सरकारची बाजू आणखीच नाजूक होते.**

**गुजरात**–या राज्यात फक्त ५ टक्के जमिनीवर जंगल आहे; पण इथले लोक हुरषा म्हणूनच त्यांनी सामाजिक वनीकरणाचा सर्वांत कल्पक कार्यक्रम आखला आहे.

रस्ते, कालवे व रेल्वेलाइन यांच्या कडेला झाडे लावून १९८१ साली गुजरातमध्ये ३० हजार हेक्टरांवर काम झाले. ग्रामपंचायतींना या लागवडीतील फायद्याचा अर्धा वाटा मिळणार आहे. याच वर्षी २००० खेड्यातील १०००० हेक्टर जमिनीवर सरकारी खर्चाने झाडे लावली आहेत.

तिसऱ्या कार्यक्रमात भूमिहीन कुटुंबांना प्रत्येकी ३७½ हेक्टर निकृष्ट जंगल देतात. दर वर्षाला त्यांनी अडीच हेक्टरात झाडे लावावी. हे काम १५ वर्षे पुरेल. प्रत्येक कुटुंबाने ४० मनुष्य दिवस काम दरमहा करायचे व त्याबद्दल २५० रुपये मेहनताना घ्यायचा. १५ वर्षांनंतर तोड करून हिशोब करायचे व २० टक्के फायदा त्या कुटुंबाला द्यायचा.

चौथ्या कार्यक्रमात शेतकऱ्यांना वरकड किंवा निकृष्ट जमिनीवर जंगल लावायला सांगतात. ७० टक्के झाडे जगली तर दर हेक्टरी वर्षाला २५० रुपये देतात. डांगमधल्या आदिवासींसाठीसुद्धा अशीच योजना आहे.

शेतकऱ्यांना निलगिरीची रोपे व तांत्रिक सल्ला देण्यात येतो. शेतकऱ्यांनी कापसाऐवजी निलगिरी लावून हेक्टरी २० टन माल घेतला आहे. यातून हेक्टरी फायदा ६ ते १० हजार आहे.

**कारखान्यांनी लावलेले मळे**–कारखान्यांना लागवडीसाठी सहज जमीन मिळत नाही; पण काही थोड्या ठिकाणी त्यांचे प्रयत्न शेतकऱ्यांप्रमाणेच यशस्वी झाले आहेत.

**बिनसरकारी संघटना**–लोकांना जमिनी देऊन जंगल लावायला सांगितले तर पडीक जमीन आणि बेकार लोक दोन्ही रांगेला लागतील. तीन बिनसरकारी संघटनांचे प्रयत्न या दिशेने उल्लेखनीय आहेत.

या वर्षीचे मॅगसेसे पारितोषिकविजेते श्री. चंडिप्रसाद भट यांच्या नेतृत्वाखाली दशौली ग्राम स्वराज्य मंडळाने अनेक गावकऱ्यांना गावांना उजाड जमिनीवर झाडे लावण्यास प्रवृत्त केले. गावकऱ्यांच्या सहकार्याने

शुभेच्छा –

# मे. सीताराम रामेश्वरदास आणि कंपनी

जालना

केलेल्या या लागवडीत ७० ते ९० टक्के रोपे जगली तर याच भागातील सरकारी लागवडीत २० ते ५० टक्के रोपेच जगतात.

दुसरा अनुभव तामिळनाडूमध्ये पाँडेचरीजवळ ऑरोव्हिलचा. इथे २००० एकर पडीक जमीन संपादन केली असून तिच्यात रखवालदार, उत्तम कुंपण, शक्य तिथे सिंचन अशी सोय केली आहे. हेक्टरमागे ५ ते ६ हजार रुपये घातले आहेत. तरी त्यांना हा व्यवहार फायद्यात पडणार आहे. जमिनीच्या मगदुराप्रमाणे वार्षिक दर हेक्टरी उत्पादन ६ ते २० टन होईल असा अंदाज आहे.

तिसरी कहाणी आहे आंध्रमधील विशाखापट्टणम जिल्ह्यातील भगवतुलू ट्रस्टची. यांनी अत्यंत कमी पावसाच्या प्रदेशात उजाड जमिनीवर वनशेती, दूधव्यवसाय व नेहमीची शेती यांची एक किफायतशीर सांगड व्यवहारात आणली.

जंगलाशी संबंधित असे आपल्या समाजाचे तीन घटक आहेत. सरकार, कारखानदार व ग्रामीण गरीब जनता; पण यातल्या कुणालाच आपल्या ताबडतोबीच्या फायद्याच्या दृष्टीने जंगल राखण्याची पोटतिडिक नाही. गरिबाला जंगलातून मिळणार काय ? थोडे जळण आणि थोडीबहुत मजुरी. लाकूड विकून होणाऱ्या फायद्यात तो कधीच वाटेकरी नसतो. त्याच जंगलातल्या कागदकारखान्यात मजुराची रोजी वीस रुपये. शिवाय रजा, नोकरीची हमी. घर, औषध उपचार हे फायदे निराळे आणि त्याच जंगलात बांबू तोडणाऱ्याची मजुरी ७ रुपये ! बरे, बांबू टिकला काय आणि संपला काय, आपण आहोत तेथेच रहाणार असे त्याला वाटते.

जंगले राखून आपल्याला काही मिळत नाही. एवढेच नव्हे तर जंगल तोडून जमीन नांगरली तर ती आपल्या मालकीची होऊ शकते असा, त्याचा उलटा अनुभव आहे. गेल्या ३० वर्षांत २५ लक्ष हेक्टरपेक्षा जास्त जमीन अशी जंगलातून शेतीखाली गेली आहे.

कारखानदार, लाकूडव्यापारी यांनाही जंगल राखून लगेच चार पैसे मिळणार नसतात. त्यांनी जंगलसंवर्धनात भांडवल गुंतवावे या गोष्टीला अनुकूल वातावरण नाही. उलट सरकार त्यांना जंगलमाल हास्यास्पद किंमतींना विकत देते. किंमत ठरवताना असे जंगल जोपासण्यास काय खर्च येईल याचा विचार केलेला नसतो. मग त्यांनी जंगल वाढवण्याचा प्रयत्न का करावा ? अर्थात, त्यांच्याजवळ जमिनीही नसतात. आता जेव्हा सरकारी माल कमी पडायला लागला तेव्हा हे लोक शेतकऱ्यांना आकर्षक भाव व भांडवल द्यायला तयार होत आहेत. बव्हंशी एका जातीची उपयुक्त झाडे संपत आली की दुसरी योग्य शोधणे हा मार्ग चोखाळला जातो किंवा आधी दुर्गम मानल्या गेलेल्या भागात नाइलाजाने तोड सुरू केली जाते.

## एक नवा दृष्टिकोन

वरची सगळी खंडनाच्या स्वरूपाची चर्चा झाल्यावर आपल्याला वनव्यवस्थापन हवे तरी कसे असा प्रश्न स्वाभाविकपणे पुढे येतो.

जंगलांचा सर्वांत महत्त्वाचा उपयोग हा पर्यावरण-संरक्षणाचा आहे. तेव्हा जंगलापासून मिळणारे उत्पादन व उत्पन्न महत्त्वाचे असले, तरी जंगलांपासून अधिक पैसा मिळवा असा लकडा वनखात्यामागे लावता कामा नये. वनविकास महामंडळांना स्वतःचे भांडवल उभे करण्यास सांगितले जाते, तेही चूकच आहे. त्यामुळे महामंडळे उभे जंगल तोडून पैसा करण्याच्या मागे लागतात.

अर्थात जंगलापासूनचे उत्पादनही वाढवलेच पाहिजे. जळण व औद्योगिक कच्च्या मालाची मागणी कायदेशीर मार्गांनी पुरी झाली पाहिजे. नाही तर जंगलांवर कुऱ्हाड पडणारच.

मग उत्पादनवाढीसाठी काय करावे ? कशा प्रकारची जमीन त्यासाठी वापरावी ? हे उत्पादनाचे काम कोणी करावे ? जंगल साफ करून तेथे रोपवने लावण्याच्या आम्ही विरुद्ध आहोत. चांगल्या जंगलांना तसेच वाढू द्यायचे म्हटल्यावर उरली निकृष्ट जंगले. त्यांची उत्पादकता कमी असली तरी त्यांचाच वापर करायला हवा.

अधिक उत्पादन हवे ते कशाचे ? बाजारात ज्या मालाला तुफान भाव मिळेल व जास्त आर्थिक लाभ होऊ शकेल त्याचे ! उदा. सागवान लावण्यात असा फायदा होईल; पण सागवान न वापरून आपले चालू शकते. सागवानाची जागा धातू, हार्डबोर्ड हे पर्याय घेऊ शकतात.

पडीक जमिनी वृक्षलागवडीखाली आल्या पाहिजेत; पण ते सरकारी यंत्रणेला जमणार नाही. ज्या शतातून

अगदी नावापुरतेच उत्पन्न निघते व केवळ अन्य रोजगार नाही म्हणूनच मालक ते शेत कसतो, त्यावरही झाडे लावायला हवीत. झाडांचा पैसा हाती यायला ५ ते १५ वर्षे लागतात. येवढा काळ थांबण्यासाठी या मालकांजवळ शक्ती नाही. त्यांच्या गुजराणीची सोय करायला हवी. याबाबत गुजरातचे उदाहरण इतर राज्यांनी मनावर घ्यायला हवे.

आणखी एक पर्याय म्हणजे पडीक जमिनींचे पट्टे कारखानदारांच्या ताब्यात द्यायचे. त्यांना कच्चा माल थोडक्या पैशात मिळत असेल तर ते झाडे लावण्याचा खटाटोप करणार नाहीत. म्हणून त्यांना वनखात्याचा माल देताना, तो माल पुन्हा उत्पन्न करण्यास येईल; तो खर्च त्यांच्याकडून जरूर वसूल केला पाहिजे. मग ते जंगले लावतील. पण असे मोठाले जमिनीचे पट्टे येणार कोठून ? आज लोकांच्या वापरात असलेल्या जमिनी जर कारखानदारांना दिल्या तर मोठाच सामाजिक तणाव निर्माण होईल. तेव्हा त्यांनाही स्थानिक जनतेच्या सहकार्यानेच काम करावे लागेल.

शेतकरी चांगल्या शेतजमिनींवर इतर पिके घेण्याऐवजी झाडे लावू शकतात. लाकडाच्या दुष्काळामुळे हे हळूहळू होऊ लागलेच आहे. कारण झाडे विकून बरा पैसा मिळू लागला आहे; पण यामुळे ग्रामीण रोजगार कमी होतो व इतरही अडचणी निर्माण होतात.

रोजगाराच्या दृष्टीने उत्तम पर्याय म्हणजे ग्रामीण भागातील गरिबांनी व्यक्तिगत किंवा सहकारी पद्धतीने निकृष्ट जंगल, पडीक जमीन किंवा अनुत्पादक शेतजमीन यावर झाडे लावणे. अशी सुमारे १२ कोटी हेक्टर जमीन मिळू शकेल. प्रत्येक कुटुंबाला किती जमीन द्यायची हे जमिनीचा पोत, स्थानिक परिस्थिती यावरून ठरवता येईल. गुजरातप्रमाणे ३७½ हेक्टर जमीन दिल्यास ३६ लाख कुटुंबांना सहभागी करून घेता येईल. शिवाय हेक्टरी प्रतिवर्षी सुमारे १०००।– रुपये भांडवल लागेल.

**जंगलमालाच्या वापरात काटकसर** : एकीकडे जंगलमालाच्या उत्पादनवाढीचे भगीरथ प्रयत्न चालू असतानाच त्या मालाच्या वापरात काटकसर करण्याचे प्रयत्नही जरूर हवेत. जिथे टाळण्यासारखा आहे तेथे वापर टाळला पाहिजे. उदा. रेल्वे-स्लीपर्ससाठी आता लाकूड वापरता कामा नये. आता काँक्रिटचे स्लीपर्स मोठ्या प्रमाणावर बनवता येतात. नंतर


शुभेच्छा

मे. राधाकृष्ण मालपानी

जालना

प्लायवुडसारख्या गोष्टी अधिक टिकाऊ केल्या पाहिजेत. अन्यथा मागणी घटेल. सरकारी धोरण अशा काटकसरीला उत्तेजन देणारे हवे. जळणाच्या वापरात काटकसर करण्यासाठी आधुनिक चुली तसेच बायोगॅससारख्या पर्यायांचा विचार व्हावयास पाहिजे. शहरातील मैल्याची बायोगॅस बनवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवल-गुंतवणूक केली तर ती अनाठायी होणार नाही. कारखान्यांकडून जंगलमालाचे रास्त भाव वसूल केले म्हणजे ते जंगलमालाची उधळपट्टी थांबवतील. चाऱ्याच्या बाबतीत काटकसर येवढीच करता येईल की, जनावरांची संख्या बेसुमार वाढू न देणे. दुसरे म्हणजे जनावरांना गोठ्यात बांधण्याऐवजी आपण रानोमाळ भटकू देतो आणि गुरे गवताला वाढायला संधीच देत नाहीत. ही पद्धत टाळली पाहिजे.

जंगलमालाची लूट थांबवण्याकरता कायद्याचा बडगा जरूर हवा. केरळच्या जंगलातून रोझवुड (शिसवी)ची झाडे गुप्त होतात तर कर्नाटक–तामिळनाडूमधून चंदनाची झाडे लंपास होतात. हस्तिदंतासाठी हत्ती वेचून मारले जातात. या चोरांमागे हात धुऊन लागले पाहिजे. उलट गरीब आदिवासी जळणासाठी फाटी, चारा, शेती यासाठी जंगलाचा अवैध वापर करतो तेव्हा त्याची मजबूरी समजावून घेऊन पर्यायी व्यवस्था उभी केली पाहिजे. निव्वळ दमनाने काम होणार नाही. जंगललुटीमध्ये गुंतलेल्या अधिकाऱ्याला आणि राजकारणी मंडळींना जरब बसायला हवी. आज गैरप्रकार उघड्या डोळ्यांनी पहाणाऱ्या सामान्य माणसाला गाऱ्हाणे घेऊन जायला जागाच नाही. त्याकरिता लोकपालासारखे पद नाही का तयार करता येणार ?

एकंदरीत विचार करता जंगलापासून मिळणाऱ्या विविध प्रकारच्या मालाचे उत्पादन भरीव प्रमाणात वाढवल्याखेरीज आणि ते वाढवीत असताना ग्रामीण जनतेला रोजगार, माफक किमतीत जळण, चारा, लाकूड मिळण्याची व्यवस्था झाल्याखेरीज जंगलाची तोड थांबणार नाही. जंगलांचा विचार करताना कारखाने आणि गरीब जनता यामध्ये जनतेला झुकते माप द्यायला हवे. कारखान्यांकडून व्यापारी दर वसूल केले पाहिजेत. जंगलविकास सरकारी खात्याकडून एकट्याने होणार नाही. सरकारी खाक्या वापरणे सोडावे लागेल. जनता, उद्योजक, स्वयंसेवी संस्था व सरकार यांच्या एकत्रित प्रयत्नानेच या समस्यांवर ठोस उपाय करता येईल.

**( सेंटर फॉर थिओरेटिकल स्टडीज, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगलोर ).**

**डॉ. माधव गाडगीळ व वन-संवर्धनात रस असणारे सामाजिक कार्यकर्त्यांचे एक चर्चासत्र आयोजित करण्यात येणार आहे. वन-कर्मचाऱ्याचाही सहभाग अपेक्षित आहे. चर्चासत्रासाठी मुद्दाम्हून हा अहवाल सविस्तरपणे सादर करीत आहोत. कार्यकर्ते व वन-कर्मचारी यांनी अहवालाच्या अनुषंगाने आपले विचार-टिपण सादर करावेत अशी विनंती आहे. – संपादक**



शुभेच्छा

मे. जयदुर्गा आणि कंपनी

जालना



शुभेच्छा

मे. देवचंद छत्रभुज सेठ

जालना

# नवीन सामाजिक वननीती

## निकड व स्वरूप

शरद कुलकर्णी



### प्रास्ताविक

**१९८०** च्या वनविधेयकावरील चर्चेच्या अनुषंगाने तज्ज्ञ अभ्यासकांचे वननीतीसंबंधी विपुल लिखाण प्रसिद्ध झाले. वनविधेयकाच्या टीकाकारांचा पवित्रा आता केवळ बचावात्मक स्वरूपाचा राहिलेला नाही. वनविधेयकामध्ये केवळ सुधारणा व्हाव्यात एवढेच नव्हे तर सध्या अस्तित्वात असलेल्या वननीतीचा नव्याने फेरविचार व्हावा अशी त्यांची मागणी आहे. आदिवासींमध्ये प्रत्यक्ष काम करणाऱ्या कार्यकर्त्यांबरोबरच पर्यावरणतज्ज्ञ व भूगोलतज्ज्ञ यांनीही हा प्रश्न हाती घेतलेला आहे. नवल असे की, वनविधेयकाचे समर्थक मात्र मूग गिळून गप्प बसले आहेत. वननीती ही एकूणच विकासनीतीचा एक भाग असल्याने लोकाभिमुख विकासनीतीच्या संदर्भात लोकाभिमुख वननीती मांडणे निकडीचे आहे. राष्ट्रीय गरजा व राष्ट्रीय विकास यांच्या नावाखाली वनविधेयकातील अन्याय्य तरतुदींचे समर्थन करणाऱ्या तथाकथित विकासवाद्यांच्या दृष्टिकोणाशी पूर्णपणे विरुद्ध असा वनात राहणाऱ्या लाखो गरीब, आदिवासींच्या दृष्टीकोणातून वनविधेयकाचा आढावा घेण्याचा प्रयत्न या टिपणात करण्यात आला आहे. सध्याच्या वननीतीचा आढावा घेण्यापूर्वी वननीतीचा विकास ऐतिहासिक दृष्टिकोणातून तपासणे सयुक्तिक होईल.

### ब्रिटीशपूर्वकालीन वनविषयक धोरण

भारतावर ब्रिटिशांची सत्ता येण्यापूर्वी वनजमीन व वनोत्पादने यावरील लोकांच्या हक्कांचे नियमन सामाजिक–सांस्कृतिक रीतिरिवाजांद्वारे होत असे. मोठ्या प्रमाणावरील जंगलविभाग व त्यामानाने लोकसंख्येचे कमी प्रमाण यामुळे जंगलविषयक समस्या निर्माण झाल्या नाहीत. वड, पिंपळ यासारखे वृक्ष तोडणे धार्मिकदृष्ट्या निषिद्ध मानले जात असे. काही पवित्र व संरक्षित जंगले **देवराया** म्हणून ओळखली जात व अशा देवरायांतून फक्त गळून पडलेली पाने, फुले, फळे घेता येत असत. देवरायातील वृक्ष तोडण्यास मनाई असे. अशा प्रथांमुळे नैसर्गिक जंगले व त्यात राहणारे जीवजीवाणू यांचे आपोआपच संरक्षण होत असे.

### ब्रिटिशकालीन वनविषयक धोरण

जंगलाचे व्यापारी महत्त्व धूर्त ब्रिटिशांच्या ध्यानी आले व त्यांनी त्यापासून महसूल मिळविण्यास, तसेच जंगलावरील लोकांचे हक्क मर्यादित करण्यास सुरुवात केली. हे सर्व जंगलांचे संरक्षण करण्याच्या नावाखाली होत असे. जंगलांचे संरक्षण करण्यासाठी जंगलात राहणाऱ्यांचे त्यावरील हक्क सीमित करणाऱ्या सूचना अंतर्भूत असलेले एक फर्मान ऑगस्ट १८५५ मध्ये काढण्यात आले. १८९४ मध्ये त्यात आणखी काही सुधारणा करण्यात आल्या. त्यानंतरच्या वनविषयक कायद्याद्वारे लोकांच्या जंगलविषयक हक्कांवर अधिकाधिक बंधने घालण्यात आली.

### शासकीय वनकायदा–१८६५

सरकारी जंगलांचे संरक्षण व नियमन करणाऱ्या तरतुदी व नियम अंतर्भूत असलेला कायदा सर्वप्रथम

१ मे १८६५ रोजी अस्तित्वात आला. वृक्षावरणाखाली असलेली कोणतीही जमीन अगर झाडेझुडपे अगर जंगले सरकारी जंगले म्हणून घोषित करण्याचे अधिकार सरकारला या कायद्याद्वारे देण्यात आले. मात्र यामुळे कोणाही व्यक्तीच्या अगर समूहाच्या त्यावरील हक्कांवर गदा येऊ नये असे नमूद करण्यात आले. वृक्षांचे संरक्षण करण्यासाठी नियम करण्याचे अधिकार सरकारला देण्यात आले. या कायद्यातील प्रतिबंधांचे उल्लंघन करणाऱ्यास शिक्षा करण्याची तरतूद करण्याचे अधिकार शासनाला देण्यात आले.

## भारतीय वनकायदा–१८७८

१८७८ चा वनकायदा १८६५ च्या कायद्यापेक्षा अधिक व्यापक होता. जंगलाची विभागणी १. राखीव जंगले, २. संरक्षित जंगले, ३. ग्रामजंगले या तीन प्रकारात करण्यात आली. राखीव जंगलातील जमीन व उत्पादने यावरील आपले हक्क नोंदवून घेण्याची सूचना देण्यात आली. लोकांनी हक्क सांगितलेल्या जमिनीचा ताबा मिळविण्याचे अधिकार जंगलअधिकाऱ्यांना देण्यात आले. लोकांकडून सदरहू हक्क नोंदवून घेण्याची जबाबदारी फॉरेस्ट सेटलमेंट ऑफिसरवर टाकण्यात आली. हक्कदाराचे हक्क शाबूत राहतील अशा प्रकारे नियोजित राखीव जंगलांच्या सीमांमध्ये योग्य ते फेरफार करण्याच्या तरतुदींचा समावेश यात होता. इमारती लाकडावर कर बसविण्याच्या काही तरतुदी करण्यात आल्या. अशा प्रकारे जंगलावर सरकारी नियंत्रण प्रस्थापित करण्याचे धोरण १८७८ च्या वनकायद्याद्वारे अधिक व्यापक करण्यात आले.

## राष्ट्रीय वननीती–१८९४

१८९४ मध्ये सरकारने आपले वनविषयक धोरण स्पष्ट केले, ते याप्रमाणे –

१. जंगलांचे नियमन करण्यामागे जनतेच्या हिताचाच दृष्टिकोण आहे. जंगलाचे संरक्षण करण्यामध्येच त्यावरील लोकांच्या हक्काचे नियमन करणे अंतर्भूत आहे.

२. पाण्याच्या प्रवाहांमुळे जमिनीची होणारी धूप व त्याचे जंगलातील हवामान व भौतिक परिस्थिती यावर होणारे परिणाम टाळण्यासाठी डोंगरउतारावरील जंगले संरक्षित जंगले म्हणून राखण्यात येतील.

३. मूल्यवान इमारतीलाकडाचा साठा असलेल्या जंगलांचे व्यवस्थापन सरकारला महसुली उत्पन्न मिळवून देण्याच्या दृष्टीने व्यापारी तत्त्वावर केले जाईल.

४. लागवडीखाली येऊ शकणाऱ्या जमिनीची मागणी जंगलजमिनीद्वारेच पूर्ण करता येण्यासारखी असेल त्या वेळी खालील अटींवर सर्वसाधारणपणे अजिबात खळखळ न करता तसे केले पाहिजे.

(अ) लागवडीखालील जमीनपट्ट्याचे निमित्त करून मूल्यवान जंगलाचा वापर मध गोळा करण्यासाठी करण्यास मज्जाव केला जाईल.

(ब) अशा प्रकारची लागवड कायम स्वरूपाची असावी. मात्र जंगलावर अवलंबून असलेल्या वाजवी गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेल्या किमान जंगलक्षेत्रावर लागवडीसाठी अतिक्रमण करण्यास प्रतिबंध करावा.

५. कमी प्रतीचे इमारतीलाकूड, सरपण व चारा उपलब्ध असणाऱ्या जंगलाचे व्यवस्थापन प्रामुख्याने स्थानिक लोकांना हितकारक दृष्टिकोणातून करण्यात यावे.

अशा प्रकारे, या वनविषयक धोरणामध्ये जंगलाचे व्यापारी उपयोग व त्यांचे पर्यावरणरक्षणाच्या दृष्टिकोणातून महत्त्व यावर भर देण्यात आला. जंगलजमीन व उत्पादने यावरील जंगलवासियांचे हक्क व अधिकार मर्यादित करण्याचा मार्ग याद्वारे खुला झाला.

## भारतीय वनकायदा–१९४७

स्थानिक सरकारांद्वारे करण्यात आलेल्या विविध कायद्यांद्वारे १८७८ च्या कायद्यात अनेक दुरुस्त्या करण्यात आल्या. १८७८ च्या वनकायद्याच्या जागी 'भारतीय वनकायदा, १९२७' नावाचा एक अतिशय व्यापक स्वरूपाचा कायदा अस्तित्वात आला. इमारती लाकडावरील महसुलासकट पूर्वीच्या कायद्यातील सर्व प्रमुख तरतुदींचा समावेश १९२७ च्या कायद्यामध्येही करण्यात आला.

## भारतसरकार कायदा–१९३५

ब्रिटिश संसदेने १९३५ मध्ये संमत केलेल्या या कायद्यान्वये प्रांतिक विधिमंडळे स्थापन करण्यात आली. जंगल या विषयाचा अंतर्भाव या कायद्यान्वये प्रांतिक यादीत करण्यात आला. त्यानंतर विविध प्रांतांनी जंगलांचे नियमन करणारे स्वतःचे कायदे केले. यापैकी

बहुतांश कायदे १९२७ च्या कायद्याच्या चौकटीवरच आधारित होते.

## स्वातंत्र्योत्तर वनविषयक धोरण

### भारतीय राज्यघटना

१९७६ पर्यंत भारतीय राज्यघटनेच्या ७ व्या शेडयूलमध्ये राज्यसरकारांच्या यादीत जंगल हा विषय समाविष्ट होता. १९७६ मधील ४२ व्या घटनादुरुस्ती-द्वारे तो राज्यसरकारांच्या यादीतून काढून सामायिक यादीमध्ये समाविष्ट करण्यात आला. परिणामत: राज्यांचे यासंबंधातील अधिकार संपुष्टात आले. केंद्र-सरकारने आपल्या सत्तेचा वापर करून २५ ऑक्टोबर १९८० रोजीच्या वनसंधारण अध्यादेशाद्वारे राज्य-सरकारांचे जंगलावरील अधिकार संपुष्टात आणले. या अध्यादेशानुसार केन्द्रसरकारच्या पूर्वसंमतीशिवाय कोण-त्याही हेतूसाठी कोणतीही जंगलजमीन वापरू देण्याच्या राज्यशासनाच्या अधिकारास प्रतिबंध करण्यात आला. या अध्यादेशाचे रूपांतर नंतर कायद्यात करण्यात आले.

### राष्ट्रीय वननीती–१९५२

स्वातंत्र्यानंतर वननीतीच्या प्रश्नावर फेरविचार करण्यात आला. १९५२ मध्ये भारतसरकारचा ठराव म्हणून नवी राष्ट्रीय वननीती जाहीर करण्यात आली. पुढील प्रमुख राष्ट्रीय गरजा पायाभूत मानून नवीन वनविषयक धोरण ठरविण्यात यावे असे जाहीर कर-ण्यात आले.

१. निसर्गातील विविध प्रकारची संतुलने व जमि-नीचा पूरक उपयोग यांची एक यंत्रणा उभारण्याची गरज–ज्यानुसार त्या त्या प्रकारच्या जमिनीतून अधि-काधिक उत्पादन निघू शकेल व जमिनीची कमी झीज होईल अशा प्रकारे त्या त्या जमिनीचा योग्य उपयोग करण्यात यावा.

२. खालील बाबी नियंत्रित करण्याची गरज.

(अ) डोंगरभागातील जंगलतोड थांबली पाहिजे. नद्यांना होणारा पाण्याचा पुरवठा अशा जंगलावर अव-लंबून असतो. या नद्यांच्या पात्रासभोवतालचा प्रदेश हा देशातील सर्वांत सुपीक विभाग आहे.

(ब) मोठमोठ्या नद्यांच्या पात्रालगत वृक्ष नसल्यास नदीकिनाऱ्यालगतच्या जमिनीची प्रचंड धूप होते ती थांबविणे आवश्यक आहे.

(क) किनाऱ्यालगतच्या विभागावर वाढत जाणारी वाळू व वालुकामय प्रदेशांची वालुकाप्रसरणामुळे होणारी वाढ थांबविणे आवश्यक आहे.

३. नागरिकांच्या सामान्य आरोग्यास पोषक व उत्साहवर्धक वातावरणनिर्मितीसाठी जेथे जेथे शक्य असेल तेथे तेथे छोटी छोटी वृक्षवने निर्माण करण्याची निकड आहे.

४. मुबलक चारा, तसेच शेतीच्या अवजारांसाठी लाकूड आणि विशेषत: सरपण उपलब्ध करून देण्याची निकड ज्यामुळे शेणाचा उपयोग अधिकाधिक धान्य-उत्पादनाकडे करता येईल.

५. इमारती लाकूड तसेच लष्कर, उद्योगधंदे व दळणवळणाची साधने यासाठी लागणारी अन्य वनउत्पा-दने यांचा नियमित पुरवठा होण्याची गरज.

६. वरील गरजा पूर्ण होण्याव्यतिरिक्त अधिकाधिक वार्षिक महसुली उत्पन्न मिळण्याची गरज.

एक बाब येथे लक्षात घ्यावी लागेल ती अशी की, १९५२ च्या वनधोरणामध्ये पर्यावरणसंतुलनाच्या दृष्टीने जंगलाचे महत्त्व व जंगलांचे सामाजिक महत्त्व यावर भर दिलेला आढळतो. व्यापार, उद्योगधंदे यांच्या गरजा व महसुलीउत्पन्न यांना दुय्यम महत्त्व दिलेले आढळते. एका अर्थाने १९५२ ची राष्ट्रीय वननीती ब्रिटिशकालीन वननीतीचीच पुढची पायरी म्हणता येईल. जंगलात आणि आसपासच्या भागात राहणाऱ्या आदिवासी जमा-तींचे जंगलावरील हक्क व्यापक राष्ट्रीय हितसंबंधांच्या आड येऊ नयेत असे नमूद करण्यात आले.

वास्तविक पाहता राष्ट्रीय हितसंबंध या संकल्पनेचा अत्यंत संकुचित अर्थ लावण्यात आला. मोठमोठी धरणे व जलविद्युत्प्रकल्प उभारणे, रस्तेबांधणी, दारूगोळ्याचे कारखाने इ. साठी करण्यात आलेल्या जंगलतोडीचे निर्लज्ज समर्थन राष्ट्रीय हितसंबंधाच्या नावाखाली करण्यात आले. याउलट जंगलजमिनी म्हणून दाखवि-ण्यात आलेल्या परंतु प्रत्यक्षात वृक्षावरण नसलेल्या जमिनी लागवडीखाली आणण्यास अतिक्रमण म्हणून संबोधण्यात आले. शक्य असेल तेथे तेथे आदिवासींना वनांचा उपयोग करण्यास प्रतिबंध केला गेला. जंगला-पासून अधिकाधिक महसुली उत्पन्न मिळविण्याचे प्रयत्न सरकारने केले. तांत्रिक कौशल्याने सुसज्ज अशा वन-अधिकाऱ्यांनी आदिवासींना जंगलाचे शत्रू समजून जंगलापासून मिळणारे महसुली उत्पन्न अधिकाधिक वाढविण्याचेच प्रयत्न केले.

## राष्ट्रीय शेतकी आयोग

बहुसंख्य गरीब आदिवासींची उपजीविका जंगलावर अवलंबून आहे या वस्तुस्थितीची अवहेलना करून कोणत्याही परिस्थितीत (जंगलाबरोबरच) शेतीचेही व्यापारीकरण झाले पाहिजे अशी शिफारस राष्ट्रीय शेतकी आयोगाने केली आहे. या आयोगाच्या अहवालातील एक संपूर्ण प्रकरण वनीकरणासंबंधी आहे. (प्रकरण ९). या संपूर्ण प्रकरणाचा आढावा घेणे येथे शक्य नसले तरीही वननीतीसंबंधी या आयोगाच्या मान्यवर सदस्यांनी केलेल्या विधानांचा परामर्श घेणे सयुक्तिक होईल. आरंभीच आयोगाने एक उदात्त घोषणा केली आहे–

दारिद्र्याचे निराकरण व स्वावलंबन हे दोन भारताच्या नियोजित विकासामार्गाचे पायाभूत उद्देश आहेत. उत्पादनामध्ये, विशेषत: मोठ्या प्रमाणावर खप असलेल्या मालाच्या उत्पादनामध्ये नोकरीची अधिकाधिक संधी उपलब्ध करून देणे हे दोन उद्देश साध्य करण्याचा एक उत्तम मार्ग आहे. – त्याचबरोबर 'औद्योगिक उपयोगाच्या लाकडाचे उत्पादन ही जंगलाच्या अस्तित्वासाठी अत्यंत आवश्यक बाब आहे.' असेही विधान करण्यात आले आहे. कदाचित् आयोगाच्या विद्वान सदस्यांच्या ध्यानात हे आले नसावे की, औद्योगिक उपयोगाच्या लाकडाची गरज निर्माण होण्यापूर्वी शेकडो वर्षांपासून जंगले अस्तित्वात आहेत. गरिबांच्या विरोधी असा या आयोगाचा व्यापारी दृष्टिकोन अहवालात ठिकठिकाणी दृष्टोत्पत्तीस येतो.

"ग्रामीण जनतेला वनउत्पादनाचा मोफत पुरवठा आणि त्यांचे जंगलावरील हक्क व सवलती यामुळे जंगलांचा नाश होत आहे आणि त्यामुळे ही प्रक्रिया उलट दिशेने सुरू करण्याची निकड आहे. वनरक्षण व वनसंवर्धन यामध्ये ग्रामीण जनतेचा फारसा वाटा नाही. जंगलमालाचा अवाजवी वापर केल्यानंतर आता त्यांनी आपल्याला वनउत्पादन मोफत वापरण्यास मिळतील असे प्रयत्न कोणी तरी करेल अशी अपेक्षा अजिबात बाळगू नये." (पान २५).

आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारित राष्ट्रीय वननीती देशाच्या पुढील महत्त्वाच्या गरजांवर आधारित असावी–

(१) देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी तसेच लोककल्याणासाठी अधिकाधिक मालाचे उत्पादन होईल अशा प्रकारे जंगलमालाचे नियंत्रण करण्यात यावे.

(२) पाण्याचे प्रवाह, जमिनीची सुपीकता व धरणे व पाण्याच्या साठ्यांचे उपयुक्त आयुष्य यावर प्रतिकूल परिणाम करणारी डोंगरभागातील जंगलतोड व जमिनीची धूप रोखणे आवश्यक आहे.

(३) नद्यांच्या वृक्षहीन किनाऱ्यालगतच्या जमिनीची धूप तसेच पडीक जमिनीची धूप थांबविणे व समुद्रकिनाऱ्यालगत आणि इतर भागात होणारा वालुकामय प्रदेशाचा विस्तार रोखणे.

(४) लष्कर, दळणवळणाची साधने व इतर अनेक गरजा पुरविण्यासाठी आवश्यक औद्योगिक कच्चा माल, इमारती लाकूड व इतर वनउत्पादने यांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी अधिकाधिक वनउत्पादकतेची आवश्यकता आहे.

(५) जंगलाचा नाश होणार नाही याची खबरदारी घेऊन जंगलभागातील जनावरांना चारा पुरविणे.

(६) ग्रामीण जनतेच्या सरपण व कमी प्रतीच्या लाकडाच्या गरजा पुरविणे.

(७) वनजीवन व पर्यावरणसंतुलन यावर परिणाम होणार नाही याची खबरदारी घेऊन वनविभागामध्ये करमणुकीच्या व प्रवासी सोयी पुरविणे.

(८) मधूनमधून लागवडीखाली आणलेली जमीन असलेले जंगलाचे पट्टे निर्माण करणे. माती, झाडेझुडपे व प्राणीजीवन यामधील निरोगी संबंध कायम राखले जातील अशा प्रकारे पर्यावरणरचनेमध्ये अधिकाधिक झाडांची लागवड करणे व एक प्रजातीय लागवडीस हानीकारक अशा कीटकांच्या शत्रूंच्या विनाशाची शक्यता कमी करण्यासाठी वैविध्यपूर्ण जैविक संग्रह प्रस्थापित करणे.

उपयुक्ततेच्या दृष्टीने (१) संरक्षक जंगले (२) उत्पादक जंगले (३) सामाजिक जंगले. या तीन प्रकारात जंगलाची विभागणी करावी अशी आयोगाची शिफारस आहे.

**संरक्षक जंगलांमध्ये** डोंगरउतार, नद्यांची पाणलोटक्षेत्रे, नदीकिनारा समुद्रकिनारा यासारख्या धूप व झीज होईल अशा भागावरील जंगलांचा समावेश असावा.

**उत्पादक जंगले** ही प्रामुख्याने व्यापारी जंगले असावीत व त्यामध्ये मूल्यवान इमारतीलाकूड देणारे वृक्ष असणाऱ्या जंगलाचा समावेश असावा. देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने, तसेच राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या

विविध गरजा पूर्ण करण्यासाठी **उत्पादक जंगले** अत्यावश्यक आहेत.

**सामाजिक जंगलामध्ये** पडीक जमीन, ग्रामपंचायतीच्या मालकीच्या जमिनी, गावठाण तसेच रस्ते, कालव्यालगतच्या जमिनी तसेच रेल्वेमार्गालगतच्या जमिनी यावरील वृक्षावरण यांचा समावेश असावा. रस्ते, कालवे व रेल्वेमार्गालगतच्या जमिनींवर चारा, फळे व सरपण देणाऱ्या वृक्षांची मिश्र लागवड करावी.

उत्पादक जंगलांना सर्वोच्च अग्रक्रम व सामाजिक जंगलांना नीचतम अग्रक्रम आयोगाने दिलेला आहे हे यावरून स्पष्ट होईल. ग्रामीण जनतेच्या गरजांची दखल आयोगाने काही प्रमाणात घेतली असली तरी आदिवासींच्या गौण उपजविषयक गरजांकडे मात्र आयोगाने पूर्णतः दुर्लक्ष केलेले आहे. आयोगाच्या मते लोकसमूहाच्या पुढील गरजा पुरविणे हे जंगलांच्या सामाजिक उपयुक्ततेत अंतर्भूत आहे.

(अ) शेतीअवजारांसाठी लाकूड व सरपण.
(ब) चारा व गवत.
(क) करमणूक.

घरासाठी लाकूड, छपरे शाकारण्यासाठी पाने, अन्न म्हणून वापरण्यात येणारी फळे, फुले व कंदमुळे, तेल गाळण्यासाठी जंगलातून गोळा करण्यात येणाऱ्या बिया इ. आदिवासींच्या गरजा आयोगाने विचारात घेतलेल्या नाहीत हे आश्चर्यकारक आहे. करमणूक ही सामाजिक गरज असल्याचा उल्लेख आयोगाने केलेला आहे. परंतु जंगलावर अवलंबून असणारी उपजीविका ही जंगलवासियांची त्याहीपेक्षा महत्त्वाची गरज असल्याची जाणीव आयोगाला आहेसे दिसत नाही. यापैकी काही बाबींचा उल्लेख सहज जाताजाता केलेला आढळतो. मात्र देशाच्या महत्त्वाच्या गरजांमध्ये त्यांचा समावेश केलेला नाही. प्रामुख्याने पडीक जमिनीवर सामाजिक वने उभारावयाची आहेत. आयोगाचा भर प्रामुख्याने मानवनिर्मित उत्पादकवने उभारण्यावर आहे. वननीतीच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी सध्याचे कायदे अधिक जोरकस करण्याची तसेच सुधारित अखिल भारतीय वनकायदा करण्याची शिफारस आयोगाने केली आहे (पान २९) भारतीय वनकायद्याचा मसुदा प्रामुख्याने राष्ट्रीय शेतकी आयोगाच्या शिफारशींवरच आधारलेला आहे.

## भारतीय वनविधेयक—१९८०

भारतीय वनविधेयकातील तरतुदीवरून नागर समाजाभिमुख व ग्रामीण समाजविरोधी पक्षपात स्पष्टपणे दिसून येतो. ही बाब तसेच विधेयकातील अनेक उणीवा अनेक अभ्यासकांनी व कार्यकर्त्यांनी निदर्शनास आणलेल्या आहेत.

## विधेयकातील प्रमुख तरतुदी

विधेयकातील काही व्याख्यांचे स्वरूप अतिशय व्यापक आहे. उदा. झाडेझुडपे असलेली चराऊ कुरणे तसेच सरकारने 'जंगल' म्हणून जाहीर केलेली **कोणतीही जमीन** 'जंगल' म्हणून समजली जाईल इतकी जंगलाची व्याख्या व्यापक करण्यात आली आहे. (कलम २ [ ३ ] ) यावरून स्पष्ट दिसते की झाडेझुडपेसुद्धा नसलेली कोणतीही जमीन 'जंगल जमीन' म्हणून सरकारला जाहीर करता येईल. त्याचप्रमाणे झाडे, पाने, फुले फळे तसेच तसा उल्लेख न केलेले झाडाचे भाग किंवा अन्नउत्पादने तसेच सर्व प्रकारचे गवत, वेली, शेवाळ इ. सर्वांचा समावेश वनोत्पादनांमध्ये करण्यात आला आहे. (कलम २ [ ६ ] )

विधेयकात (१) आरक्षित जंगले (२) संरक्षित जंगले (३) ग्रामजंगले. या तीन प्रकारात जंगलांची विभागणी करण्यात आली आहे. ही विभागणी प्रामुख्याने वनोत्पादनावरील लोकांच्या हक्कावर आधारित आहे.

विधेयकामध्ये आरक्षित किंवा संरक्षित जंगलात पाने, फुले तोडणे यासारखी प्रतिबंध करण्यात आलेली कृत्ये केल्यास शिक्षेची तरतूद आहे. यासाठी वापरण्यात आलेली हत्यारे, अवजारेही जप्त करण्याचे अधिकार जंगलअधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. जंगलासंबंधीच्या गुन्ह्याबद्दल लोकांना अटक करण्याचे व मालमत्ता जप्त करण्याचे व्यापक अधिकार जंगलअधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. विधेयकामध्ये लोकांसाठी कठोर शिक्षेची तरतूद केलेली आहे, तर जंगलअधिकाऱ्यांना मात्र व्यापक अधिकार व सवलती देण्यात आल्या आहेत. जंगलजमीन व वनोत्पादने यावरील व्यक्तिगत हक्क विधेयकात मान्य करण्यात आले आहेत; परंतु आदिवासी जमातींचे वनोत्पादनावरील अनेक हक्क सामूहिक स्वरूपाचे असतात या वस्तुस्थितीकडे मात्र पूर्णपणे डोळेझाक केलेली आहे. अशा

प्रकारे या विधेयकामध्ये जंगलाचे संरक्षण लोकांसाठी न करता लोकांपासून करण्यावर भर देण्यात आला आहे. लक्षावधी गरिबांच्या उपजीविकेचे साधन म्हणून असलेले जंगलाचे खरे महत्त्व या विधेयकाने नाकारलेले आहे.

या विधेयकातील तरतुदी १९४७ च्या भारतीय वनकायद्यात समाविष्ट असलेल्याच आहेत असा करण्यात आलेला दावा चुकीचा आहे. तरतुदींमध्ये काही बदल करण्यात आलेले आहेत. वस्तुतः १९४७ चा भारतीय वनकायदा व १९८२ चा वनकायदा हे पूर्णतः भिन्नच असले पाहिजेत. त्यानुसार वनविषयक धोरण तसेच वनविधेयकामध्ये मूलभूत बदल होण्याची निकड आहे. गरिबीचे उच्चाटन करण्याचे कंकण हाती बांधलेल्या सरकारला कोणताही कायदा अगर नीती यांचे समर्थन ती परकीय राजवटीत तशी होती या आधारावर करताच येणार नाही. भूतकाळातील धोरणाचा पूर्ण फेरविचार व गरिबीचे उच्चाटन करू शकणाऱ्या धोरणाचा स्वीकार ही काळाची गरज आहे.

## नवीन वननीतीसाठी काही मार्गदर्शक तत्त्वे

नवीन वननीतीची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे असली पाहिजेत. (अ) पर्यावरण संतुलन (ब) फळे, फुले, कंदमुळे, चारा, सरपण, खते या जंगलवासियांच्या मूलभूत गरजा भागविणे. (क) उद्योगांच्या कच्च्या मालाच्या गरजा व नागर समाजाच्या योग्य गरजा भागविणे. यामध्ये निर्यातीसाठी जंगलउत्पादनाच्या गरजांना फारसे महत्त्व देण्यात येऊ नये.

## पर्यावरण संतुलन

वनरक्षण व वनसंवर्धन एकूण मानवजातीच्या अस्तित्वाच्या दृष्टीनेच अत्यंत निकडीचे आहे ही बाब आता सर्वमान्य झाली आहे. पर्यावरणसंतुलनासाठी जंगलाचे महत्त्व अनेक विद्वान अभ्यासकांनी आपल्या लिखाणांतून स्पष्ट केले आहे. उत्तर प्रदेशातील उत्तराखंडातील स्त्री-पुरुषांच्या ओठांवर असलेल्या एका अत्यंत लोकप्रिय लोकगीतातून या अभ्यासपूर्ण लिखाणांचे सार व्यक्त केलेले आढळते. चिपको आंदोलनाचे ते एक घोषगीत झाले आहे.

क्या है जंगल के उपकार ?
मिट्टी, पानी और बयार;
मिट्टी, पानी और बयार,
जिंदा रहने के आधार ।

( जमीन, पाणी व प्राणवायू या तीन गोष्टी म्हणजे जंगलांचे वरदान होय. जमीन, पाणी व प्राणवायू हे मानवी जीवनाचे आधार आहेत. )

पर्यावरण संतुलनाच्या दृष्टीने जंगलाचे काही भाग त्याच्या नैसर्गिक अवस्थेमध्ये राखणे आवश्यक आहे. तथाकथित शास्त्रशुद्ध वननीतीच्या नावाखाली सरकारला अथवा मूलभूत गरजांच्या नावाखाली लोकांना या जंगलभागातील वृक्षांची तोड करू देऊ नये. परंपरागत देवरायांप्रमाणे हे जंगलभाग पवित्र मानले जावेत आणि केवळ गळून पडलेली पाने, फळे, फुले इ. चा उपयोग करू द्यावा. पर्यावरणसंतुलनासाठी खास राखून ठेवलेल्या जंगलाचे प्रमाण एकूण जंगलाप्रमाणामध्ये फार मोठे असले पाहिजे असेही नाही; परंतु विशिष्ट प्रमाण मात्र असलेच पाहिजे.

## सामाजिक उद्दिष्ट

सुमारे ३० लाख गरीब आपल्या उपजीविकेचा काही भाग जंगलापासून मिळवतात. यांपैकी बहुसंख्य, ज्यांचे कल्याण हा शासनाच्या धोरणाचा एक महत्त्वाचा भाग आहे असे जंगलवासी, आदिवासी आहेत. बिकट परिस्थितीमध्ये जंगलवासी पाने, फुले, जंगली फळे, कंदमुळे यावर जगतात. आपल्या गुराढोरांसाठी चारापाणी ते जंगलातूनच मिळवतात. यापैकी बहुसंख्य लोक जमीन लागवडीखाली आणण्यापूर्वी त्यावर वाळलेली पाने पसरून राब भाजतात. कित्येक आदिवासी स्त्रिया सरपण विकून आपला निर्वाह चालवतात. गौण वनउत्पादने गोळा करणे व विकणे यामधून बऱ्याच आदिवासींना रोजगार मिळू शकतो. राष्ट्रीय शेतकी आयोगाने जंगलकामामधून आदिवासींना रोजगार पुरविण्यास सुचवले आहे. मात्र बहुसंख्य आदिवासींना वनविभागाकडून प्रत्यक्ष रोजगार मिळत नसून वनउत्पादने गोळा करण्याच्या कामातून अप्रत्यक्ष रोजगार त्यांना मिळवावा लागतो या वस्तुस्थितीकडे आयोगाने दुर्लक्ष केले आहे.

जंगल हे आदिवासींच्या उदरनिर्वाहाचे महत्त्वाचे साधन आहे याकडे सरकार नेहमीच दुर्लक्ष करते. एका विद्वान शासकीय अधिकाऱ्याने हे स्पष्टपणे मांडले आहे. 'आदिवासींचे अर्थकारण जंगले व त्यांचे अर्थ-

कारण यांचेशी पूर्णतः निगडित आहे. हा अन्योन्य संबंध मान्य करण्यात आला असला तरी धोरणे व कार्यक्रम यामध्ये मात्र त्याचे प्रतिबिंब पडलेले दिसत नाही. त्यामुळे आदिवासींचे अर्थकारण व जंगलांचे अर्थकारण हे एकमेकांपासून दूर चालले आहे आणि याचा दोहीं-वरही प्रतिकूल परिणाम होत आहे. काही बाबतीत जंगलांचा नाश होण्यात त्याचे पर्यवसान होते तर काही बाबतीत आदिवासींचे अर्थकारण दुभंगले जाते. काही बाबतीत राष्ट्रीय अर्थकारणावरही त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे. सामाजिक आर्थिक संरचनेतील असमतोल त्यामुळे वाढत आहे.'

ग्रामीण जनतेच्या गरजा भागविण्यासाठी जंगलाच्या सामाजिक उपयुक्ततेवर भर देण्यात आला तर वनरक्षण व वनसंवर्धन यास ते पोषकच होईल. सार्वत्रिक ग्रामीण दारिद्र्य व पर्यावरणातील असमतोल या दोन्ही समस्या त्यामुळे सुटू शकतील. आजच्या परिस्थितीत जंगलांचे रक्षण करण्यात ग्रामीण जनतेला फारसा रस नाही. केवळ वनरक्षक व पोलीस यांच्याद्वारे जंगलाचे संरक्षण होणे अशक्य आहे. जंगलाद्वारे ग्रामीण जनतेचे हित-संबंध राखले जाणार असतील तरच ग्रामीण जनताही जंगलांचे संरक्षण करील. सरपण, चारा, खते, फळे, घरांसाठी इमारती लाकूड इ. ग्रामीण जनतेच्या मूलभूत गरजा केवळ तत्त्वतः मान्य करून भागणार नाही तर त्या पुरविण्याची व्यवस्था वनविकास व वनव्यवस्थापन यांचे नियोजन करताना करण्यात आली पाहिजे.

## जंगलांचे सामाजिक महत्त्व

जंगलामुळे गरिबांच्या काही मूलभूत गरजा भागतात. अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा मानल्या जातात. सरपणाच्या अभावी नुसते कच्चे अन्न मानवाची भूक भागवू शकणार नाही. त्यामुळे लाकूड (सरपण--इंधन) हीसुद्धा मूलभूत गरज मानली गेली पाहिजे. भारतातील लक्षावधी गरीब आदिवासी वर्षाचा काही काळ जंगलातील कंदमुळे व फळे यावर उप-जीविका करतात. आदिवासी जरूर भासली तर चिंचोक्यांचे पीठसुद्धा वापरतात. काही जंगली भाज्याही ते वापरतात. खनिज तेलाच्या किंमती भडकत असल्या-मुळे आणि ग्रामीण भागातील इंधनाच्या तुटवड्यामुळे लाकडाचा इंधन, सरपण म्हणून उपयोग वाढत आहे. ग्रामीण भागात विद्युत्‌शक्तीचा इंधन म्हणून उपयोग होण्याची शक्यता नजीकच्या, भविष्यकाळात तरी दिसत नाही. इंधन म्हणून लाकडाची मागणी हे वाढत्या जंगलतोडीचे एक प्रमुख कारण आहे. सरपणा-साठी वृक्षांची तोड नवीन वृक्षवाढीपेक्षा किती तरी अधिक आहे. सरपण म्हणून लाकडाची वाढती मागणी पाहता ही जंगलतोड थांबवणे अशक्य आहे. जलद वाढणाऱ्या झाडांची लागवड करणे आणि ग्रामीण भागाच्या इंध-नाच्या गरजेकडे लक्ष पुरविले यामुळे ही समस्या काही प्रमाणात सुटू शकेल. अधिक कार्यक्षम चुलींचा वापर वाढला तर इंधनास बचत करणे शक्य होईल. गोबर गॅस प्लँटस्‌ गावोगाव उभारण्यास सरकार प्रोत्साहन देत आहे. यासाठी देण्यात येणाऱ्या सवलती विचारात घेतल्या तरीही गोबर गॅस फक्त श्रीमंत शेतकऱ्यांनाच परवडेल. तरीसुद्धा सरपण म्हणून लाकडाची मागणी कमी होण्यात त्याचा उपयोग होऊ शकेल.

सरपणासाठी लाकडे गोळा करण्यासाठी गरीब स्त्रिया व मुले यांना अधिक वेळ व शक्ती खर्च करावी लागते. होणाऱ्या गोवऱ्यांचाही सरपण म्हणून उपयोग वाढत आहे. शेणगोवऱ्यांचा वाढता उपयोग उत्तम प्रकारच्या सेंद्रिय खतापासून राष्ट्राला वंचित करीत आहे. गरिबांच्या इंधनगरजा पुरविण्यासाठी पुरेशी झाडे लावणे हे एक आव्हान आपल्यापुढे आहे.

## गौण वनउपजांवरील हक्क

सध्या अस्तित्वात असलेल्या जंगलांच्या बहुसंख्य भागांना **सामाजिक वने** म्हणून समजण्यात यावे. जंगल जमिनी व जंगल उत्पादने यावरील जंगलवासियांच्या हक्कांची यादी करून ती प्रसिद्ध करण्यात यावी. हे हक्क आजही **निस्सार हक्क** म्हणून सरकारी कागद-पत्रांतून ओळखण्यात येतात. त्यामध्ये भर घालून ते प्रसिद्ध होणे जरुरीचे आहे. वनअधिकारी व जंगलवासी यांच्यातील सध्याच्या वैराची तीव्रता कमी करावयाची असेल तर त्यांचे हक्क दडपून टाकण्याचे प्रयत्न सोडून देण्यात यावेत व अन्य व्यवसायांमध्ये जंगलवासी स्थिर होईपर्यंत त्यांना जंगलातून आपला उदरनिर्वाह चाल-विण्याची मुभा देण्यात यावी.

जंगलातील बेसुमार तोड थांबविण्यात यावी. जंग-लाच्या ज्या भागामध्ये साग, निलगिरी, पाईन यांसारखे महत्त्वाचे वृक्ष आहेत ते भाग **उत्पादक वने** म्हणून राखून ठेवण्यात यावेत; परंतु जंगलवासीयांच्या

# वनविकास महामंडळ नाशिक वनप्रकल्प आदिवासीबांधवांसाठी काय करते ?

१. **रोपवनांच्या निर्मितीद्वारा लाकूडउत्पादनात भर घालणे.**
सन १९८२ चे पावसाळ्यात ८१० हेक्टरमध्ये २० लाख सागाची व इतर मौल्यवान जातीची रोपे लावली.

२. **आश्रमशाळांना सरपण व घरगुती उपयोगासाठी फाटे व सरपण सवलतीच्या दरात पुरविणे.**
८ आश्रमशाळांना सन १९८१–८२ मध्ये स्वस्त दराने १७१५ घ. मी. सरपण दिले व इतर गावकऱ्यांना १६१५ वासे निस्तार दराने विक्री करण्यात आले.

३. **वाढत्या प्रजेच्या गरजा लक्षात घेऊन त्यांच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून देणे.**
सन १९८१–८२ मध्ये जंगलभागात ४३५४२२ मजूरदिन काम उपलब्ध करून दिले.

४. **जंगल कामगार सहकारी संस्थांना कूपतोडीची कामे सुपूर्द करणे व या कामाच्या खर्चाव्यतिरिक्त २५% नफा देणे.**
एकूण १३ जंगल कामगार सहकारी संस्थांना ८९००६१।– रुपये खर्चाच्या कामाची २६ कूपे मंजूर करण्यात आली व त्यावर २,२२,५१५ रुपये अलग नफा देण्यात येईल.

५. **दुर्गम आदिवासी भागात दळणवळणाची सोय करणे.**
१९८१–८२ साली दुर्गम भागात ३,३५,०००।– रुपये खर्च करून ११८ कि. मी. चे नवीन रस्ते तयार करण्यात आले.

६. **वनविकास महामंडळात व तसेच जंगल कामगार सहकारी संस्थांत काम करणाऱ्या मजुरांकरिता विश्वखाद्य प्रकल्पाच्या सौजन्याने 'कामापोटी अन्नधान्य' या योजनेखाली गहू व तेल यांचा पुरवठा करणे.**
सन १९८१–८२ मध्ये ५६२ मे. टन गहू मजुरांना रु. ०–६० पैसे किलो दराने देण्यात आला व ३२ मे. टन तेलाचे फुकट वाटप करण्यात आले.

७. **आदिवासी बांधवांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारण्याकरिता विविध कल्याणकारी योजना राबविणे.**
सन १९८१–८२ मध्ये निरनिराळ्या कल्याणकारी योजनांवर १६,२५,३२५/– रुपये खर्च करण्यात आले.

८. **वनविकास महामंडळाच्या नवीन प्रकल्पातील कर्मचाऱ्यांना व मजूरवर्गास सन १९८१–८२ मध्ये ९१,४६५।– रुपये इतकी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून वाटण्यात आली.**

वस्तीजवळील भागात अशा वृक्षांची लागवड करण्याचे प्रयत्न होऊ नयेत.

नजिकच्या जंगलभागातील वनोत्पादनावरील स्थानिक लोकांचे हक्क हा लोकाभिमुख वननीतीचा गाभा असला पाहिजे. वनोत्पादनावरील पहिला हक्क स्थानिक जनतेचा असेल. मात्र हा हक्क स्वतःच्या उपयोगापुरताच व उपजीविकेसाठी विक्री एवढ्यापुरताच मर्यादित असावा. नजीकच्या ग्रामीण वा शहरी भागात डोक्यावरून मोळी नेऊन विकण्याची मुभा आदिवासींना असावी. मात्र कंत्राटदारांना कुपे विकण्यात येऊ नयेत. तसेच जळणासाठी लाकूड गोळा करण्यासाठी अथवा ते वाहून नेण्यासाठी वाहनांचा उपयोग करण्यास मनाई करावी.

गौण वनोत्पादने गोळा करणे व विकणे यावर बहुसंख्य जंगलवासी आपला उदरनिर्वाह करतात. वृक्षारोपण अथवा वृक्षतोडीमध्ये रोजगार उपलब्ध करणे हा याला पर्याय होऊ शकत नाही. गौण वनोत्पादने गोळा करण्यास उत्तेजन देण्याचे सर्व प्रकारचे प्रयत्न व्हावेत. झाडाची तोड न करता मिळवता येते ती **गौण वनउपज** अशी व्याख्या करण्यात यावी.

आदिवासी व जंगलवासियांना गौण वनोत्पादनांची वाजवी किंमत मिळेल याकडे लक्ष देणे जरूर आहे. महाराष्ट्रासारख्या काही राज्यांत आदिवासी विकास महामंडळाने या संदर्भात व्यापारी व त्यांचे बगलबच्चे तसेच विधानमंडळे व मंत्रालये यातील विरोधाला न जुमानता फार चांगले कार्य केले आहे. त्याचबरोबर हेही लक्षात घेतले पाहिजे की, केवळ शासनानेच बहुतांशी गौण वनोत्पादने खरेदी करून अधिक भाव मिळतील असे नाही. तेंदूच्या पानांचा व्यापार नियंत्रित करून आपल्या ताब्यात घेण्याबाबतच्या शासनाच्या अधिकारांमुळे मध्यप्रदेश व बिहारमध्ये मंत्रालयपातळीवर अनेक गैरव्यवहार झाले. त्याचे पर्यवसान बिहारमधील आदिवासींमध्ये असंतोष उत्पन्न होण्यात झाले.

अशा प्रकारच्या धोरणामुळे सरकारी महसुलात काही प्रमाणात घट होईल; परंतु वनअधिकारी व जंगलवासी यांच्यातील सध्या अस्तित्वात असणारी तेढ नाहीशी होऊ शकेल. वनअधिकारी व जंगलवासी यापैकी कोणालाच वनरक्षणामध्ये खरा रस नसल्याने जंगलांचा नाश होत आहे. काही सन्माननीय अपवाद वगळता बरेचसे वनअधिकारी कंत्राटदारांशी संगनमत करून व प्रसंगी वृक्षांची बेकायदा तोड करण्यास त्यांना मदत करून अधिकाधिक पैसा गोळा करण्याच्या मागे असतात, तर जंगलवासी बऱ्याचदा कंत्राटदारांसाठी काम करून आपला फायदा पाहात असतात अगर स्वतःच अशी बेकायदा कृत्ये करतात. जंगलांचे संरक्षण सध्याच्या धोरणानुसार केवळ दंडुक्याच्या बळावर अवलंबून आहे. त्याला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न या वनविधेयकात केलेला आहे. यामुळे जंगलवासियांना उपजीविकेचा मार्गच नाकारला जाईल; त्यांच्या हालअपेष्टांवर भर पडेल व त्याचे पर्यवसान वनअधिकारी व जंगलवासी यांच्यातील वैरभावना अधिक तीव्र होऊन पर्यायाने जंगलांचा अधिकच नाश होण्यात होईल, याची जाणीव कोणाला आहेसे दिसत नाही. बळाचा वापर करून वनरक्षण होऊ शकणार नाही. वनरक्षण व वनसंवर्धन हे जंगलवासियांच्या हितसंबंधांना पुरक ठरेल अशी परिस्थिती निर्माण झाली तरच त्यात जंगलवासी रस घेतील.

जंगलवासियांचे गौण वनोत्पादनांवरील हक्क मान्य करून नजीकच्या भागात जंगलमालावर आधारित छोटे उद्योगधंदे सुरू करून तसेच गौण वनोत्पादनांना वाजवी किंमती देऊनच जंगलवासियांचे भयानक दारिद्र्य कमी करण्याचे मूळ उद्दिष्ट साध्य होऊ शकेल.

बुद्धिवंत व प्रशासकीय विकासवाद्यांना कदाचित यामध्ये आदर्शवादाचा वास येईल; परंतु ब्रिटिशांच्या आरंभीच्या काळातही अशाच प्रकारच्या सूचना करण्यात आल्या होत्या.

वनरक्षण व वनविकास साध्य करू शकणाऱ्या खऱ्याखुऱ्या सामाजिक वननीतीची आज निकड आहे.

## उत्पादक वने

दिवसेंदिवस व्यापार व उद्योगधंद्यासाठी जंगलांची मागणी वाढत आहे, याकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही. ही मागणी साग, पाइन, निलगिरी व बांबू यापुरतीच मर्यादित आहे. त्यांच्या किंमती दिवसेंदिवस वाढतच आहेत. सागाच्या लागवडीसाठी इतर वृक्षांची तोड करण्याच्या सरकारी प्रयत्नांना बिहार व बस्तरमध्ये तीव्र विरोध झाला. बांबू प्रामुख्याने कागदासाठी वापरला जातो. एके काळी बांबूला नसती अडचण मानले जात असे. त्याला आज जोराची मागणी आहे. कागदगिरण्यांना बांबू सवलतीच्या दरात विकण्यात येतात. उलट बुरुडांना मात्र ते महागात पडतात. बांबूच्या

बेसुमार तोडीमुळे बांबूची वने मोठ्या प्रमाणावर नष्ट होत आहेत. पॉली फायबर उद्योगांमध्ये निलगिरीचा वापर प्रामुख्याने केला जातो. उद्योगांना लागणारे रेझिन मिळविण्यासाठी पाइनला वाढती मागणी आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या जंगलाच्या काही भागात ही झाडे वाढविली जातात. सर्व देशभर लाखो हेक्टर जमीन पडीक आहे. यापैकी काही जमीन सामाजिक वनीकरणासाठी उपलब्ध करून देण्याचे वनखात्याचे प्रयत्न आहेत. अशा जमिनीवर वृक्षांची लागवड करून त्यांचे रक्षण करणे हे काम सोपे नाही. जमीन सारखी करण्यासाठी, कुंपण घालण्यासाठी, पाणी पुरविण्यासाठी तसेच गुराढोरांपासून या वृक्षांचे रक्षण करण्यासाठी बराच खर्च येईल. अनेक सवलती देण्यात येत असल्या तरीही गरीब भूमिहीनांना हा खर्च पेलवेल की नाही याचीच शंका आहे. यावर उत्तम उपाय म्हणजे वृक्ष-लागवडीसाठी अशा प्रकारचे जमिनीचे तुकडे उद्योग-धंद्यांना उपलब्ध करून देणे.

यासाठी लागणारा भांडवलीखर्च उद्योगधंद्यांना सहज परवडेल. यातून काही कच्चा मालही त्यांना उपलब्ध होऊ शकेल. काही व्यक्तींना खाजगीरीत्याही हे जमिनीचे तुकडे वृक्षलागवडीसाठी देता येतील. गुजराथमध्ये काहींनी यात चांगलेच यश मिळविले आहे. वृक्षलागवडीमध्ये खाजगी व्यक्ती व उद्योगधंदे यांना अधिक चांगले यश येते असा अनुभव आहे. शेताच्या बांधावर झाडे लावण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे. जंगलमालावर आधारलेल्या उद्योगांनी आपली कच्च्या मालाची गरज शक्यतो खाजगी व्यक्ती, व्यापारी संस्था व वनखात्याने संवर्धित केलेल्या **उत्पादक वनातून** भागवावी. नैसर्गिक जंगलामधून त्यांची मागणी किमान असावी. त्यामुळे सध्या चालू असलेल्या बेसुमार जंगलतोडीस आळा बसू शकेल.

## सामाजिक वनीकरण

गुरांसाठी खाद्य आणि सरपण या ग्रामीण जनतेच्या गरजा भागविण्यासाठी सरकार सामाजिक वनीकरणास अधिकाधिक प्रोत्साहन देत आहे. जलद वाढ होणारे वृक्ष वाढतील अशा लक्षावधी हेक्टर जमिनी पडून आहेत. गरिबांच्या गरजा पुरवू शकणाऱ्या झाडांची लागवड करण्याकडे या जमिनींचा उपयोग होऊ शकेल. सामाजिक वनीकरणाच्या संकल्पनेमध्ये मूलभूत बदल आवश्यक आहेत. प्रत्यक्षात सामाजिक वनीकरणाची व्याख्या आपल्या अखत्यारीबाहेरील जमिनीवर झाडे वाढविणे अशी केली आहे. हा खूपच संकुचित दृष्टिकोण आहे. वनखात्याच्या अखत्यारीबाहेरील लागवडीखाली नसलेल्या जमिनीवर इंधन, अन्न व गुरांसाठी खाद्य पुरवू शकणारी यंत्रणा उभारणे अशी सामाजिक वनी-करणाची नवीन व्याख्या करणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या धोरणाने दोन हेतू साध्य होतील. जंगलावर उपजीविकेसाठी अवलंबून असणाऱ्यांना उपजीविकेचे पर्यायी मार्ग उपलब्ध झाल्यामुळे जंगलाच्या नाशाला आळा बसेल. लागवडीखाली नसलेल्या व जंगल नस-लेल्या जमिनीवरील उत्पादन वाढवून ग्रामीण जनतेचे जीवनमान उंचावले जाईल. सामाजिक वनीकरण हे वाटते तेवढे सोपे नाही. चीन आणि कोरियातील अशा प्रकारच्या प्रयोगांनी दाखवून दिले आहे की, सामाजिक वनीकरण मोहीम यशस्वी व्हावयाची असेल तर सरकारचा दृष्टिकोण आणि कृती यामध्ये मूलभूत बदल आवश्यक आहेत. तसेच समाजव्यवस्थेमध्ये आणि जमि-नीच्या उपयोग-पद्धतीमध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे.

सामाजिक वनीकरणापेक्षासुद्धा या लोकाभिमुख अशा सामाजिक वननीतीची आज खरी निकड आहे. वनीकरणाची मोहीम केवळ वनखात्याबाहेरच नव्हे तर जंगलाबाहेर काढून लोकांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. आपल्या गरजा भागविण्यासाठी स्वतःच झाडे वाढविण्याच्या कार्यक्रमात लोकांना सहभागी करून घेण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. उद्योगधंदे आणि शहरातील बाजारासाठी जंगलमालाचा उपयोग दिवसेंदिवस वाढतच आहे. केवळ मोहक कल्पना मांडून आणि लोकभावनांना आवाहन करून जंगलमालाचा हा वाढता उपयोग कमी होणार नाही. खाजगी व्यक्ती व संस्था यांना उद्योग व व्यापारी उपयोगासाठी पडीक जमिनी उपलब्ध करून दिल्या जाव्यात. त्यामुळे जमिनीवरील वृक्षावरणामध्ये भर पडेल व ग्रामीण भागात अधिक रोजगार उपलब्ध होऊ शकेल. यामुळे विकासाच्या नावाखाली चालू असलेल्या नैसर्गिक जंग-लातील बेसुमार तोडीस आळा बसेल.

## वनांचे स्वामित्व व व्यवस्थापन

आरक्षित वनावरील पूर्णतः व बऱ्याच प्रमाणात उत्पादक व सामाजिक वनांवरील सरकारच्या स्वामि-

त्वास पर्याय आहेसे दिसत नाही; परंतु स्थानिक गरजा भागविता येण्याच्या दृष्टीने ग्रामजंगलांवरील स्वामित्वाचे स्वरूप पुरेसे स्पष्ट होणे आवश्यक आहे. सरकारी वृक्षारोपण–कार्यक्रम अथवा वनशेतीच्या कार्यक्रमात सहभागी होण्यापूर्वी उत्पादनावरील मालकीचे स्वरूप स्पष्ट होणे आवश्यक आहे.

स्वामित्वाचे अनेक प्रकार आढळतात. उदा. खाजगी स्वामित्व, सरकारी स्वामित्व इत्यादी. ग्रामजंगले २० किंवा त्याहून अधिक वर्षे सामूहिक मालकीखाली असावीत. काही बाबतीत सामूहिक व्यवस्थापन अयशस्वी झाले असले तरीही वनअधिकाऱ्यांच्या गैर-व्यवस्थापनास पर्याय उभा करणे अत्यंत निकडीचे आहे. पूर्वापार चालत आलेल्या वनपंचायतींचे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न व्हावेत. व्यवस्थापनाची पद्धती आखण्यात यावी, तसेच जंगलजमिनीच्या खरेदी-विक्रीवर बंधने घालावीत. स्थानिक गरजा पूर्ण होणार असतील तरच सामूहिक व्यवस्थापनाला अर्थ आहे. सामाजिक वनीकरणाच्या प्रकल्पांमध्ये सहभागी होण्यासाठी सामूहिक व्यवस्थापन ही पूर्वअट असावी.

**वनशेती**

वनशेतीचे अनेक प्रयोग यशस्वी झाले आहेत. पुढील दोन प्रकारच्या वनशेतीस प्रोत्साहन दिले जावे.

१ **संपूर्ण वनशेती** : जमिनीच्या तुकड्यांवर फक्त झाडांचीच जोपासना करणे. २ **मिश्र वनशेती** : झाडांबरोबरच मधूनमधून इतर पिकांचीही जोपासना करणे. दोन्ही प्रकारच्या वनशेतीमुळे काही प्रमाणात औद्योगिक व व्यापारी गरजा भागू शकतील तर काही प्रमाणात घरगुती गरजाही भागू शकतील. त्याशिवाय वृक्षावरणाखालील जमिनींचे प्रमाणही वाढू शकेल. वनशेतीचा उपयोग शहरी भागात परिसराचे सौंदर्य वाढविण्यासाठीही होऊ शकेल.

**समारोप**

राष्ट्रीय शेतकी आयोगाने पुरस्कारलेली व वन-विधेयकामध्ये अंतर्भूत असलेली वननीती पूर्णतः नाकारण्यात यावी अशी आमची मागणी आहे. वनरक्षण व वनसंवर्धन या कामी ही वननीती कुचकामी ठरणारी आहे. अधिकाऱ्यांच्या लाचलुचपतीस अशा धोरणामुळे प्रोत्साहनच मिळेल. जंगलवासियांना जंगलाबाहेर पडावे लागले तर ग्रामीण भागातून शहरी भागात येणाऱ्या अकुशल कामगारांच्या लोंढ्यात अधिकच भर पडेल. त्यामुळे दारिद्र्य कमी न होता उलट त्यात भरच पडेल. कोणत्याही स्वरूपातील वनविधेयक संसदेत मांडले जाण्यापूर्वी त्याचा साकल्याने फेरविचार होणे आवश्यक आहे. ■


शुभेच्छा

मे. गणेश इंडस्ट्रीज

जालना

# मेंढपाळांचे स्थलांतर : एक अपरिहार्य समस्या



— प्र. भ. द्राक्षे

**धनगरसमाज हा प्रामुख्याने महाराष्ट्रात शेतीस अत्यंत गरजेचा व उपयुक्त समाज आहे. त्यांची बकरी शेतकरी शेतात बसवतात व त्यांच्या लेंड्यांपासून व मूत्रापासून शेतास खते मिळतात.** प्रत्येक वर्षी ठराविक शेतकरी आपल्या शेतात बकरी बसवल्याशिवाय पेरणीच करणार नाही. बकऱ्यांच्या लेंड्यांमुळे व मूत्रामुळे जमिनीचा पोत सुधारतो व कसदारपणा निर्माण होऊन पिके सुधारतात व चांगल्यापैकी उत्पादन मिळते. आजच्या रासायनिक खतांच्या युगात जमिनीचा पोत टिकून रहावा म्हणून शेणखत, लेंडीचे खत हे शेतात घातलेच पाहिजे, त्याशिवाय तरणोपाय नाही. म्हणून शेतीधंद्यात मेंढपाळांची अत्यंत गरज आहे, उपयुक्तता आहे; परंतु अशा उपयुक्त समाजाचे जीवन जवळून पाहिले असता ते कसे खडतर हलाखीचे आहे हे प्रत्यक्ष बघितल्याशिवाय समजणे कठीण.

मेंढपाळ साधारण जून ते सप्टेंबर या ३ ते ३॥ महिन्यांच्या काळात कोल्हापूर भागातून आपली बकरी घेऊन मजल–दरमजल करीत सोलापूर, अक्कलकोट, कुर्डुवाडी, बार्शी, विजापूर, जमखंडी या भागात निघून जातो. यामध्ये करवीर, कागल, राधानगरी, हातकणंगले, पन्हाळा, भूदरगड, गडहिंग्लज या तालुक्यांतीलही धनगर असतात. या लोकांना स्थलांतर करण्याशिवाय गत्यंतरच नसते. कारण इकडील शेतकरी आपली जमीन व बांधबंधारी पेरतात, मोकळा जमिनीचा भाग स्वतःच्या जनावरांकरिता गवतासाठी राखून ठेवतात. पिके पेरलेली असल्यामुळे बकऱ्यांना घेऊन माळरानात जाताच येत नाही. कारण त्यामुळे पेरलेल्या पिकाची नासाडी होते. कोठे बकरी उभी करावी म्हटले तर जागाच नसते व पाऊस उभे राहू देत नाही. पाऊस या जनावरांना सहन होत नाही. बकऱ्या पावसाने गारठतात. बकरे भिजले तर त्याने उभेच राहिले पाहिजे आणि भिजलेले एक बकरे बसले तर सर्व बकऱ्या बसतात. त्यामुळे त्यांच्या अंगात पाणी मुरते व बकऱ्या मरतात. म्हणून मेंढपाळांना जास्त पावसाच्या प्रदेशातून कमी पावसाच्या प्रदेशात आपल्या बकऱ्यांचा जीव वाचवण्यासाठी स्थलांतर करण्याशिवाय मार्गच नसतो. परंतु या स्थलांतरामागे केवढा त्रास आहे, केवढ्या विवंचना आहेत, केवढ्या यातना आहेत !

जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच आपल्या जिल्ह्यातील मेंढपाळ बकऱ्यांचा ‘ खांड ’ घेऊन देशांतराच्या मार्गास लागतो. तो प्रथम जयसिंगपूर, मिरज, ढालगाव या मार्गे पंढरपूर, सोलापूर, अक्कलकोट या भागात व विजापूर, जमखंडी या मार्गे पंढरपूर, सोलापूर, अक्कलकोट या भागात दोन मार्गांनी जात असतो. प्रत्येक मेंढपाळासोबत १०० ते २०० बकऱ्यांचा एक खांड असतो. या खांडापाठीमागे ३ धनगर असतात. पैकी दोघे बकरी हाकण्याचे, राखण्याचे काम करतात व एक मेंढपाळ घोड्यावरून घोंगडीत, जेवणाचे साहित्य घेतलेला असतो. त्याच्याबरोबर चटणी, झुणक्याचे पीठ, तांदूळ व जोंधळ्याचे लाडू हे साहित्य असते. जोंधळ्याचे लाडू जोंधळे भाजून दळावयाचे व गुळाचा पाक करून त्यात पीठ घालून लाडू बांधायचे. या लाडवांचा उपयोग जादा पाऊस लागला व जेवण करण्यास पावसाने संधीच दिली नाही तर हे खाऊन त्यावर पाणी पिऊन रात्र काढावयाची. पाऊस बेदरकार लागला तर घोंगड्याची खोळ करून एका कुशीवर झोपून ती वेळ, ती रात्र मारून न्यावी लागते.

कोल्हापूर जिल्ह्यातील मेंढपाळ आपल्या घरातून साधारण ३ ते ३॥ महिन्यांकरिता आपली बकरी, घोडे, कुत्रे यांसह २०० ते २५० मैल दूर जातो. या वेळी त्याला पाठीमागे आपले वयस्क आईवडील, बायका-मुले यांची सतत आठवण येत असते आणि काळजीही वाटत असते. तसेच गावापासून २०० ते २५० मैल दूर गेलेल्या आपल्या लेकराची व बकऱ्यांची काळजीसुद्धा घरच्या माणसांना पाठीमागे लागून राहिलेली असते. या मेंढपाळांचा खांड मजल-दरमजल करीत असताना मुक्काम कोणत्या तरी खेड्यात, दूर शेतात, आडरानात पडत असतो. मग यांना घरच्या माणसांचे खुशालीचे किंवा पाठीमागे काही कमीजास्त झाल्याचे त्या आडरानात कसे समजणार? याकरिता देशावर गेलेला मेंढपाळ जवळच्या खेड्यात जाऊन एखादा शाळा मास्तर, दुकानदार, पोलीसपाटील याच्याकडून पत्र लिहून घेतो व दर १५ दिवसाला पत्र टाकत असतो मात्र या पत्रात, पत्र ज्या दुकानदाराने, शाळामास्तरने. पोलीसपाटलाने लिहिलेले असते त्याचाच पत्ता दिलेला असतो. कारण घरच्या माणसांनी उत्तर पाठविले तर ते या वरील ठिकाणी अचूक येते व आलेले पत्र घेऊन जाण्यास शेतातून एखादा धनगर-पोऱ्या घोड्यावरून पत्र घेऊन परत शेतात जातो. या पत्रोत्तराची आखणी अगदी शास्त्रशुद्ध व पद्धतशीर या आडाणी निरक्षर समाजाने केलेली असते. या पत्रात "आम्ही सर्व मंडळी बरी आहोत. बकऱ्यांना काही इजा नाही, चारापाणी वेळेवर मिळतो, काही चिंता नको." हाच मजकूर असतो. केव्हा केव्हा पोस्टमन पत्र कोठे तरी टाकतो त्या वेळी ते पत्र मिळत नसल्याने घरी पाठीमागे जिवाभावाचे कोणी तरी दगावले असेल तर ते इकडे परत आल्यानंतरच समजते. वडील दगावल्याची खबर मुलाला ३ महिन्यांनी परतल्यानंतरच समजल्याचे कैक प्रसंग आहेत. काही वेळेला समजूनसुद्धा आडरानात बकरी कोणाच्या तरी जिवावर सोडून देताच येत नाहीत अशी सुद्धा वेळ येते. असा प्रसंग असेल त्या वेळी घरी आल्यानंतर होणाऱ्या वेदना आणि दगावलेल्या जिवाभावाच्या माणसांच्या आठवणी हैराण करून सोडतात.

## कारभाऱ्याची निवड

देशावर बकरी घेऊन फिरत असताना साधारण ४० ते ५० मेंढपाळांचा एक पुठ्ठा असतो. त्यामध्ये साधारण १२०० ते १५०० इतकी बकरी असतात. या पुठ्ठ्यामध्ये सर्वानुमते एक 'कारभारी' निवडतात. त्याला 'कामदार' किंवा 'पुढारी' असे सुद्धा म्हणतात. याच्यावर विशिष्ट जबाबदारी सोपवलेली असते.

आज बकरी ज्या गावाच्या शेतात बसली आहेत तेथला मुक्काम संपण्यापूर्वी पुढे जाऊन दुसऱ्या गावात बकरी कोणाच्या शेतात बसवावयाची ते हा ठरवतो व तसा निरोप तळावर येऊन देतो. वाटेत एखाद्या शेतकऱ्याने बकरी अडवली, कुऱ्हाड, काठी, जाळे हिसकावून घेतले तर त्या कारभाऱ्याने त्याचा शोध लावून त्या गावच्या लोकांशी तडजोड करून त्या वस्तू परत मिळवून द्यावयाच्या. एखादा मेंढपाळ आजारी पडला तर त्याला जवळच्या गावातून औषध आणून द्यायचे. दवाखाना कोठे जवळ असेल तर दवाखान्यात घेऊन जायचे. बकरी ज्याच्या शेतात बसवावयाची त्या शेतकऱ्याकडून काय घ्यावयाचे हे तो कारभारीच ठरवतो. एक हजार (१०००) बकरी एका रात्रीस बसवली तर साधारण ८ ते १२ पायली धान्य जोंधळे शेतकरी देतो. धान्य नसल्यास पैसे ४०|– ते ६०–०० रु. पर्यन्त देतो. काही ठिकाणी फक्त जेवणावारी बकरी बसवून उठावे लागते.

## पाळ्या करून राखण

शेतात बकरी रात्री बसवली म्हणजे लांडगा, कोल्हा, चोर यांच्यापासून संरक्षण करण्याकरिता साधारण पंधरा धनगर असतील तर पाच-पाच धनगरांच्या तीन पाळ्या करून राखण केली जाते. म्हणजे पाच लोकांनी जागायचे व बाकीच्यांनी झोप घ्यायची. नांगरलेल्या ढेकळात फक्त घोंगडे टाकायचे व त्यावर आंग टाकले की, आपोआप डोळे मिटतात. सोबत कुत्री ही इमाने जागत असतात. काही लांडगा अथवा चोरांची चाहूल लागताच भुंकून तुटून पडतात व खाल्ल्या भाकरीचा प्रामाणिकपणा बजावतात.

बकऱ्या शेतात असतील आणि पाऊस भरपूर लागला तर काळवट रानात बकरी अडकून मरण्याची शक्यता असते. म्हणून त्यांना फार गडबडीने माळावर घ्यावे लागते.

वस्ती गावापासून दूर आडरानात, पोटासाठी मिळालेले जोंधळे गावात जेथे गिरणी असेल तेथे कण्या करून घ्यायच्या व रानात दगडाच्या चुलीवर काटक्या-

कुटक्या जाळून कण्या करून पोटात टाकायच्या आणि ढेकर द्यायचा. एखादा उदार शेतकरी सणवार असेल तर भरपूर लाडू, खीर, करंज्या, पोळ्या घालतो. त्या वेळी कोणता तरी सण आहे याची कल्पना येते; परंतु बऱ्याच वेळा उपाशीसुद्धा रहाण्याची पाळी येते. यांच्यासारखे उपाशी राहून कढकाढणे कोणासही जमणार नाही.

### मार खाऊन गप्प...

आडरानात चोर, गुंड, बकरी चोरण्याच्या इराद्याने येतात, त्या वेळी त्यांना प्रतिकार करणे जेवढा शक्य तेवढा केला जातो; परंतु त्यातूनही गुंडांची ताकद जादा झाली तर ते मारतील तेवढा मार खाऊन गप्प बसावे लागते. त्यांना मार खाल्ल्याचे दुःख होत नाही; परंतु यांच्या कुत्र्यास कांही दगाफटका केला तर मग मात्र यांना मरणयातना होतात. ही माणसे वेडावतात. पण सांगणार कोणाला ? आणि तक्रार कोठे गुदरायची आणि बकरी आडरानात कोणाच्या स्वाधीन करून जायचे ?

काही वेळेला पाणी लागून बकरे मरते त्या वेळी जवळच्या एखाद्या दलित जमातीच्या माणसाने साधारण जरी किमत दिली तरी त्याला मेलेले बकरे देऊन टाकतो आणि काहीच किमत आली नाही तर ते बकरे हेच लोक कुटून चटणी–मीठ टाकून शिजवून खातात.


दरवर्षी साधारण ५००० ते ६००० मेंढपाळ स्थलांतर करून देशावर जातात. त्यांच्या सोबत ३,५०,००० चे जवळपास इतकी बकरी, १२५० ते १५०० इतकी घोडी, २००० ते ३००० कुत्री इतका अंदाजे संच असतो. हे स्थलांतर दरवर्षी याच जून महिन्यात पहिल्या-दुसऱ्या आठवड्यात ठरलेले असते. या स्थलांतराशिवाय त्यांना जगताच यावयाचे नाही; परंतु या भटक्या मेंढपाळांना वरती आभाळ व खाली धरतीचा आधार याशिवाय कोणाचाही आधार नाही असे घडोघडी वाटत असते. त्याची इच्छा आहे की, आमच्या भ्रमंतीचा अभ्यास करून आडरानात आमच्या मेंढरांना, घोड्यांना, कुत्र्यांना तसेच स्वतःला काही दुखणे आले तर दवापाणी, शिवाय क्वचित चोरांपासून होणारा त्रास वाचवण्यासाठी शासनाने आम्ही ज्या भागात फिरतो तिकडे दवाखान्याचे फिरते वहानपथक ठेवून आमची व आमच्या मुक्या जनावरांची काळजी घेण्याचा प्रयत्न केला तर आम्ही धन्य धन्य मानू !

मेंढपाळ साधारण सप्टेंबरअखेर अखेर माघारी आपल्या घराकडे वळतो. त्या वेळी तुला काय उरले असे त्यास विचारले असता 'नफा किंवा शिल्लक काहीच नाही, फक्त आमचे व आमच्या बकऱ्याचे पोट भागले 'यातच आम्हाला समाधान आहे' असे तो अगदी आनंदाने सांगतो.

देशावरून परत आमच्या जिल्ह्याच्या सीमेवर म्हणजे –'कृष्णामाईच्या' काठावर आल्यानंतर नेमलेल्या कारभाऱ्याला तेथे पेहरावा म्हणजे म्हंजे, शर्टास कापड, पटका बांधतो व एकमेकांचा आनंदाने डोळ्यात पाणी धरून निरोप घेतो. येथून प्रत्येक मेंढपाळ आपापल्या तालुक्यात आपापल्या गावाकडे आपली मेंढरे हाकतात आणि घरच्या ओढीने मेंढरेही चराचरा पावलं उचलतात. गावच्या वेशीवर येताच लहान लहान पोरे टकुची घालून बाबा आला ग, बिरू आपला बा आला ग, मायाप्पा दादा मला घोड्यावर घे ग म्हणून आंगलटी येतात. काही पोरे मेंढरांच्या कळपात घुसून त्यांच्या वाढलेल्या गुबगुबीत केसांवरून हात फिरवतात त्यांना कुरवाळतात.

अशी ही भ्रमंती दरसाल ठरल्यावेळी याच जूनमध्ये सुरू होऊन सप्टेंबरअखेर अखेर संपते. ■





# धन्या मी जाते

ती : धन्या मी जाते माझ्या माहेरा
तो : अग येवढी जमीन मला नांगरुनी दे ना
मंग जा तुझ्या तु माहेरा
ती : जमीन नांगरली रं माझे भरतारा
आता मी जाते माझे माहेरा ।। १ ।।
धन्या मी जाते माझ्या माहेरा
तो : अग येवढा भात मला पेरून दे ना
मंग जा तुझ्या तु माहेरा
ती : भात पेरीला रं माझे भरतारा
आता मी जाते माझे माहेरा
धन्या मी जाते माझ्या माहेरा ।। २ ।।

तो : अग येवढा भात मला लावून दे ना
मंग जा तुझ्या तु माहेरा
ती : भात लाविला रं माझ्या भरतारा
आता मी जाते माझे माहेरा
धन्या मी जाते माझ्या माहेरा ।। ३ ।।

तो : अग येवढा भात मला कापून दे ना
मंग जा तुझ्या तु माहेरा
ती : भात कापिला रं माझे भरतारा
आता मी जाते माझे माहेरा
धन्या मी जाते माझ्या माहेरा ।। ४ ।।

तो : अग येवढा भात मला कांडून दे ना
मंग जा तुझ्या तु माहेरा
ती : भात कांडिला रं माझे भरतारा
आता मी जाते माझे माहेरा
धन्या मी जाते माझ्या माहेरा ।। ५ ।।

तो : अग येवढा भात मला रांधून दे ना
मग जा तुझ्या तु माहेरा
ती : भात रांधेला रं माझे भरतारा
आता मी जाते माझे माहेरा
धन्या मी जाते माझ्या माहेरा ।। ६ ।।

तो : अग येवढी बासना मला वटनू दे ना
मंग जा तुझ्या तु माहेरा
ती : बासना वटिली रं माझे भरतारा
आता मी जाते माझे माहेरा
धन्या मी जाते माझ्या माहेरा ।। ७ ।।

ती : आता तू पण चल माझ्या माहेरा
धन्या तू पण चल माझ्या माहेरा
आता दोघेपण जाऊ माझे माहेरा

—शोभा मुळे

# नदीचे ते कानी

नदीचे ते कानी जाय ग
जाईला कल्याच नाय ग

जव्हारच्या पोरी पन्नास ग
एक नाय माझे मनास ग

एक हाय माझे मनात ग
ती हाय लहानपणात ग

—वीणा समेळ

(आपल्या मनाप्रमाणे गावाचे नाव घेऊन वरील ओळी दोन दोन वेळा म्हणाव्या.)

# दारिद्र्यरेषेखालील लोकांना आत्मनिर्भर करण्याचा संकल्प !

नव्या २० कलमी कार्यक्रमानुसार दारिद्र्यरेषेखाली जगणाऱ्या व्यक्तीचे जीवनमान उंचावणे आणि समाजातील अतिदुर्बल घटकांचा आर्थिक व सामाजिक विकास क्रमाक्रमाने घडवून आणणे ही महाराष्ट्राच्या सहाव्या पंचवार्षिक योजनेची मुख्य उद्दिष्टे आहेत.

त्या दृष्टीने चालू वर्षाच्या अर्थसंकल्पात २६१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून त्याचा लाभ जवळजवळ अर्ध कोटी व्यक्तींना मिळेल.


## काही ठळक वैशिष्टये

- रोजगार हमी योजनेखाली खेड्यातील साडेपाच लक्ष मजुरांना काम पुरवण्यासाठी ७२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून त्यापासून १०·५० कोटी मनुष्य दिवस इतका रोजगार उपलब्ध होईल.
- बेघरांसाठी घरे बांधण्याकरता व दुरुस्तीसाठी १३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून त्याचा फायदा सुमारे पाऊण लाख कुटुंबांना मिळेल.
- झोपडपट्ट्यांचा परिसर सुधारण्यासाठी व तेथे विविध सुविधा पुरवण्यासाठी साडेचार कोटी रुपयांची तरतूद असून त्याचा अडीच लाख कुटुंबांना फायदा मिळेल.
- सुमारे २ लाख ६९ हजार निराधार व्यक्तींना २० कोटी रुपये अनुदान देण्यात येईल. स्वावलंबन योजनेखाली १ लाख ३० हजार गरजूंना ५ कोटी रुपये मदत देण्यात येईल.

**दुर्बलांच्या, उपेक्षितांच्या विकासासाठी वीस कलमी कार्यक्रम !**

डीजीआयपीआर / ८२

# जगाच्या कल्याणा विज्ञान-विभूती !



विजय पाठक

आज विसाव्या शतकात, विज्ञानाने प्रचंड भरारी मारली आहे. आपल्या देशातही अत्याधुनिक तंत्रावर आधारित कारखाने निघाले आहेत,निघतही आहेत. भारताने अणुयुगात व अवकाशयुगात प्रवेश केला आहे. म्हणजेच आजचे युग हे विज्ञानाचे युग आहे व भौतिक प्रगतीसाठी विज्ञान हा त्याचा पाया असला पाहिजे. कारण हेच विज्ञान समाजाचे व सृष्टीचे नियम समजावून घेऊ शकते व त्याचाच उपयोग करून आपण भविष्याला आकार देऊ शकतो.

ह्या विज्ञानाचा वापर करून आपण कित्येक असाध्य, आत्तापर्यंत माहीत नसलेल्या गोष्टींचा उलगडा करू शकलो. शेतीव्यवस्था, ऊर्जा, कारखान्यांतून होणारे उत्पादन ह्या विषयांवर शास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले व प्रत्यक्षात उपयोजिले तर होणारे फायदे आपण पाहू शकतो, अनुभवू सुद्धा शकतो.

पण या सर्व प्रगतीपासून येथील बहुसंख्य जनता वंचित राहिली आहे. आपल्यासमोरील समस्यांची उकल करायला आवश्यक असा वैज्ञानिक दृष्टिकोण जनतेत विकसित करण्याच्या दृष्टीने फारशी प्रगती झालेली नाही. अजूनही सर्वसामान्य खेडुतांच्या झोपडीत रॉकेलचेच दिवे आहेत. अजूनही त्यांच्यावर अवैज्ञानिक कल्पनांचा पगडा आहे. अर्थात असे असले तरी लोकांमध्ये विलक्षण व्यावहारिक ज्ञान व तर्कसंगत वस्तुनिष्ठ विचार करण्याची क्षमताही असते.

ह्या क्षमतेचा व तर्कसंगत भक्कम पायाचा विचार करूनच विज्ञान-प्रसार करणे व वैज्ञानिक व लोक यांच्यात दुवा साधणे या दृष्टीतून अनेक संस्थांनी एकत्र येऊन महाराष्ट्र विज्ञान यात्रा समिति स्थापन केली. विज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टिकोण यांचा प्रसार करणे हे या समितीचे ध्येय आहे.

ह्या कार्यक्रमाची सुरवात म्हणून महाराष्ट्रात विज्ञान यात्रा आयोजित केली होती. एकूण १४ जिल्ह्यात ४२ ठिकाणी कार्यक्रम झाले एकंदर ज्या ठिकाणी कार्यक्रम झाले त्यात जास्त भाग तालुका व खेडे यांचा होता.

दिनांक २ ऑक्टोबर ८२, सोलापूरहून सुरुवात होऊन कणबूर, उमरगा, लातूर, अंबेजोगाई, जामखेड, अहमदनगर, कोपरगाव, वैजापूर, औरंगाबाद, धुळे, मालेगाव, सटाणा, नाशिक, कळवे, माहीम, सफाळा, वसई, ठाणे, तारा, महाड, खेड, चिपळूण, देवरुख, रत्नागिरी, कणकवली, लांजा, मालवण, सावंतवाडी, गडहिंग्लज, निपाणी, कोल्हापूर, वारणानगर, इचलकरंजी, जयसिंगपूर, मिरज,सांगली, इस्लामपूर, कऱ्हाड, सातारा, वाई व शेवटी दि. २३ ऑक्टोबर ८२ रोजी भोसरी (पुणे जिल्हा) ह्या ठिकाणी समाप्त झाली. २० दिवसांत वरील सर्व गावांत भरगच्च कार्यक्रम झाले. शिवाय काही ठिकाणी तर रस्त्यात गाड्या थांबवून लोकाग्रहास्तव कार्यक्रम करावे लागले.

दिंडीतील कामाची तीन विभागात विभागणी केली होती.

प्रदर्शने, स्लाइड शो, उपकरणे. विषय : सामान्यपणे वापरात असणाऱ्या उपकरणांमागील तत्त्वे, ऊर्जा वापर (सूर्य शेगडी), आरोग्य, प्रदूषण वगैरे.

२) कलापथकाचे कार्यक्रम, गाणी, ग्रंथप्रदर्शन.

३) लोकभ्रम व त्या संदर्भात प्रयोग.

वरील सर्व कार्यक्रम वेळेअभावी एका दिवसात होणार नसल्याने तीन गाड्यांमध्ये यात्राविभाजन केले गेले होते. म्हणून तीन दिवस कार्यक्रम प्रत्येक गावात झाले. या तीन गाड्यांत तीन जथे होते. त्यांनी खालील-प्रमाणे कार्यक्रम केले—

**जथा क्र.** १ गटप्रमुख बी. प्रेमानंद. हे इंडियन रॅशनॅलिस्ट असोसिएशनचे सहकार्यवाह आहेत. त्यांनी लोकभ्रम निर्मूलनाचे विविध प्रयोग केले. उदा. जळत्या निखाऱ्यांवरून चालणे (प्रत्येक गावात विशेष म्हणजे निदान १५ स्थानिक लोक सुद्धा निखाऱ्यांवरून चालले), आग अंगावर व तोंडात घेणे व हवेतून अंगारा निर्माण करणे, तोंडातून शिवलिंग काढणे, सुया टोचून घेणे, हुक लावून रथ ओढणे वगैरे अनेक कार्यक्रम केले व त्यामागील शास्त्रीय तत्त्वे समजावून सांगितली. 'कोणताही (अतिमानवी) चमत्कार करणाऱ्याला एक लाख रुपये' देण्याचे जाहीर आव्हान डॉ. कोवूर यांनी दिले होते. त्यांच्या मृत्यूनंतर आता प्रेमानंद यांनी ते आव्हान पुढे चालू ठेवले आहे. तसेच ठिकठिकाणी कार्यकर्त्यांची वैज्ञानिक गाणी—भाषणे होत; दोनमिनिटात समोर बसलेला समुदाय स्वत: कोरसमध्ये वैज्ञानिक गाणी म्हणायचा. यावरून विज्ञानासंबंधी लोकांत आवड व जाण आहे हे लक्षात येते.

**जथा क्र.** २ गटप्रमुख अरुण देशपांडे. जथा क्र. १ गावात पोहोचल्यावर बरोबर २४ तासांनी जथा क्र. २ पोहोचायचा. ह्यात 'अणुबॉम्ब हटाव, मानव बचाव', ऊर्जा-समस्या ही पोस्टरप्रदर्शने होती. तसेच पाणी आणि माती यांचे शास्त्रीय नियोजन, वापर व माहिती यासंबंधी स्लाइड—शो होते. त्यात १) कोरडवाहू शेती-तंत्र, २) इस्रायलमधील आधुनिक सिंचनपद्धती, ३) जायकवाडी प्रकल्पाच्या सिंचनक्षेत्रामधील सिंचनाचे मूल्यमापन, ४) खडक व भूगर्भातील पाणी, ५) जंगल व आदिवासी ह्या स्लाईड—शोज प्रामुख्याने होत्या. सोलर कुकर, वातीचा सुधारित स्टोव्ह, फेनेल लेन्स, अग्नि-प्रतिबंधक झोपडी ह्यांची मॉडेल्स होती. सोलर कुकर-वर तर पंधरा गावात शेकडो शेतकऱ्यांनी अर्धा किलो भात अर्ध्या तासात झालेला पाहिला व त्या संदर्भात कार्यकर्त्यांशी चर्चा करून शंका निरसन करून घेतले.

या कार्यक्रमात जी व्याख्याने झाली, त्यात प्रामुख्याने शेतीमधील ऊर्जा—समस्या, दुष्काळावर मात, अणुशक्ती हे विषय होते. ह्या सर्व कार्यक्रमात जाणवणारा भाग


शुभेच्छा

मे. आनंद ट्रेडिंग कंपनी

जालना

म्हणजे लोकांशी झालेली प्रश्नोत्तरे, चर्चा. व्याख्यानातील सर्वच मुद्दे विचार करायला लावत असत. चर्चेतून पुढे आलेले मुद्दे खालीलप्रमाणे–

१) **शेतीमधील ऊर्जासमस्या :** आपल्याकडील जमीन काळी आहे. नांगरण्यासाठी जास्त शक्ती लागते. जमिनीमध्ये जास्त सेंद्रिय पदार्थ असले पाहिजेत, पोत सुधारला पाहिजे म्हणजे मशागतीला कमी ताकद लागेल. माणसांची ताकद आपण शेतीसाठी वापरतो, ती साधारण वजनाच्या १/१० एवढी असते. त्यासाठी सुदृढ शेतमजूर पाहिजेत. त्यासाठी त्यांना पोषक व चौरस आहार पाहिजे. माणसांच्या हातातील औजारे चांगली पाहिजेत. त्यांची धार टिकाऊ व चांगल्या प्रकारच्या पोलादापासून बनविली पाहिजेत. हत्यारे वापरताना कमी शक्तीत जास्त काम कसे होईल याचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास होऊन त्या प्रकारची हत्यारे बनवली पाहिजेत. ट्रॅक्टर आपल्याला फार उपयुक्त नाहीत. बैलशक्ती सर्वात उपयुक्त. एक बैलजोडी = १ हॉर्सपॉवर. काही क्षणापुरती बैलजोडी १८ हॉर्सपॉवर निर्माण करते. हे साधण्यासाठी ट्रॅक्टरला प्रचंड मोठे गियरबॉक्स लागतात, शक्ती वाया जाते. प्रत्यक्ष वापरता येईल इतकी ब्रेक हॉर्सपॉवर किती हे ट्रॅक्टरनिर्माते सांगत नाहीत. म्हणून सुयोग्य तंत्र नाही. आपल्याला चांगले बैल पैदास केले पाहिजेत; पण सध्या मांसाला भाव मिळतो म्हणून तरुण बैलसुद्धा कापले जात आहेत.

२) दुष्काळावर मात करणे शक्य आहे. महाराष्ट्रावर पडणारा खात्रीचा पाऊस आहे. त्यावर सर्व शेतीची तहान भागू शकते; पण पाणीपुरवठ्याच्या आधुनिक तंत्राचा वापर केला पाहिजे. पाणी मोजून दिले पाहिजे. तसे न दिल्यामुळे सिंचनाखालील जमीन लागवडीला अयोग्य बनत आहे. १९२० ते १९५५ ह्या काळात ६० हजार एकर जमीन मीठफुटीमुळे नापीक झाली. शेती म्हणजे सूर्यशक्तीचे अन्नशक्तीमध्ये रूपांतर. महाराष्ट्रात याची कार्यक्षमता फार कमी आहे. ती वाढवली पाहिजे. पाण्याचे नियोजन शास्त्रीय पद्धतीने झाले पाहिजे. उतारावर कुरणे व जंगले असली पाहिजेत. दुष्काळनिर्मूलन म्हणजे सर्व शेतकऱ्यांना खात्रीच्या पाण्यामध्ये वाटा मिळणे.

भूगर्भातील पाणी वाटेल तसे उपसता कामा नये. ह्या पाण्याच्या वापरावर कडक निर्बंध हवेत. भूगर्भातील पाण्याचा साठा कसा वाढेल ह्याचा विचार हवा.

अशा चर्चाजिज्ञासेतून कार्यक्रम रात्री १२ वाजेपर्यंत चालायचा.

**जथा क्र. ३** गटप्रमुख श्री. श्री. न. गुत्तीकर. यामध्ये पाणी आणि आरोग्य, पुरुष व स्त्री आरोग्य, जुलाब वगैरे पोस्टर–प्रदर्शने होती. औद्योगिक सुरक्षा, प्रदूषण यांच्या स्लाइड शो-होत्या. विज्ञान-ग्रंथ, पुस्तके, मासिके ह्यांचे प्रदर्शन व विक्री होत असे. ५ रु. पासून ४५ रु. पर्यंत किमतीची पुस्तके होती.

अशा प्रकारे तिसरा जथा २४ तासांनी, दुसऱ्या जथ्यानंतर पोचत असे. ठिकठिकाणी विज्ञानयात्रा-समितीतर्फे गावातील वैज्ञानिकांचे सत्कार होत असत. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध मॉडेल्सचे प्रदर्शन होत असे. लातूर या गावी तर विज्ञानप्रदर्शन ३०,००० लोकांनी पाहिल्याची नोंद आहे. प्रेमानंद यांच्या कार्यक्रमाला कमीत कमी ५००० लोकांचा समुदाय असे. जथा क्र. ३ मधील औद्योगिक कामगारांची सुरक्षितता हा स्लाइड–शो बघून तर आपण काम कसे करतो, आपली ऊठबस कशी असते, आवाजाचे, हवेचे प्रदूषण या संबंधी शास्त्रीय विश्लेषण ऐकून समुदाय आश्चर्यचकित होत. शरीर व त्याचे अवयव चांगले राहायचे असतील तर काय टाळले पाहिजे हे लोकांनी समजावून घेतले.

या जथ्या बरोबर नेहरू सेंटरची एक मोटर होती. खगोलशास्त्र व त्यासंबंधी स्लाइड–शो, फिल्मस्, दुर्बिणी वगैरे होत्या. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा व विज्ञानाचा प्रसार करण्याची गरज काय आहे ?

परिस्थितीने माणूस हरवत बसतो, असहाय्य बनतो. स्वतः समोरच्या प्रश्नापासून सुटका मिळवण्यासाठी काहीही उपाय करतो; परंतु त्याचबरोबर परिस्थितीने डगमगून न जाता सर्व संकटांना, प्रश्नांना सामोरे जाऊन, बुद्धीचा वापर करून प्रश्नांची उत्तरे मिळवणारा माणूसच असतो, हे विसरता येत नाही. माणसाची ही दुसरी प्रवृत्ती विज्ञानामध्ये स्पष्ट दिसून येते. विज्ञानाचा प्रसारही त्यामुळे धीर देणारी गोष्ट ठरते.

यात्रेमधील कार्यक्रम पाहिले तर हे लक्षात येईल की भ्रामक समजुती नष्ट करणारी प्रात्यक्षिके त्यात होती. त्याचप्रमाणे विज्ञानाची शक्ती स्पष्ट करणारे कार्यक्रम त्यामध्ये होते. अशा कार्यक्रमांच्या जोडीनेच या वाढत्या शक्तीबरोबर जो विवेक बाळगायला हवा त्याचे स्मरण देणारे कार्यक्रम त्यात होते. आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञाना-

द्वारे चालणाऱ्या फसवेगिरीवर प्रहार करणाऱ्या कार्यक्रमांच्या जोडीने ऊर्जासमस्येसारख्या अतिशय जिव्हाळ्याचा विषय, सर्वसामान्य माणसाला स्पष्ट करून सांगण्याचा प्रदर्शनाच्या यात्रेत समावेश होता.

अशा तऱ्हेने सर्वसामान्य माणसाला विज्ञानाची ताकद ही त्याच्यासाठी आहे असे प्रतीत व्हावे यासाठी सुयोग्य तंत्रज्ञान तर विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागावी यासाठी विज्ञानशिक्षणातील प्रयोग असे विविध विषय हाताळले होते.

ह्या विज्ञानदिंडीच्या झालेल्या सर्व कार्यक्रमांचा समारोपसमारंभ टिळक स्मारक मंदीर, पुणे, येथे दि. २५ ऑक्टोबरला झाला.

ह्या विज्ञानयात्रेचे यश हे प्रत्येक गावात स्थापन झालेल्या स्वागतसमितीच्या कार्यकर्त्यांकडे जाते. प्रत्येक गावात सरासरी २० ते २५ कार्यकर्ते अहोरात्र राबत होते. त्यांनीच त्या त्या गावात विज्ञानप्रेमी माणसाच्या मार्फत कार्यक्रम केले.

सातत्याने यापुढे असे कार्यक्रम प्रत्येक गावात झाले पाहिजेत. लोकांना अनेक माध्यमांमार्फत विज्ञाननिष्ट केले पाहिजे.

महाराष्ट्राच्या १२ जिल्ह्यांतून ही जी अभिनव प्रचंड उत्स्फूर्त अशी विज्ञानदिंडी निघाली होती, ती आजच्या विज्ञानयुगाकडे व समाजाकडे शास्त्रीय दृष्टिकोनातून बघण्याची सुरुवात असेल काय ?


**( लोकविज्ञान संघटना**
**१२५९।२, जं. म. रस्ता,**
**पुणे–४. )**


## शुभेच्छा

# मे. हीरालाल मन्नालाल सराफ

**जालना**

# ‘ आम्ही असेच बुडीत जायचो ऽऽ ’



**कुसुम**

**आंबेगावच्या बाजाराला गेलो होतो. आठवडचाचा बाजार. किराणा माल, कपडे, कापड–चोपड, भाजी, गुडदाणी, चिक्की, चिवडा, टोपल्या, पाट्या, घोंगडचा, घायपाताचे दोर आणि त्यातच जाणवला काळा नासका गूळ !**

आंबेगाव म्हणजे जुनं तालुक्याचं ठिकाण. पूर्वी सावकार–मारवाडचांचं वर्चस्व असलेला गाव. पहाटे उठून चालत निघून १०–११ वाजता बाजाराला पोचतील इतक्या दूरदूरच्या गावातल्या लोकांनाही याच बाजारावर अवलबून रहावे लागते. लोक घरून कोंबडचा, अंडी, मध, तांदूळ, नाचणी, क्वचित् एखादं बकरू–कोकरू विकायला घेऊन येतात आणि त्या पैशातून हवी ती खरेदी करून जातात. बाया डोक्यावर टोपल्या, हातात तेलाची बाटली, एखादी कोंबडी घेऊन शक्यतो बरं लुगडं लेऊन आल्या होत्या. त्यांच्या मालाला कमीत कमी किंमत; पण दुकानातल्या वस्तूचे भाव दिढी–चढीचे.

आंबेगावावरून पुढे वचप्याला निघालो. भात कापून झाले होते. शेते ओस होती. क्वचित् काही ठिकाणी नदीवरून पाणी उचलून बागायत दिसत होती. बटाटा, भुईमूग, फरशीच्या शेंगा अशी लागवड दिसत होती. शेतात खुरपणी चालली होती. म्हणून गप्पा मारायला थांबलो. हवापाण्याच्या–पीकपाण्याच्या गप्पा सुरू झाल्या. यंदा भलत्या वेळेला पाऊस पडला. भाताचं पीक निम्म्यावर आलं. आता बटाटा लावलाय. बघूया कसं होतंय. धरणाचा विषय काढल्यावर धन्याच्या चेहऱ्यावरचं हसू पुसलं, चिंता स्पष्ट दिसायला लागली. ‘ बाई, तुम्ही माहिती गोळा करणार का ? आम्हाला काही मदत करणार का ? मागं गोदाबाईंनी इथे एक सभा घेतली होती. तसं काही होणार का ?’ मला उत्तर देणं कठीण होतं. बरोबर फारसे कार्यकर्ते नाहीत. या भागात नवीनच काम सुरू केलेलं, शिवाय आपली ताकद लहान हे ओळखून एवढचा मोठचा प्रश्नाला आपण हात लावू शकत नाही हे जाणून मी हताश; पण तरी या भागाचा प्रश्न जळता आहे. मानवी जीवनावर अन्याय, अत्याचाराची दुष्ट सावली स्पष्ट पडली आहे आणि आम्ही अपुरे आहोत. निदान प्रश्नाचं गांभीर्य जाणवून घ्यावे या हेतूने हिंडायला निघालो होतो.

धनी दु:खद मनाने सांगत होता, ‘ लई मेहनत करून हे शेत बांधलंय. पंप बसवलाय. आता झाली सहा वर्षं; पण हे सारं धरणात जायचंय. नुकसान–भरपाई मिळणार जिरायतच्या भावानं. आम्हाला काय कायदे–कानू कळतायत का ? आम्ही असेच मोडीत निघायचो ! बाई, काही तरी करा, लई अन्याय माजलाय !’

वचप्याच्या वाटेने चाललो होतो. वाटेत झाडाझुडुपाच्या आडोश्याने माणसे जमलेली दिसायची, ओढचाच्या कडेकडेने. एकदोन वेळेला त्यांनी आम्हालाही बोलावले. एकनाथने सांगितले–‘ लक्ष देऊ नको. दारूचे अड्डे आहेत ते. तुझी पँट-कुरता बघून तुला ते दुरून पुरुष समजून हाक मारतायत, दारू प्यायला.’ इतक्या मुक्तपणे दारू इथे ! मनात एक प्रश्नचिन्ह उमटले, मनाला विळखा घालून बसले.

गावात भेटतील त्यांच्याशी, रस्त्यात भेटतील त्यांच्याशी गप्पा मारत होते. लोकं सांगत होती. धरण पुरं झालं की, पाखरांसारखी दाही दिशेला माणसं पांगतील. मग कुठचा कोण आणि कुठचा कोण. घरंदारं जातील. जी नुकसान–भरपाई मिळेल त्याच्यात पालं टाकून रहायची वेळ येईल. जमिनीची किंमत मिळून काय उपयोग, दहा एकराच्या पैशात बाहेर दहा गुंठे-सुद्धा भेटायचे नाहीत. रात्री आम्हाला झोप येत नाही. दारू वाढेल नाही तर काय होईल. घरधन्यानं कशाच्या आधारावर जगायचं ? उद्याचं काय ?

पुणे–नासिक राष्ट्रीय महामार्गावर मंचरपासून पश्चिमेला रस्ता वळतो. तो सरळ आंबेगावला आणि एक फाटा जरा दक्षिणेला वळून मग घाट चढून भीमाशंकराकडे जातो. या रस्त्यावर मंचरपासून २५ कि.मि. वर डिंभ्याला धरणाचे काम सुरू आहे. घोडनदीला धरण बांधून आंबेगाव, शिरूर, जुन्नर या तालुक्यातील काही जमीन या धरणाच्या डाव्या, उजव्या कालव्याच्या पाण्याखाली 'सुजलाम्' व्हायच्या आहेत. एकूण ३५४०० हेक्टर क्षेत्र भिजणार आहे. कुकडी प्रकल्पातील पाच धरणांच्या गुंफणीतलं हे एक धरण आहे. या धरणाची पहिली सुधारित किंमत १८०५ लाख रुपयांवरून ८० सालातच ५५२० लाखांवर गेली होती. त्यानंतर झालेली सिमेंट, लोखंड वगैरेची भाववाढ लक्षात घेता याचा आकडा नक्कीच आणखी एक घर वाढवणार असे दिसते. सध्या धरणाचे काम काही अंशी झाले आहे. गती मंद आहे. ७८ ते ८७ या वर्षात धरण बांधून व्हावे ही मूळ अपेक्षा आहे. निम्म्या वर्षात काम मात्र निम्म्याच्या निम्म्यावर आहे.

या धरणाखाली आंबेगावसहित १२ गावे बुडणार आहेत. आणखी दहा गावे अंशतः ग्रस्त होणार आहेत आणि पलीकडच्या तीरावर रहातील ती गावे इतर भागापासून तुटणार आहेत, एकाकी पडणार आहेत. एकूण २२०२ हेक्टर क्षेत्र प्रत्यक्ष पाण्याखाली जाणार आहे. बुडणारा एक हेक्टर १६ हेक्टरला पाणी पुरवणार असे प्रमाण निघते आहे ६८२४ लोक विस्थापित होणार आहेत. आंबेगाव तालुक्याचा पश्चिम भाग दुःखात बुडतो आहे, तर पूर्व भाग आणि शिरूर तालुक्याच्या दुष्काळी भागावर भावी हिरवे हास्य जाणवू लागले आहे.

आंबेगाव तालुक्याचा पश्चिम भाग सह्याद्रीच्या वेडयावाकडया रांगांनी, दऱ्याखोऱ्यांनी व्यापलेला आहे दऱ्याखोऱ्यात, पठारावर छोटया वाडया, वस्त्यांवर आदिवासी गावे विखुरली आहेत. बहुधा व्यवहारापायीच होतो. बसची सोय फारशी नाही. भीमाशंकर हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक. या स्थानमहात्म्यामुळे आणि बाहेरच्या भक्तमहात्म्यामुळे हा रस्ता बारमाही चालू रहातो. बाकीच्या भागासाठी रस्ते असण्याची गरजच काय? काही गावे अलीकडच्या काळात रस्त्यांनी जोडली गेली आहेत नाही म्हणायला. पंधरा–सतरा वर्षांपूर्वी हाही रस्ता नव्हता, आणि त्यामुळे इथले आदिवासी-जीवन आणि इथले घनदाट जंगल, त्यात रहाणारे प्राणी, पक्षी सारे सुरक्षित होते; पण हा रस्ता झाला आणि कोळसा पाडणाऱ्या कंत्राटदारांच्या लोभी, हावरट नजरा इकडे वळल्या. आज ७०० एकरांची देवराई सोडली तर जंगल असं उरलंच नाही. ही देवराईही इथल्या आदिवासींच्या देवाच्या कोपाच्या भीतीने टिकली. बाकी झाडांचा सत्यानाश झाला. बाकी या कंत्राटदारांना तरी कशाला दोष द्या ! कोळसा वापरणारी शहरातली शहाणीसुरती, शिकलेली मंडळी 'हा कोळसा कुठून आला?' याचा विचार करत नाहीत, सरकारी अधिकारी 'तुटणाऱ्या जंगलाचा किती पैसा माझ्या घरात येणार' या परता दुसरा विचार करत नाहीत, तोपर्यंत हे असेच चालणार.

या भागात सरकरी सेवा, सोयी अभावानेच आहेत. दवाखाने, डॉक्टर्स, नर्सेस यांना हा भाग म्हणजे काळ्या पाण्याची शिक्षा असते. शिक्षणाच्या सोयी फारशा नाहीत. आहेत त्या नीट चालत नाहीत. आतल्या भागात शिक्षक मिळत नाहीत, मिळाले तर काम करतीलच अशी खात्री नाही, त्यांनी काम करावे अशी परिस्थिती नाही, अपेक्षाही नाही–अधिकाऱ्यांची वा गावकऱ्यांची !

येथे साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. १५% पासून ६०% पर्यंत हे प्रमाण आहे. बाहेर जाण्याच्या सोयीही नाहीत, पैसाही नाही. त्यामुळे एकाकीपणाने जगण्यासारखी येथे परिस्थिती असते. जगात काय घडते आहे याचा पत्ताही येथे नसतो. सरकारी पातळीवर ज्या योजना आखल्या जातात, त्यात लोकांचा सहभाग मुळीच नसतो. धरण होणार आहे–गावे पाण्याखाली बुडणार आहेत, अभयारण्य होणार आहे–गावे उठणार आहेत, पर्यटनकेंद्र होणार आहे–भागाची शांतता,

संस्कृती सारं धोक्यात येणार आहे, या बातम्यांनी इथली माणसं भयभीत होतात; पण त्यांची भूमिका हताशपणाची असते. पावसाने झोडपले आणि नवऱ्याने मारले तर काय करणार अशी असते.

अशा भागात नव्या योजना आणतांना—कल्याणकारी राज्यात सरकारवर ही जबाबदारी असते की लोकांवर अन्याय तर नाहीच होता कामा; पण त्यांना न्याय मिळाला पाहिजे. एखाद्या भागातील सर्व लोक जेव्हा विस्थापित केले जातात तेव्हा त्यांना योग्य नुकसान-भरपाई तर द्यायलाच हवी. शिवाय त्यांचे नेहमीचे उद्योगधंदे करून उपजीविका करण्यासाठी त्यांना सर्वतोपरी सहाय्य करायला हवे. धरण—विस्थापितांसंबंधीचे कायदे प्रत्यक्षात बघितले की स्पष्ट लक्षात येते की, अशा भागात असलेली मागास, निरक्षर जनता लक्षात न घेता हे कायदे बनवले आणि राबवले जातात. शिकल्या-सवरल्या माणसाला चारी मुंडे चीत करणारे हे कायदे जेव्हा सरकारी अधिकारी स्वतःच्या फायद्याच्या दृष्टीने वापरतांना येथे दिसतात तेव्हा अन्यायाला, बेपर्वा क्रौर्याची जोड मिळते. तलाठी हे यातलं जाणवणारं हिमनगाचं टोकसुद्धा किती भयानक आहे हे पाहिले की बाकीच्या विषयी मन बधिर होते. भाताचे एक खाचर बांधबंदिस्ती करून तयार करण्यात एकेक पिढी खर्च होते; पण त्याच्या नुकसानभरपाईची किंमत ठरवणारे कायदे असंबद्ध गोष्टींवर आधारित आहेत. घरांची किंमत ठरवतांना या माणसांना इथून दुसरीकडे जाऊन घर बांधायचे आहे हे कधीच लक्षात घेतले जात नाही. या घराला २०—३० वर्षांपूर्वी किती खर्च आला होता याचा नवीन घर बांधताना काय संदर्भ असतो ? पण कमीत कमी नुकसानभरपाई ठरवणारे अधिकारी कुशल ठरवले जात असावेत.

सह्याद्रीच्या कुशीत अशी धरणांची माळच्या माळ तयार होत आहे. दक्षिणेला कोयनेपासून ही रांग सुरू होते. त्यात नवीन नवीन धरणांची भर पडते आहे. पानशेत, पवना या पूर्ण झालेल्या धरणांचा परिसर मन खिन्न बनवतो. खेड तालुक्यात चासकमान, आंबेगावला डिंभा, जुन्नरला माणिकडोह, पिंपळगाव—जोगे, येडगाव अशी काही धरणे चालू आहेत, काही व्हायला घातली आहेत. कोयना धरण सोडले तर कोणतेच धरण विद्युतनिर्मितीसाठी नाही. सारी जलसिंचनासाठी आहेत.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या जोरावर विकासाच्या दिशेने टाकलेले प्रत्येक पाऊल योग्यच आहे असा एक विश्वास निर्माण झाला आहे आणि हा विकास आर्थिक आणि सामाजिक न्याय आणि समतेच्या दिशेने आपल्याला नेईल असा एक भाबडा आशावादही बऱ्याच जणांच्या मनात आहे; पण हे एक मृगजळ आहे. उलट यातून निवडक थोड्यांकडे विपुलता आणि बहुसंख्यांना दारिद्र्यच मिळते आहे. धरणग्रस्त विस्थापितांना सरकार आपणहून न्याय देईल हे मृगजळ ठरले आहे. हे आश्रयहीन लोक आपापले मार्ग शोधतील. यातून भूमिहीन स्वस्त मजूर निर्माण होतील. जे आज बऱ्या परिस्थितीत आहेत ते त्यांची व्यवस्था करतील; पण बहुसंख्य लोक या भागातून बाहेर पडणार नाहीत. बाहेर त्यांना जमीनही मिळणार नाही, रहाण्याची घरे परवडणार नाहीत, बाहेरच्या पीकपाण्याची निगराणी त्यांना जमणार नाही, त्यांची गुरे, अवजारे बाहेर कुचकामी ठरतील. शिवाय सिंचित क्षेत्रात फारशी जमीन सरकारला संपादित करता येणार नाही. सिलिंगचा कायदा कितीही घट्ट केला तरी पूर्वभागातील वातावरण जागृत आहे. खातेफोडी जलद गतीने केल्या जातात. सरकारी नोकरांचे उखळही पांढरे होते आहे आणि जमिनीही वाचवून मिळतायत. त्यातून काही धरणग्रस्त तेथे आलेच तर ते बहिष्कृत राहतील आणि शेवटी निघून जातील किंवा पराभूत होऊन मजूर बनतील. बहुसंख्य लोक धरणाच्या कडेने डोंगरावर चढतील.

हे डोंगरावर चढलेले लोक उपजीविकेसाठी, शेतीसाठी नवीन जमीन तयार करतील. तेथे असलेले म्हणजे आतापर्यंत वाचलेले जंगल तोडतील. आजुबाजूचे सारे डोंगर उघडेबोडके होतील. आताही पाणबुडीच्या क्षेत्रातील झाडे कायदेशीरपणे तुटत आहेत. या तोडीच्या परवान्याचा गैरवापर करून कंत्राटदार अगोदर वरची मिळतील ती झाडे तोडत आहेत. या धरणाच्या आजूबाजूला अजूनही बरेच जंगल आहे; पण लोक जीवितरक्षणासाठी हे जंगल टिकवू शकणार नाहीत. या भागातील जंगल तुटणे आणि तेथे लागवडीची जमीन निर्माण होणे हे संकट अटळ आहे. याचे गांभीर्य लक्षात घ्यायची गरज कोणालाच वाटत नाहीये. १५० ते २५० इंच पाऊस जेव्हा या छत्रहीन उघड्याबोडक्या जमिनीवर कोसळेल तेव्हा तो अनर्थ करील ! डोंगरावरची सारी माती नदीत म्हणजे पर्यायाने धरणात येऊन साठेल. धरणाचे आयुष्य त्याने निम्म्याहून कमी होऊ शकते. गाळ भरत गेलेल्या धरणाने सिंचित

क्षेत्र झपाट्याने कमी होईल.पर्यावरणाचे नुकसान कायमचे होईल. अशा प्रकारच्या हवामानात, धूप झालेल्या जमिनीत जंगल परत निर्माण करता येत नाही हा इतर ठिकाणचा अनुभव लक्षात घेता हे नुकसान कायमचे होणार आहे. जंगल ही एक अद्वितीय रचना असते. त्यातील वृक्षलता एकमेकांना आधार देत असतात त्यांवर प्राणी, पक्षी, कीटक, जिवाणूसृष्टी जगत असते आणि या जंगलाला जगवत असते. हे सारे एकदा नष्ट झाले तर परत निर्माण करणे निव्वळ अशक्य आणि अफाट खर्चाचे काम आहे. उघडा-बोडका होत जाणारा सह्याद्री हा महाराष्ट्राला एक कायमचा शाप बनणार आहे ! मानवनिर्मित वाळवंट तयार होणार !

निसर्गातली साधनसंपत्ती वापरून त्यावर मानवी जीवन सुखमय करावे हा विचार टोकाला जातो आहे. ही साधनसंपत्ती हावरटपणाने संपवून टाकली तर पुढच्या पिढीला आपण काय उत्तर देणार आहोत ? जंगलाबरोबर येथील वृक्षवल्लरींची, प्राणीजीवनाची विविधता आपण कायमची गमावणार आहोत. भीमाशंकर आहुपे याच्या जवळपासच्या जंगलात आज खूप अमूल्य वनस्पती, दुर्मिळ प्राणी आहेत. या वनस्पतीत औषधी वनस्पतींचे प्रमाण बरेच आहे आणि हे सारे धोक्यात आहे.

धरणाचे बांधकाम चालू आहे. लांबून सोलापूर, नगर, आंध्र येथून मजूरकुटुंबे येथे येतात. तात्पुरती पालं टाकतात, उन्हातान्हात काम करतात, तान्ही मुलं घरात टाकून मोठ्या मुलांना त्यांच्या राखणीला ठेवतात, काम करण्याजोगी मुले धरणावर मजुरी करतात. मुलांचे शिक्षण हा प्रश्नच उद्भवत नाही. पाणी मिळत नसले तरी दारू भरपूर मिळते ! कोणत्याही प्रकारची सुरक्षितता नाही. हंगामी मजुरी, काम नसले तर कंत्राटदार-सरकार कोणाचीच जबाबदारी काही नसते. हे मजूर भारताची तीर्थक्षेत्रे बांधत आहेत. त्यांच्या पायात त्यांचेच बळी जात आहेत. अधिकाऱ्यांच्या सोई बघणारे अधिकारी या मजुरांना माणसे समजत नसावेत.

हे मजूर काय किंवा विस्थापित होणारे आदिवासी काय हे बळी आहेत आणि हे बळी गेले तर कोणाचेच काही म्हणणे नाही. त्यांच्या जिवावर पुढचे मनोरे रचले जाताहेत. हे मनोरे ढासळते मनोरे आहेत हेही कोणी लक्षात घेत नाहीये. या बळींचे आक्रंदन कोणाच्या कानावर जाणार आहे !!! ■


शुभेच्छा

मे. राधाकिसन मोहनलाल पित्ती

जालना

पुस्तक परीक्षण

# 'जेव्हा माणूस माग काढतो.'

दिनानाथ मनोहर

महाराष्ट्रात आणि इतरही काही प्रदेशात गेल्या सात-आठ वर्षांपासून अनेक तरुण कार्यकर्ते, ग्रामीण व्यवस्थेतील कुंठित अवस्थेत परिवर्तन आणण्यासाठी ग्रामीण जीवनाला आधुनिकीकरणाची दिशा मिळावी, म्हणून वेगवेगळ्या संस्थांतर्फे, संघटनांतर्फे कार्य करीत आहेत.

मागासलेल्या शेतीव्यवस्थेत फसलेल्या गरीब, मध्यम शेतकऱ्यांना आधुनिक शेतीतंत्र, साधने व आर्थिक सहाय्य देऊन विकास करण्यावर ह्यातील कित्येक कार्यकर्त्यांचा भर होता. कालान्तराने ह्या विकासकार्याच्या मर्यादा लक्षात आल्यावर सरंजामी रीतिरिवाज, दैववादी विचार ह्यांच्या जाळ्यात फसलेली कष्टकरी माणसाची जाणीव मुक्त करण्याशिवाय पर्याय नाही, हे विकासकार्य करणाऱ्या पण निष्ठावान कार्यकर्त्यांना जाणवले. आता ग्रामीण शोषितांमध्ये कार्य करणाऱ्या बहुतेक कार्यकर्त्यांनी प्रौढ शिक्षण, साक्षरता, जाणीव-जागृती, कार्यकर्ते प्रशिक्षण, सांस्कृतिक कार्यक्रम, वैद्यकीय मदत व सल्ला आणि शोषितांचेच संघटन अशा वेगवेगळ्या मार्गांनी, वेगवेगळ्या पातळ्यांवर, सर्वांगीण बदल घडवून आणण्यासाठी कार्य करण्याची गरज मान्य केली आहे. त्याप्रमाणे विकासकार्यावर भर देणाऱ्या ह्या कार्यकर्त्यांनी आपली कार्यपद्धतीदेखील बदलण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत.

दुसऱ्या बाजूला आर्थिक मागण्या, आर्थिक लढे आणि संघटनकार्य ह्यांवर भर देऊन काम करणाऱ्या, राजकीय बांधिलकी असणाऱ्या कार्यकर्त्यांनादेखील, साक्षरता, जाणीव-जागृती, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी अंगांनीही काम करण्याची आवश्यकता जाणवली आहे. गेल्या काही वर्षांत काही संघटनांनी, काही संस्थांनी प्रत्यक्ष प्रयोग करून, कार्यकर्ता-प्रशिक्षण, जाणीवजागृती, प्रौढ शिक्षण ह्या क्षेत्रांत नवनवीन प्रयोग करून नवीन पद्धती विकसित केल्या आहेत.

ग्रामीण जीवनाचे वेगळेपण हे आहे की, येथे कष्टकऱ्यांचे जीवन केवळ आर्थिक शोषणानेच नव्हे तर जातीय, धार्मिक, सांस्कृतिक रीतिरिवाजांनी आचार–विचारांनी, धर्मकल्पनांनी, अंधश्रद्धांनी आकारित केले आहे. ह्यामुळेच ग्रामीण कष्टकऱ्यांच्या जीवनात कुठल्याही पातळीवर बदल करण्याच्या उद्देशाने निर्माण झालेल्या प्रामाणिक संघर्षाला सर्वांगीण बनवण्याची वस्तुनिष्ठ आवश्यकता जाणवते.

अशा सर्वांगीण पातळीवर कार्य करणाऱ्या संस्थांसाठी, संघटनांसाठी, कार्यकर्त्यांसाठी 'माणूस जेव्हा माग काढतो' हे माहितीपुस्तक बहुमोल सल्लागाराचे काम करू शकते. नंदुरबार येथे काही आदिवासी खेड्यांत कार्य करणाऱ्या आणि वेगळ्या पद्धतीने छात्रालय चालवणाऱ्या काही कार्यकर्त्यांनी स्वतःच्या कार्यात गरज वाटली म्हणून ही माहिती संकलित करावयास सुरुवात केली. ह्या संकलित माहितीच्या आधारे त्यांनी प्रथम चक्रमुद्रित पुस्तिका तयार केली. या पुस्तिकेस इतर कार्यकर्त्यांनी जो प्रतिसाद दिला, त्यावर आपल्या ज्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या त्यातून उत्साह घेऊन, 'ट्रेस टीम' ने अधिक जाणीवपूर्वक, चिकाटीने आता हे नवीन पुस्तक तयार केले आणि इंग्लिश व मराठीत छापून काढले.

ग्रामीण भागात काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याने सतत जवळ बाळगले पाहिजे, असेच हे पुस्तक आहे.

ग्रामीण-शोषित युवकांमध्ये जाणीव-जागृती होऊन त्यांनी ग्रामीण जीवनाला नवे वळण देण्याची जबाबदारी स्वतःच्याच हाती घ्यावी ह्या हेतूने कशा प्रकारे प्रेरक नेतृत्व-प्रशिक्षण द्यावे, कार्यकर्ता प्रशिक्षण-शिबिरात आलेल्या तरुणांना खऱ्या अर्थाने शिबिरात सहभागी करण्यासाठी, त्यांना बोलते करण्यासाठी, त्यांच्यातील सुप्तशक्तीचा साक्षात्कार होऊन त्यांचा आत्मविश्वास जागृत करण्यासाठी, संघभावना निर्माण करण्यासाठी कोणत्या पद्धती योजाव्यात, कोणते खेळ घ्यावेत, शिबिरात सातत्याने जिवंतपणा कसा राखावा, ह्याबाबत अत्यन्त व्याहारिक पातळीवरील विवेचन ह्या पुस्तकात आहे. साक्षरता व प्रौढ शिक्षण ह्यांच्या **मागील तात्त्विक** भूमिका स्पष्ट करतानाच व्यवहाराच्या पातळीवरील तंत्रदेखील सरळ-सोप्या भाषेत सांगितले आहे. ह्याशिवाय कार्यकर्त्यांच्या माहितीसाठी वेगवेगवेगळ्या सरकारी खात्यांची रचना, त्यांची कामे, अधिकार, कष्टकरी जनतेस फायदेशीर होऊ शकतील अशा सरकारी योजना, सवलती व पुरोगामी कायदे ह्यांचीही सविस्तर माहिती देण्यात आली आहे. सामाजिक कार्य करणाऱ्या शोषितांच्या हक्कांसाठी झगडणाऱ्या कार्यकर्त्यांचा पोलीस व न्याय ह्या यंत्रणांशी संबंध येणे अटळ आहे. व्यक्तीचे लोकशाही हक्क कुठले, कायद्याने व्यक्तीला काय अधिकार दिले आहेत, पोलिसांना किती अधिकार आहेत, ह्याचीही माहिती पुस्तकात दिली आहेत. आपले शरीर, वेगवेगळे रोग, प्राथमिक व घरगुती औषधोपचार ह्यांविषयी उपयुक्त माहिती, लोकशिक्षणासाठी उपयुक्त असे स्लाईड-शोज्, फिल्म्स्, पुस्तके ह्यांची माहिती देऊन ह्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या वेगवेगळ्या संस्थांची सूचीही पुस्तकाच्या शेवटी दिलेली आहे.

निरनिराळ्या क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींच्या सहकार्याने तयार झालेले हे पुस्तक समाजकार्यकर्त्यांना, शाळांना, झोपडपट्ट्यांत, ग्रामीण भागात काम करणाऱ्या सर्वांनाच अत्यंत उपयुक्त आहे.

**संपर्क साधा**

ट्रेस टीम : जनसेवा मंडळ, कोरीट रोड, नंदुरबार. धुळे ४२५ ४१२ महाराष्ट्र.

देणगी मूल्य :

साधी बांधणी रु. १७–०० एक प्रत.

लायब्ररी आवृत्ती रु. २४–०० एक प्रत.

प्लॅस्टिक कव्हरसह रु. २ अधिक.

अधिक पोस्टेज व पाठवण्याचा खर्च.

२ व्ही. पी. ने ही पुस्तके पाठवली जातील.


शुभेच्छा

मे. जोशी ओमप्रकाश राधाकिसन

जालना

# ' सुगावा ' दशवर्ष–पूर्ती समारंभ

**धर्मराज निमसरूकर**
**आनंद साळवे**

**दलितांच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक चळवळीला वाहिलेल्या सुगावा मासिकाला ऑगस्ट ८२ मध्ये दहा वर्षे पूर्ण झाली. दलितांच्या सामाजिक आणि साहित्यिक चळवळीला वाहिलेल्या मासिकाने नेटाने दहा वर्षांचा प्रपंच केला** आणि समाजात प्रबोधन घडवून आणण्याच्या दृष्टीने मोलाची कामगिरी केल्यामुळे सुगावा मासिकाच्या चाहत्यांनी त्या मासिकाबद्दलचे प्रेम व्यक्त करण्यासाठी दशवार्षिकपूर्ति कार्यक्रम करण्याचे ठरविले.

हा कार्यक्रम १७ आक्टोबर १९८२ रोजी संपन्न करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये एक परिसंवाद आणि कविसंमेलन घेण्यात आले आणि सुगावा मासिकाचे संपादक विलास वाघ यांचा सत्कार करण्यात आला.

परिसंवादाचा विषय होता, 'दलितांची चळवळ सामाजिक आणि साहित्यिक.' या परिसंवादाच्या कार्यक्रमाला प्रा. डॉ. गंगाधर पानतावणे आणि श्री. बाबूराव बागूल उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दलित आमदार आमु. बाळ आल्हाट यांनी केले. परिसंवादाचे अध्यक्ष 'मुस्लीम सत्यशोधक समाजा'चे धडाडीचे श्री. सय्यदभाई होते. प्रा. वाघांनी प्रथम सुगावासंबंधी भूमिका मांडली. या संबंधात ते म्हणाले, 'पुण्यामध्ये दलितांच्या सामाजिक आणि साहित्यिक चळवळींना न्याय देण्यासाठी असे कोणतेच माध्यम नव्हते. सुगावाने ती उणीव भरून काढली आणि नवीन किंवा नवोदित दलित साहित्यिकांना एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले.' मासिक चालविताना–तेही दलित साहित्याला वाहिलेले–किती कठीण जाते हेही या वेळी त्यांनी स्पष्ट केले. वृत्तपत्रकारितेमध्ये दलित लेखकांचा पाहिजे तेवढा सहभाग दिसत नाही; परंतु हल्ली परिस्थिती बदलली आहे. दलित लेखक त्यामध्येसुद्धा हिरीरीने भाग घेताना दिसतात. आता भासणारी उणीव उद्या भरून निघेल आणि दलित लेखक प्रसिद्धीचे साधन आपल्या हातात घेतील अशी आशा वाटते !

आपल्या भाषणात वसंत जगताप यांनी आपला मुद्दा स्पष्ट करीत असताना दलित साहित्यावर असा आरोप केला की, दलित साहित्यावर अमेरिकेतील निग्रो साहित्याचा प्रभाव आहे. या आरोपाचा प्रा गंगाधर पाणतवणे यांनी भरपूर खरपूस समाचार घेतला. प्रा. बाबुराव बागूल म्हणाले, " सुगावा मासिकाचे संपादक विलास वाघ विधायक काम करतात. संख्यात्मक आणि गुणात्मक कामाकडे त्यांचा ओढा आहे. हे करीत असताना ते प्रसिद्धीपासून दूर राहतात. त्यांच्या या कार्याचा गौरव करण्यासाठी आज मी येथे आलो आहे.' पुढे त्यांनी आपल्या भाषणात मुद्द स्पष्ट करीत असताना असं सांगितलं की, या देशावर सुलतानांनी ७०० वर्षं राज्य केले. मुसलमान समाज हा वर्णसमाज आहे. तरी येथील अस्पृश्यता गेली नाही, ब्रिटिशांनी १५० वर्षे राज्य केले तरी येथली अस्पृश्यता गेली नाही. हाही समाज वर्गसमाज होता. तरी वर्गसमाजाची अधिसत्ता संपूर्ण देशावर असताना ह्या राज्यकर्त्यांना तो समाज आपल्या वर्गात का आणता आला नाही ? कारण तो येथला ८० टक्के दलित समाज होता. त्याला एकसंध कधी होऊ न देण्याचा येथला उच्चवर्णीय १० टक्के समाज नेटाने प्रयत्न करीत होता. ८० टक्के समाजाचे कोणत्याच मुद्द्यावर एकमत होणार नाही आणि ते नेहमीसाठी आपसात भांडत राहतील अशी व्यवस्था येथल्या या २० टक्के मंडळींनी केली होती. त्यामुळे या देशात वर्गसमाज त्यांना निर्माण करता आला नाही.

दलित लोकांमध्ये शिक्षणामुळे फार मोठी क्रांती झाली. आंबेडकरांच्या प्रेरणेमुळे त्यांनी घृणास्पद काम करण्याचे सोडून नोकऱ्या करण्याचे अंगीकारिले. त्यांच्यात विचाराचं नवचैतन्य निर्माण करण्याचं काम बौद्धधर्म स्वीकारल्यामुळं झालं. बौद्धधर्माने त्यांच्या विचारात फार मोठी प्रगती केली. त्यांचेमध्ये वर्गांतराची भावना प्रबळ होऊ लागली. दुसरी गोष्ट म्हणजे शिक्षणामुळे आणि औद्योगिक क्रांतीमुळे त्यांचे जीवन सुस्थिर होऊन संपन्न होऊ लागले तरी त्यांच्यावरील सामाजिक अन्याय-अत्याचार अजून संपले नाहीत. असुरक्षिततेची भावना अजूनही त्यांचे मनात घर करून आहे. दिवसेंदिवस वाढत जाणारे अत्याचार पाहून आपल्याला सामाजिक न्याय कुठे मिळेल हा विचार त्यांच्या मनात येऊ लागला आणि त्यामुळे ज्या धर्मात अशा प्रकारची शाश्वती मिळेल तिकडे धाव घेण्याची प्रवृत्ती त्यांचेमध्ये बोकाळू लागली आहे. म्हणजे त्यांचेमध्ये धर्मांतराची प्रवृत्ती वाढीस लागली आहे.

प्रा. पानतावणे आपल्या भाषणात म्हणाले,

नियतकालिकांमध्ये सक्रिय कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना मी मानतो. तसेच प्रा. विलास वाघ नियतकालिकाच्या माध्यमात काम करणारे आहेत. दलितांचे नियतकालिक ही एक चळवळच असते. ह्यामधून चळवळीची वावटळ निर्माण करता येते. विचारांना दूर दूर पोचवता येते. चळवळीला पोसणारे विचार असतात आणि आंबेडकरी चळवळीला पोसणारे विचार अशा प्रकारच्या नियतकालिकांतून जनतेपर्यंत पोचतात आणि समाजप्रबोधनाचे काम जोरात चालते. येनयुगाने माणसाला विचार करण्याची शक्ती दिली आहे. तरी पण माणसांचे प्रश्न अजून सुटले नाहीत. प्रश्न तसेच आहेत. म्हणजे येनयुगाने जो विचार दिला तो विचार येथली सामाजिक चौकट उध्वस्त करण्यास पोषक ठरला नाही. उलट आंबेडकरी विचारपद्धती ही येथली सामाजिक चौकट खिळखिळी करण्यास समर्थ आहे हे अजून आमच्या काही मित्रांना कळलेले नाही,

पुढे ते असे म्हणाले की, आंबेडकर ही व्यक्ती राहिली नसून ती चळवळ झाली आहे आणि हा विचार घेऊन लिहिणारे दलित साहित्यिक म्हणजे एक समर्थ चळवळच आहे. कोणताही नवविचार जेव्हा समाजात येतो तेव्हा तो समाज ढवळून निघतो. आंबेडकरी विचारांनीसुद्धा येथल्या समाजव्यवस्थेला असेच मोठे धक्के दिले


शुभेच्छा

मे. दीपाली मल्टी सर्व्हिसेस्

जालना

आहेत. सामाजिक विचार जेवढा म. फुल्यांच्या काळात झाला नाही तेवढा डॉ. आंबेडकरांच्यामुळे येथे सुरू झाला आहे. जे सामाजिक अभिसरण या समाजात सुरू झाले त्यामुळे उच्चवर्णीयांच्या हितसंबंधांना बाधा येऊ लागली. त्यामुळे अस्पृश्य समाजाच्या संघटित होण्याच्या प्रवृत्तीस गांधींपासून जाणीवपूर्वक विरोधी हल्ले व्हायला लागले, गांधींपासून यशवंतराव चव्हाणांपर्यंत हे प्रयत्न सातत्याने चालले होते. हा समाज विघटित झाला म्हणजे आपल्या राजकीय ईप्सितासाठी त्यांना वळविता येईल. त्यांच्या या प्रयत्नाने संघटित दलित समाज विघटित होण्यास मदत झाली आणि हे विघटन त्यांनी दलितांमधल्या काही राजकीय महत्त्वाकांक्षा असलेल्या नेत्यांना राजकीय सत्तेचे आमिष दाखवून साधले. दलितांच्या सामाजिक चळवळीमध्ये जसे विघटन झाले तसल्याच प्रकारचे विघटन घडवून आणण्याचे प्रयत्न दलित साहित्याच्या क्षेत्रात नव्या जोमाने सुरू आहेत. समान विचारी व समान ध्येयी माणसाला जवळ घेण्यास काहीच हरकत नाही. तरीपण त्यांच्या जाणिवांना तपासून पाहिले पाहिजे. आपल्यामधल्याच समविचारी माणसांनी एकाच वाटेने जाणे योग्य आहे की नाही ? पण ते तरी आपल्याला किती प्रमाणात साधले आहे ? कारण या दलित साहित्याच्या चळवळीत प्रचंड आव्हाने निर्माण झाली आहेत. बहुजन समाजामधल्या लोकांनी आणि लेखकांनी हे ओळखलं पाहिजे की, त्यांच्या मानसिक आणि सामाजिक शोषणाला कोण जबाबदार आहेत.

'एक गाव एक पाणवठा' या चळवळीने दलित चळवळीची फार मोठी हानी केली आहे. त्या चळवळीमध्ये जे सातत्य पाहिजे होते ते ती चळवळ यशस्वी होण्यासाठी. ते सातत्य दिसत नाही. तात्कालिक चळवळीमुळे एकूण दलित चळवळीला हानी पोचते. शेवटी त्यांनी असं म्हटलं की, दलित हा चळवळीशिवाय जगू शकत नाही. दलित लेखक चळवळीत असल्यामुळे तो चळवळीपासून विभक्त राहू शकत नाही आणि अपरिहार्यपणे त्याच्या कलाकृतीत सामाजिक बांधिलकी स्वीकारलेली दिसून येते आणि म्हणून येथल्या सामाजिक समस्या ह्या अमेरिकेतील निग्रो लोकांपेक्षा निराळ्या आहेत आणि बाबासाहेबांनी सुरू केलेल्या दलितांच्या उत्थापनाच्या चळवळीत दलित लेखक जाणिवा शोधत असतो. त्यामुळे येथले दलित साहित्य हे स्वयंभू आहे. त्याचेवर कोणत्याही साहित्याची छाप पडू शकत नाही. परिसंवादाचे अध्यक्ष श्री. सैय्यदभाई यांनी परिसंवादाचा समारोप केला. त्यात त्यांनी हे प्रतिपादन केलं की, समानतेच्या तत्त्वावर किंवा लढ्यात असणाऱ्या इतर चळवळींचं सहाय्य दलित चळवळीने अवश्य घेतलं पाहिजे. इतर समाजातील समविचारी मित्र शोधले पाहिजेत.

■

( पृष्ठ क्र. ७९ वरून )

येतील अशा प्रकारे बांधण्यात येत आहेत. प्रत्येक घराशेजारी परडे, घरासमोर अंगण व अंगणाच्या बाहेरून गावातील रस्ता राहील अशी रचना केली जात आहे.

**श्रमशिबिरे**

राजमाची ग्रामसहाय्य योजनेने हाती घेतलेल्या कार्याची माहिती अधिकाधिक तरुण मित्रांना व्हावी आणि त्यांनी या कार्यात सहभागी व्हावे या उद्देशाने एकूण ४ श्रमशिबिरे राजमाची येथे १९८१–८२ या वर्षात आयोजित करण्यात आली.

अंबराईतील तण काढणे, रेशीमघराचे बांधकाम व तुली लागवडीसाठी दगडांचा गडगा बांधणे इत्यादि कामात श्रमशिबिरातील स्वयंसेवकांनी सहाय्य केले.

व्यसनमुक्तीचा विचार गावकऱ्यांनी स्वीकारलेला आहे. हा विचार काटेकोरपणे आचरणात आणला जावा यासाठी संस्थेतर्फे प्रयत्न केले जात आहेत. तसेच वापरलेले परंतु चांगल्या स्थितीतील कपडे गावकऱ्यांना व मुलांना वेळोवेळी वाटण्यात आले. कलाविकास महिला मंडळ, वांद्रे, कल्पनाविहार महिला मंडळ, मुलुंड व हिंदू भगिनी मंडळ, नौपाडा ठाणे यांनी असे कपडे गोळा करून दिले. हिंदू भगिनीमंडळाने इतर काही उपयुक्त वस्तूही दिल्या.

राजमाची (उधेवाडी) येथे हाती घेण्यात आलेल्या प्रकल्पाची प्रगती सातत्याच्या व चिकाटीच्या सांघिक प्रयत्नांवर अवलंबून आहे. विविध क्षेत्रांतील ज्ञान व अनुभव असणाऱ्या कार्यकर्त्यांचे सहकार्य या प्रकल्पाच्या विस्तारासाठी उपयुक्त ठरेल. अधिकाधिक कार्यकर्त्यांनी राजमाची ग्रामसहाय्य योजनेने हाती घेतलेल्या कार्यामध्ये सहभागी व्हावे आणि एका दुर्गम परंतु निसर्गरम्य परिसरात काम करण्याचा आनंद अनुभवावा असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष माधव ताम्हणे व कार्यवाह मुकुंद गोंधळेकर यांनी केले आहे.

■

# राजमाची ग्रामसहाय्य योजना

संस्थापरिचय

लोणावळा परिसरातील घाटमाथ्यावरील दुर्गम भागात राजमाची किल्ल्यावरील 'मनरंजन' व 'श्रीवर्धन' या बालेकिल्ल्यांच्या दक्षिण पायथ्याशी असलेल्या राजमाची (उधेवाडी) परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी राजमाची ग्रामसहाय्य योजना गेली ६ वर्षे विविध पातळीवर प्रयत्न करीत आहे. या संस्थेमार्फत गेल्या वर्षभरात राजमाचीच्या विकासासाठी पुढील आघाड्यांवर विविध कार्यक्रम राबविण्यात आले आहेत. खेड्यात जाऊन काही तरी विधायक काम करण्याचा आदर्श मुंबईतील तरुणांनी या योजनेद्वारे घालून दिला आहे.

**वैद्यकीय सेवा**

राजमाचीच्या गावकऱ्यांसाठी औषधोपचाराची सोय या संस्थेमार्फत विनामूल्य करण्यात आली आहे. दर दोन-तीन आठवड्यांच्या अंतराने डॉक्टर राजमाचीला जातात व आजारी माणसांना तपासून औषधोपचार करतात.

खोकला, थंडी-ताप, पोटदुखी, आमांश, डोळे येणे, त्वचारोग अशा प्रकारचे आजार या गावात दिसून येतात. कुपोषण, पुरेशा कपड्यांचा व अंथरूण-पांघरुणांचा अभाव, पावसाळी हंगामात घरातील ओल इत्यादींमुळे आजार उद्भवतात. या आजारांसाठी उपयुक्त अशी औषधे, टॉनिक्स, जीवनसत्त्व-गोळ्या राजमाची योजनेशी संबंधित डॉक्टरांकडून पुरविली जातात.

**प्राथमिक शिक्षण**

राजमाची येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत जून १९८२ पासून इयत्ता ६ वीचा वर्ग सुरू व्हावा यासाठी संस्थेतर्फे प्रयत्न करण्यात आला; परंतु विद्यार्थी-संख्या अपुरी असल्यामुळे इयत्ता ६ वीचा वर्ग सुरू करण्यास जिल्हा परिषदेने मान्यता दिली नाही. त्यामुळे राजमाची येथील शाळेतून इयत्ता पाचवी उत्तीर्ण झालेल्या मुलांच्या पुढील शिक्षणाची व्यवस्था अन्यत्र करावी लागते.

१९८१-८२ या शैक्षणिक वर्षात राजमाची येथील २४ मुला-मुलींना कम्युनिटी एड अँड स्पॉन्सरशिप प्रोग्रॅम या संस्थेने व २४ मुला-मुलींना अरुण मंगल सेवा विकास योजना या संस्थेने मदत दिली. या मदतीतून पुस्तके, वह्या व लेखनसाहित्य, गणवेश, पादत्राणे, साबण, तेल, दंतमंजन इत्यादि साहित्य मुलांना पुरविण्यात आले. दररोज शाळेमध्ये पौष्टिक खाऊही त्यांना देण्यात आला.

राजमाचीला भेट देणारे संस्थेचे कार्यकर्ते दर शनिवारी संध्याकाळी मुलांना एकत्र जमवून खेळ, गाणी, गोष्टी वगैरे कार्यक्रम घेतात. त्यांच्या अभ्यासाबाबत विचारपूस केली जाते व स्वच्छता, टापटीप, आरोग्य वगैरे दृष्टीने मुलांची पहाणी केली जाते.

**प्रौढ शिक्षण**

दर शनिवारी रात्री प्रौढ शिक्षण वर्ग घेण्यात येतो. राजमाची ग्रामसहाय्य योजनेचे काही सभासद व कार्यकर्ते या वर्गात शिकवितात. निरक्षरांना लेखन-वाचन शिकविले जाते; परंतु केवळ साक्षरतेवर भर दिला जात नाही. कथाकथन, वृत्तपत्रांतील बातम्या, एखाद्या खास विषयाची माहिती इत्यादींच्या माध्यमातून गावकऱ्यांच्या जीवनाशी संबंधित अशा विषयांची चर्चा वर्गात केली जाते. गावकऱ्यांनी विचार करावा, स्वतःचे विचार योग्य रीतीने मांडण्यास शिकावे—या गोष्टीवर भर देण्यात येतो. आरोग्य, स्वच्छता, व्यसनमुक्ती,

शेती, कामधंदा, वृक्षसंवर्धन, शिक्षणाचे महत्त्व, महत्त्वाचे सण, राष्ट्रीय महत्त्वाचे दिवस इत्यादि विषयांची चर्चा वर्गात केली जाते.

**वृक्षारोपण**

जांभूळ, फणस, काजू, सिल्व्हर ओक, रेन ट्री, गुलमोहर, पांगारा वगैरे जातींची रोपे तयार करण्यात आली. या रोपट्यांची लागवड काळभैरव-देवळाचा परिसर, शाळा, इमारतीचा परिसर, आंबराई, तुतीची बाग इत्यादि ठिकाणी करण्यात आली आहे.

**पशुसंवर्धन**

डिसेंबर १९७९ मध्ये मे. इंदुरी फार्म लि. यांच्याकडून संस्थेला देणगीदाखल मिळालेला आयर–शायर–रीठी ५०% संकरीत वळू राजमाची येथे पाळण्यात आला आहे. नियमितपणे खुराक देऊन या संकरीत वळूचे संगोपन केले जात आहे. गावातील गावठी गायींपासून सुधारित जातीच्या गायींची निपज करण्यासाठी या वळूचा आता उपयोग करण्यात येतो.

गोचिडीप्रतिबंधक बी. एच्. सी. पावडर गावकऱ्यांना संस्थेमार्फत पुरविण्यात येते.

**तुतीची लागवड व रेशीम-उद्योग**

१९८०–८१ मध्ये महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या मार्गदर्शनाखाली राजमाची येथे प्रायोगिक स्वरूपात तुतीची लागवड व रेशीम-किड्यांचे संगोपन करण्यात आले. त्यानंतर १९८१–८२ मध्ये रेशीम कोष उद्योग विकसित करण्यासाठी 'रेशीम उद्योग विकास योजना' हाती घेण्यात आली. अंदाजे ५ एकर जमिनीवरील निरगुडी, रामेठा, करवंदी यांसारखी झुडपे तोडून तेथे तुतीची लागवड करण्यात आली आहे. या जमिनीभोवती दगडांचा गडगा बांधण्यात आला आहे. सध्याचा पावसाळा संपल्यानंतर येत्या पावसाळ्याच्या सुरुवातीपर्यंत (जून १९८३) एक कोरडा हंगाम या तुती लागवडीकरिता पाणी देण्यात येईल; परंतु त्यानंतर या तुतीची वाढ फक्त पावसाच्या पाण्यावर होईल.

रेशीम-किड्यांचे संगोपन करण्यासाठी एक स्वतंत्र इमारत बांधण्यात आली आहे. सध्या रेशीम किड्यांच्या संगोपनासाठी लाकडी रॅक्स्, ट्रेज व इतर साहित्य तयार करण्याचे काम सुरू आहे.

**पाणीपुरवठा-योजना**

राजमाची (उधेवाडी) गावाला होणारा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा वाढविण्यासाठी पाणी पुरवठा योजना हाती घेण्यात आली. गतवर्षी (१९८०–८१ मध्ये) मनरंजन बालेकिल्ल्यावरील तळे व पाण्याची टाकी स्वच्छ करण्याचे काम पूर्ण करण्यात आले होते. १९८१–८२ मध्ये मनरंजन किल्ल्यावरील तळ्यापासून गावापर्यंत पाइप बसविण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. डिसेंबर १९८१ मध्ये पाइप बसविण्याचे काम पूर्ण झाल्यापासून उधेवाडीच्या गावकऱ्यांना अगदी गावालगत भरपूर स्वच्छ पाणी उपलब्ध झाले आहे.

**बांबू व वेतकाम**

ठाणे जिल्ह्यातील धसई येथे बांबू व वेतकामाचे प्रशिक्षण पूर्ण करून गणपत वरे राजमाची येथे परत आला आहे. बांबू व वेताचा उपयोग करून लँपशेड, ट्रे, फुलांची परडी, टोपली इत्यादि सुंदर वस्तू तयार करण्यासाठी गणपतला संस्थेतर्फे सहाय्य देण्यात येत आहे व त्याने तयार केलेल्या वस्तूंची विक्री करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. तसेच पुणे येथे विद्यार्थी सहाय्यक समिती व इन्व्हेस्टमेंट इन मॅन या संस्थांनी सुतारकाम प्रशिक्षणवर्ग आयोजित केले होते. राजमाची येथील विठ्ठल वरे व शांताराम उंबरे या दोघांनी हे प्रशिक्षण पूर्ण केले. त्यांचे प्रशिक्षण, भोजन व निवास इत्यादीसाठी आवश्यक ती रक्कम सहाय्य म्हणून त्यांना संस्थेकडून देण्यात आली. प्रशिक्षणानंतर त्यांना सुतारकामाची हत्यारेही देण्यात आली आहेत. राजमाची येथील रेशीमउद्योग योजनेसाठी लाकडी रॅक्स्, ट्रेज वगैरे साहित्य तयार करण्याचे काम आता ह्या दोघांना देण्यात आले आहे.

**अल्पबचत निधी**

फेब्रुवारी १९८१ पासून संस्थेतर्फे सुरू करण्यात आलेला गावकऱ्यांचा अल्पबचत निधी वाढत आहे. दर आठवड्याला बचत गोळा केली जाते. या निधीचा उपयोग गरजू गावकऱ्यांना कर्ज देण्यासाठी–विशेषतः पावसाळ्याच्या सुरुवातीला धान्य खरेदीसाठी–केला जात आहे.

**घरबांधणी**

राजमाची येथील तीन गावकऱ्यांना घरबांधणीसाठी कर्ज मिळवून देण्यासाठी संस्थेमार्फत प्रयत्न करण्यात आले.

नवीन घरे बांधताना गावातील घरांची पुनर्रचना करण्यात येत आहे. एका रस्त्यावरील घरे ओळीत

**( पुढील मजकूर पृष्ठ क्र. ७७ वर )**




मा. संपादक,

श्री. अ. रा. बापट, विभागीय व्यवस्थापक वन-विकास महामंडळ, यांच्या 'एकजाती वृक्षलागवडीची दुसरी बाजू' (हाकारा–एप्रिल–जून १९८२) या लेखाच्या संदर्भात मला काही विचार व्यक्त करावेसे वाटतात.

पहिली गोष्ट ही की, अगदी अलीकडेपर्यंत वने, त्यांचा विकास व त्यासंबंधी धोरण हा विषय सरकारी खात्याच्या अंतर्गत घोटाळत राहिला होता. गेल्या चार-पाच वर्षातील स्वागतार्ह बदल म्हणजे वैज्ञानिक, समाजशास्त्रज्ञ, कार्यकर्ते वगैरे मंडळी या विषयाकडे काळजीपूर्वक पाहू लागली आहेत. त्यावर अनेक मते मांडली जात आहेत. अशा वेळी या संवादात शासन-यंत्रणेतील संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असतो. त्याशिवाय प्रश्नाच्या विविध बाजू नीट मांडल्या जात नाहीत. चर्चा एकारते. तेव्हा श्री. बापटांसारख्या वनअधिकाऱ्यांचे मनोमन स्वागत केले पाहिजे.

श्री. बापटांचे मला समजले ते मुख्य मुद्दे असे –

१. गहू, तांदूळ यांसाठी शेती केलेली चालते तर सागवानाच्या एकप्रजातीय लागवडीवर टीका का? जी झाडे हवी असतील त्यांची लागवड करायलाच हवी.

२. एकप्रजातीय लागवडीवर रोग पडत असतील तर त्यावर मिश्र झाडोऱ्यांचे पट्टे ठेवणे वगैरे उपाय करता येतील.

३. या ना त्या मार्गाने एकप्रजातीय वनात इतर जाती शिरकाव करून घेतातच.

४. निलगिरी लागवडीमुळे कालीदास पटेल यांच्या जमिनीचा पोत सुधारला.

५. एकप्रजातीची वने सुंदर, शोभिवंत असू शकतात म्हणून एकजाती वनांवरील सध्याची टीका अयोग्य आहे.

यातल्या तांत्रिक बाबींवर शास्त्रज्ञांनी व तज्ज्ञांनी कौल द्यावा. बापटांचा पहिला आणि महत्त्वाचा मुद्दा सकृतदर्शनी योग्य वाटतो; पण त्यात मुख्य प्रश्न असा की, ही शेतीसदृश लागवड कोणत्या जमिनीवर हवी? वनविकास महामंडळाचे उत्तर असे की उभे जंगल पूर्ण तोडून त्या जमिनीवर लागवड करू. इतरांचे म्हणणे असे की, ज्या जमिनींवर झाडोरा नाही अशाच ठिकाणी हे काम करा. एक सरकारी महामंडळ धंदा म्हणून झाडे वाढविण्याचे काम किफायतशीरपणे करू शकेल का? बहुसंख्य सरकारी महामंडळांच्या अनुभवावरून उत्तर नकारात्मक वाटते. मग आज महामंडळाला फायदा झालेला का दिसतो? काही लोकांच्या मते उभी वृक्षसंपत्ती कापून विकल्यामुळे. आजपर्यंतच्या निलगिरी व पाइन लागवडीचा इतिहास काय सांगतो? तर यशापेक्षा अपयशाचे प्रमाण फार आहे. वहीदखान यांच्यासारख्या अत्युच्च पदावरील वनअधिकाऱ्याचे हे मत आहे. त्यात चुका असतील तर त्या इतरांनी तपशीलवार दाखवून द्यायला हव्यात.

झाडे लावून पैसे मिळतात तर मग त्याकरता शेत-कऱ्यालाच उद्युक्त करायला नको का? हरितक्रांती-तून आपल्या शेतकऱ्यांनी अन्नधान्याचे उत्पादन खूप वाढवले व आपण स्वयंपूर्ण झालो. ऊस, द्राक्षे, सफर-चंदे ही सगळी यशस्वी उदाहरणे समोर आहेत. निल-गिरीबाबत हे तुरळक प्रमाणात घडत आहे. तेव्हा वनखात्याने शेतकरी खात्यासारखी भूमिका स्वीकारून शेतकऱ्यांना प्रशिक्षण, उत्तेजन व मदत देण्यावर लक्ष का केंद्रित करू नये? राज्याराज्यांमध्ये जंगलातील कच्चा माल कारखानदारांना फार कमी किमतीला (जवळ-पास फुकटात) दिला जातो. असे का? ही तोड कर-ताना sustained yield fasis किंवा मुद्दल मोडून खाण्याऐवजी फक्त व्याज किंवा वाढावा दिला जाणे अभिप्रेत आहे. असे का घडत नाही? शेतीयोग्य नस-लेल्या जमिनींच्या मालकांना अन्य रोजगार देऊन त्य जमिनींवर झाडोरा लावण्याचे कार्यक्रम जोमाने का रेटले जात नाहीत?

आज सरकारी वनव्यवस्थेबाबत इतरांना येणाऱ्या शंकांचे स्वरूप हे असे आहे. यात अंमलबजावणीचे प्रश्न आहेत, तसे धोरणविषयकही आहेत. एकप्रजातीय वनांच्या लागवडीची वैज्ञानिक, आर्थिक व सामाजिक व्यावहारिकता हा या प्रश्नाचा एक पैलू आहे. त्याची उकल इतर बाबींचा विचार न करता होणे कठीण आहे.

**सुधीर जोग, पुणे.**

## 'हाकारा' सहावा, एप्रिल १९८१ : 'आदिवासी आणि आरोग्य' खास विभाग

१) डॉ. अल्बर्ट स्वाइट्झर —रंगनाथ गोडबोले
२) मलेरियाची गोष्ट —अरविंद पटवर्धन
३) आदिवासी आणि अनुवांशिकता —एस. एल. काटे
४) ग्राम आरोग्य प्रकल्प—कोसबाड —अनुताई वाघ
५) आदिवासींची श्रद्धास्थाने —वि. म. गोगटे
६) ह्यो दवाखाना आमासाठी हाये —के. आर तोरसकर
७) आदिवासी आणि आधुनिक वैद्यक —अनंत फडके
८) औषधी परिचय – मेहता ट्रस्टचे बहुमोल कार्य औषधी पेटी, होमिओपथी इत्यादि माहितीपूर्ण मजकूर.

## 'हाकारा' सातवा, जुलै १९८१ : 'वनशेती व वनसंवर्धन' खास विभाग

१) धनगराला धत्तुरा, शहरवाल्यांना मलिदा – जगदीश गोडबोले
२) जंगले वाचवा : धोरण आणि वस्तुस्थिती – दीनानाथ मनोहर
३) वन आणि आदिवासी अर्थव्यवस्था – ब्रह्मदेव शर्मा
४) निलगिरीची वनशेती – आनंद मसलेकर
५) वनसंवर्धन आणि ग्रामीण विकास – इत्यादि माहितीपूर्ण मजकूर

## 'हाकारा' आठवा, आक्टोबर १९८१ : 'रोजगार हमी योजना' विशेषांक

१) रोजगार हमी योजने-अंतर्गत वनीकरण काही विचार —डॉ. अरविंद रेड्डी
२) रोजगार हमी योजना —डॉ. मधुसूदन साठे
३) हमी योजनेवरील मजुरांचे अनुभव —भिमसिंग गिरासे
४) हमी योजनेचा आढावा व शिफारसी —निकीभाऊ कार्डोझो

रोजगार हमी योजनेसंबंधी महाराष्ट्राचा अधिनियम तसेच हमी योजनेसंबंधीच्या सरकारी आदेशातील महत्त्वाचा भाग.

## 'हाकारा' नववा, जानेवारी १९८२ : 'उत्तरखंड अभ्यास मोहीम' विशेषांक

१) अमेरिकेतील रेड इंडियन्स —अरुण लिमये
२) वनव्यवस्थापनाची पारंपारिक पद्धत बदल आवश्यक आहे काय ? —दु. अ. मरबल्ली
३) हिमालयातील पर्यावरणाचा अभ्यास—पहाणी मोहीम अहवाल
४) चंद्रपूर जिल्ह्यातील वैशिष्ट्यपूर्ण जमात —सुलभा ओगले
५) कविता —किशोर देशपांडे, —भारत सातपुते —आनंदा बनकर

## 'हाकारा' दहावा, एप्रिल १९८२ : 'धरणे आणि विकास'

१) 'एकजाती' वृक्ष लागवड —अ. रा. बापट
२) 'धरणे आणि विकास' —विजय परांजपे
३) जंगलातले दहा दिवस —पुरुषोत्तम शेठ
४) 'अरण्येर अधिकार' —प्रभा तुळपुळे
५) म्हणींमधून दिसणारे गोंडी लोकजीवन —भुजंग मेश्राम
६) कलात्मक 'मुंडी' —गोविंद लांबे

१९८० सालात प्रसिद्ध झालेल्या अंकांची माहिती वेगळ्या ठिकाणी दिली आहे.

Registered with the Registrar of Newspapers for India Under No. 35835/80

# हाकारा...

(१) आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन

(२) कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण

(३) शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडविणे

(४) मानव विज्ञान व सामाजिकशास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना, एकत्र आणणे

(५) मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या सर्व उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशांचे मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' सुरू करण्यात आला आहे. या कार्यात आपणही सहभागी होऊ शकता. मानव विज्ञान परिषदेचे सदस्य आणि हाकाराचे वर्गणीदार होऊन! मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व—

| | |
|---|---|
| आजीव सभासद | २०० रुपये |
| हाकारा व परिषद यांची संयुक्त वार्षिक वर्गणी | २० रुपये फक्त |

आपली सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया

**महाराष्ट्र मानव–विज्ञान परिषद**
द्वारा, जगदीश गोडबोले,
'सीमा', ब–७, शिरोळे मार्ग, पुणे ४११ ००४.

या पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव-विज्ञान परिषदे'च्या नावे शक्य तेवढ्या लवकर पाठवावी.

चेक पाठविल्यास अधिक दोन रुपयांची बटणावळ पाठवावी.

आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.